ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : निवडक निबंध खंड १ ला
मध्यप्रांत संशोधन मंडळ,
नागपूर

प्रकाशक : श्री. ल. पांढरीपांडे, नागपूर

प्रकाशन वर्ष : १९४९

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०१९

क्रमांक-३.

# मध्यप्रांत संशोधन मंडळ, नागपूर.

# निवडक-निबंध

## खंड १ ला

864.1

प्रकाशक—प्रि. श्री. ल. पांढरीपांडे, एम्. ए.
कार्यवाह, मध्यप्रांत सं. मं.

864.1
pan
6260

—पु रा. ग्वांडवेकर
...ा प्रेस, महाल...

D.V.POTDAR
D00363

किंमत २ रुपये

24

क्रमांक-३.

मध्यप्रांत संशोधन मंडळ,
नागपूर.

# निवडक-निबंध

## खंड १ ला

प्रकाशक—प्रि. श्री. ल. पांढरीपांडे, एम्. ए.
कार्यवाह, मध्यप्रांत सं. मं.

मुद्रक—पु. रा. खांडवेकर
गोपाल प्रिंटिंग प्रेस, महाल, नागपूर.

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्र

किंमत २ रुपये

D.V.POTDAR
D00363

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | श्री व्यासाची श्री शंकराचार्यावर फिर्याद | १ - १४ |
| २ | मेघदूताचा खरा पाठ कोणता ? | १६-२१ |
| ३ | पुराणांतील आन्ध्रभृत्य राजवंश | २२-२७ |
| ४ | नागपुरांतील साहित्यिक परंपरा वेदविद्या, ज्योतिष इत्यादि | २८-४९ |
| ५ | तीन कालीदास | ५०-५५ |
| ६ | पाणिनीच्या व्याकरणांतील कांही दोष | ५६-७० |
| ७ | महानुभावांचा एक प्राचीन ग्रंथ | ७१-७७ |
| ८ | श्री. हरिनाथाची आम्नायावत परंपरा | ७८-८५ |
| ९ | प्राचीन महाराष्ट्राच्या चतुःसीमा | ८६-९० |


म /1236

## पुरवणी


| | | |
|---|---|---|
| ९ | संस्थेचें १९४८ चें प्रतिवृत्त व सभासदांची यादी | १०४-१०७ |

6280
864:1/P9M
P-593

# प्रस्तावना

मध्यप्रान्त संशोधन मंडळाचें पहिलें प्रकाशन म्हणजे कै. वामन दाजी ओक यांनीं १८८५ सालीं संपादिलेल्या "नागपूरकर भोसल्यांची बखर" या ग्रंथाची १९३७ च्या प्रारंभीं कै. श्री. या. मा. काळे यांच्या टीपासहित काढलेली आवृत्ति होय. या नंतर लवकरच या प्रान्तांतील प्रसिद्ध महानुभाव संशोधक श्री. ह. ना. नेने, एम्. ए. एल्. टी. यांच्या 'दृष्टान्तपाठ' या ग्रंथाचा मंडळाकडून पुरस्कार करण्यांत आला. मंडळ स्थापन झाल्यापासून ४ वर्षांच्या आंत एवढें कार्य करतां आलें, परंतु बखरीच्या प्रकाशनाचा अनुभव उत्तेजनकारक न आल्यामुळें मंडळाला पुन्हा दुसरें प्रकाशन हातीं घेण्याचें धैर्य झालें नाहीं. दरम्यान मंडळाचे वतीनें निबंधवाचनादि नित्य व नैमित्तिक कार्य आतापावेतों व्यवस्थेशीरपणें चालू आहे व त्याची प्रतीति जनतेस वृत्तपत्रांतून जे निबंधाचे सारांश येतात त्यावरून येत असेल. संस्था स्थापन झाल्यापासून आजपावेतों तिच्या मासिक व वार्षिक सभांतून सुमारे १५० निबंध सहज वाचण्यांत आले हें या प्रकाशनास जोडलेल्या इतिवृत्तावरून दिसून येईल. वाचलेले निबंध अभ्यासू जनतेच्या दृष्टीआड होऊं नयेत म्हणून त्यापैकीं कांहीं निवडक निबंध संस्थेने मुद्रित करण्याचें ठरविलें आहे. वृत्तपत्रांतून येणारे सारांश बहुधा जुजबी स्वरुपाचे असतात. अर्थात तेवढ्यावरून अभ्यासकांचें समाधान होणें शक्य नाहीं. प्रस्तुत प्रकाशनांतही कांहीं निबंधांचे सारांशच देणें शक्य झालें. तथापि माहत्वांश त्यांत कायम असल्याकारणानें वाचकांना निराश होण्याचें कारण नाहीं.

सदरहू प्रकाशनांत एकूण ९ निबंध समाविष्ट झाले आहेत त्यापैकीं सर्वच निबंधलेखक संस्थेचे प्रमुख सभासद असून बहुतेकांची कीर्ति लांबवर पसरलेली आहे. डॉ. के. ल. दप्तरी, पंडित सम्राट म. म. कृष्णशास्त्री घुले, म. म. प्रि. वा. वि. मिराशी व

डॉ. य. खु. देशपांडे यांस कोण ओळखत नाही ? अशा विद्वानांचा हा निबंधसंग्रह उपयुक्त वाटेल अशी आशा आहे. या प्रकाशनाने संस्थेच्या सांपत्तिक स्थितीवर ताण पडणार आहे तथापि संस्थेकडून बऱ्याच वर्षांनंतर हें प्रकाशन बाहेर पडत असल्यामुळें तिने तो सहन करण्याचें ठरविलें आहे.

गेल्या १० वर्षांत नागपूर बखरीच्या ३०० प्रती खपल्या. संस्थेने आणखी १०० प्रती बांधून घेतल्या. त्या तशाच पडून आहेत. म्हणून या प्रकाशनाच्या केवळ ३०० प्रती काढल्या आहेत. सहृदय वाचकांनीं हीं मंडळाची दोन्ही प्रकाशनें संग्रही ठेवावीं अशी त्यांस नम्र विनंति आहे. संस्थेचे सहकार्यवाह श्री. दे. गो. लांडगे यांचा नागपूरचा गेल्या शतकांतील इतिहास या ग्रंथाची कच्ची प्रत तयार आहे. द्रव्याची अनुकूलता झाल्यास त्यांचेंहि प्रकाशन मंडळाच्या वतीनें करितां येईल.

सदर्हू प्रकाशनाचें कार्य नागपुरांतील कांही काळ प्रकाशित होणाऱ्या उन्मेष मासिकाच्या संपादकाने पत्करल्यामुळें खर्चांत थोडी बचत झाली. याबद्दल संपादक प्रा. गो. मा. कुलकर्णी एम् ए., एल्. एल्. बी यांची संस्था आभारी आहे. तसेच संस्थेचे दीर्घकालीन माजी सहकार्यवाह प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी वेळांत वेळ काढून प्रुफें तपासल्याबद्दल ही संस्था त्यांची ऋणी आहे. शेवटी ज्या गोपाल प्रिंटिंग प्रेस मध्यें हें पुस्तक छापण्यांत आलें त्याच्या छापखान्याला अनेक अडचणी आल्या असतांहि सदर्हू कार्य पार पाडलें याबद्दल आभार मानणें जरूर आहे.

नागपूर
कृष्णाष्टमी
ता. १७।८।४९

श्री. ल. पांढरीपांडे कार्यवाह
दे. गो. लांडगे } सहकार्यवाह
श्री. मा. कुळकर्णी

# श्री व्यासाची श्री शंकराचार्यांवर फिर्याद

लेखक—डॉ. के. ल. दप्तरी, बी. अे., बी. अेल्., डी. लिट्.

हें प्रसिद्धच आहे की श्री. व्यासांनी "ब्रम्हसूत्र" नांवाचीं सूत्रें उपनिषदाचा अर्थ काय आहे हें ठरविण्याकरितां लिहिलीं व त्या सूत्रांवर श्री शंकराचार्यांनी भाष्य लिहिलें आहे. हें भाष्य लिहिलें तेव्हां श्री व्यास तें भाष्य पाहण्यास श्री शंकराचार्यांकडे गेले व तेव्हां त्या भाष्याविषयीं त्या दोघांमध्यें मोठा वाद झाला, व तें भाष्य अमान्य आहे असें सांगून रागारागाने श्री व्यास निघून गेले. (श्री व्यास श्री शंकराचार्यांवर संतुष्ट होऊन गेले ही श्री शंकराचार्यांच्या अनुयायांनी उठविलेली गप्प आहे). ह्या नंतर श्री शंकराचार्यांच्या चुकीच्या भाष्याच्या प्रसाराविरुद्ध कोणता उपाय करावा ह्याचा श्री व्यासांनी विचार केला. तेव्हां त्यांस श्री शंकराचार्यांवर फिर्याद करावी असा उपाय सुचला. पण तसें करण्यासाठी त्यांना हुशार व मेहनती वकीलाची गरज होती. अर्थात् असा वकील ते शोधूं लागले. तथापि असा वकील त्यांना सुमारें सवाबाराशें वर्षेपर्यंत सापडला नाही. शके १८६२ च्या उत्तरायणाच्या आरंभीं असा वकील त्यांस सांपडला. त्याचें नांव के. ल. दप्तरी, राहणार नागपूर. तीन वर्षे पर्यंत म्हणजे शके १८६५ च्या तुलसीविवाहापर्यंत अत्यंत त्रास व मेहनत घेऊन श्री व्यासांनी आपली तक्रार त्या वकीलास समजवून दिली व त्या वकीलानेहि फार लक्षपूर्वक ती समजून घेतली, व्यास-सूत्राचें भाष्य तयार केलें व फिर्याद दायर करण्याचें कबूल केलें.

---

टीपः—प्रस्तुत निबंध ता. १-२-१९४८ रोजीं भरलेल्या **'मध्यप्रांत संशोधन मंडळा'च्या सभेपुढे वाचण्यांत आला होता.**

त्या नंतर पुराव्याचे कागद म्हणजे अकरा उपनिषदांवरील भाष्यें लिहून तयार करण्यास त्या वकीलास सुमारें चार वर्षें लागलीं. ते कागद लिहिण्याचें काम अश्विन शुक्ल सप्तमी शके १८६९ (टिळक पंचांग) रविवार सरस्वत्यावाहनाचा दिन ह्या दिवशीं समाप्त झालें. नंतर श्री व्यासाची फिर्याद कशी रचावी ह्याचा विचार करण्यांत कांही दिवस घालवून त्या वकीलाने शके १८६९ माघ शुद्ध सप्तमी (टिळक पंचांग) रथ सप्तमी ह्या दिवशीं फिर्याद कोर्टात दाखल केली. ती पुढील प्रमाणें आहे :—

कोर्ट— विचारी जनता

वादीः—व्यास उर्फ बादरायण मुनि, राहणार ब्रम्हर्षि देश–उत्तर भारत, वय सुमारें १८७० वर्षे.

प्रतिवादीः— श्री शंकराचार्य शिवगुरु पुत्र, राहणार कालटी ग्राम, केरळ देश, दक्षिण भारत. सांप्रत बदरिकाश्रमानिकट केदारक्षेत्र, वय १२५८ वर्षें ९ महिने.

दावाः—वादीच्या सूत्रांवरील व उपनिषदांवरील प्रतिवादीचीं भाष्यें शिकवूं नयेत असा मनाई हुकूम हमेशा करितां शिक्षक वर्गास देण्यांत यावा अशा करितां.

दाव्याची किंमत—अनंत कोटि रुपये.

वादी हा ब्रह्मानुभवी ब्रम्हज्ञ असला तरी धनहीन आहे आणि हा दावा सर्व जगताच्या कल्याणाकरितां केला आहे ह्या गोष्टी लक्षांत घेऊन कोर्टाने मेहर नजर करून कोर्टफी माफ करावी.

वादी व प्रतिवादी दोघेहि प्रत्यक्ष दिसत नसले तरी ह्या पृथ्वीवरच ग्रंथरूपाने राहतात म्हणून ह्या कोर्टास ह्या दाव्याचा निकाल करण्याचा अधिकार आहे.

वादीचा दावा येणे प्रमाणें:—

(१) शकपूर्व ३१८० ह्या काळीं ब्रह्मदेव आनंद ह्याने मनुसप्तर्षिसंस्था भारतीयांच्या नियंत्रणाकरितां भारतांत स्थापन केली. ती संस्था भारतीयांचें नियंत्रण योग्य प्रकारें करीत असतां बुद्धाचा जन्म शकपूर्व ५५६ ह्याकाळीं झाला. त्याने लोकांस, यज्ञ करणें टाकून देण्यास व संन्यासाश्रम लहानपणांतहि स्वीकारण्यास प्रवृत्त केलें. त्यामुळे तेव्हांची समाजव्यवस्था विस्कळित झाली. यज्ञांनी एका ठिकाणीं जमलेली संपत्ति पुनः विभागली जात असे, अनेक वर्णांचे अनेक लोक एकत्र जमून सहकार्य करीत त्यामुळे ऐक्यभावना वृद्धिंगत होत असे, अनेक प्रांतांचे विद्वान लोक एकत्र जमत, त्यांमध्यें महत्वाच्या विषयावर चर्चा होत असे ह्यामुळे ज्ञानवृद्धि व अनेक प्रांतांतील लोकांमध्यें ऐक्यभावनेची वृद्धि होत असे. यज्ञ बंद झाल्याने ह्या सर्व फायद्यास देश मुकला. समाजांतील सच्छील मानवांसच संन्यासधर्म पटतो त्यामुळे समाजांतील सच्छील मानवांस व त्यांच्या संततीस समाज मुकला. अशा रीतीने यज्ञ बंद झाल्याने व संन्यासधर्म वाढल्याने तेव्हांचा समाज विस्कळित झाला. ह्या गोष्टी बुद्धाने मनुसप्तर्षिसंस्थेमार्फत न करवितां स्वतंत्रपणें केल्या हीहि एक त्याची मोठी चूक झाली. ह्या गोष्टी मनुसप्तर्षि संस्थेने केल्या असत्या तर त्यांपासून नुकसान होऊं नये म्हणून कांही तरी योजना ह्या संस्थेने केली असती ती झाली नाही. शिवाय मनुसप्तर्षि संस्थेविरुद्ध बुद्धाने जणू बंडच केल्यामुळे ती संस्थाच लोक विसरले. आणि ह्यामुळे समाज नियंत्रक शक्तीच नाहीशी झाली, आणि त्यामुळे भारतीय समाज अधिकच विस्कळित झाला. ह्या दुरवस्थेविरुद्ध प्रतिकार पुष्यमित्र-शुंगाच्या राज्यांत सुरू झाला. त्या वेळीं भृगूने स्वतःच्या एकट्याच्या जबाबदारीवर नवीन मनुस्मृति रचून प्रचलित केली. बुद्धाची चळवळ जशी असमंजस होती तसाच हा भृगूचा प्रतिकारहि बराच असमंजस होता. त्या नंतर लौकरच जैमिनी व मी जन्मलों. आमच्या वेळीं प्राचीन आचार विचार पूर्णपणें खंडित झाले नव्हते. त्यांच्या सहाय्याने आम्हांस वेदांचा व उपनिषदांचा खरा अर्थ व वेदांच्या व स्मृतींच्या प्रामा

त्याचें खरें कारण समजणें शक्य झालें. व त्यांचें पुनरुज्जीवन करण्याकरितां आम्ही आपापलीं सूत्रें रचलीं. तथापि बुद्धाने प्रवृत्त केलेल्या गोष्टींचा मोहच इतका जोरदार होता की त्याने प्राचीन आचारविचार पूर्णपणें खंडित झाले. अशा काळीं शबर, कुमारिलभट्ट व प्रतिवादी ह्यांचा जन्म झाला. त्यांच्या वेळीं वैदिक धर्माचे आचारविचार पूर्णपणें खंडित झालेले असल्यामुळे त्यांना वेदांचा व उपनिषदांचा खरा अर्थ व वेदांच्या व स्मृतींच्या प्रामाण्याचें खरें कारण समजलें नाही. म्हणून वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन करावें असा स्तुत्य हेतु जरी त्यांचे मनांत होता तरी त्यांना बादरीच्या व जैमिनींच्या सूत्रांचे हि अर्थ बरोबर समजले नाहीत. बौद्धांचा पराभव करण्याकरितां बौद्धांचाच सन्यासवाद वेदांमध्यें आहे व वेद व उपनिषदें 'अपौरुषेय आहेत असें चुकीने प्रतिवादीने प्रतिपादिलें. प्रतिवादीची बुद्धि जरी फार तीक्ष्ण व ग्रंथांचें वाचन जरी फार अगाध तरी वर वर्णिलेल्या परिस्थिति मुळे त्याचे कडून पुष्कळ अपसिद्धांत प्रतिपादले गेले. व त्या करितां बादरीच्या सूत्रांचें व उपनिषदांचे त्याने चुकीचे अर्थ केले व असे करण्यांत त्याची तीक्ष्ण बुद्धि त्यास मदतच करीत गेली.

(२) प्रतिवादीने प्रतिपादिलेल्या अपसिद्धांताची यादी ह्यातां देतों.

(अ) ब्रम्हापासून जग अर्थात् जीव किंवा जीवावस्था ही विवर्ताने उत्पन्न झाली.

(आ) विवर्त हा वाईटच म्हणून जीवावस्थाहि वाईटच.

(इ) म्हणून जीवावस्थेचा म्हणजेच त्या अवस्थेंत घडणाऱ्या कर्मांचा त्याग करणेंच योग्य आहे.

(ई) कर्माच्या त्यागाशिवाय आनंदातिशय प्राप्त होऊं शकत नाही.

(उ) ब्रम्हाचें ज्ञान बुद्धीने होऊं शकत नाही.

(ऊ) वेद अपौरुषेय आहेत म्हणून त्यांच्या वचनावरूनच ब्रम्हाचें ज्ञान होऊं शकतें.

(ऋ) विदेह मुक्ति हीच जीवाचें प्राप्तव्य होय.

(ॠ) ब्रम्हज्ञ कर्म करूं शकत नाही.

(३) असे अपसिद्धांत स्वतंत्रपणें प्रतिपादण्याचा कोणासहि हक आहे हें वादीस मान्य आहे. परंतु वादीच्या सूत्रांतहि तेच अपसिद्धांत प्रतिपादले आहेत असें दाखविणें व त्याकरितां वादीच्या सूत्रांचे चुकीचे अर्थ करणें, हें प्रतिवादीचें कृत्य गैर आहे. ह्या कृत्याने प्रतिवादी वादीची एकसारखी बदनामी करीत आहे. वादीच्या बदनामीबद्दल वादीला जितका खेद वाटतो त्याच्या अनंतपट खेद परमपूज्य उपनिषदांच्या चुकीच्या अर्थाबद्दल आणि बदनामीबद्दल आणि प्रतिवादीच्या चुकीच्या प्रतिपादनामुळे होणाऱ्या लोकांच्या दिशाभूलीबद्दल व दुःखाबद्दल होत आहे, म्हणून वादीने हा दावा केला आहे.

(४) वादीच्या सूत्राचे अनेक अर्थ होत असतील तर जो अर्थ उपनिषदांच्या अर्थाशीं जुळतो तोच ग्राह्य ठरतो आणि उपनिषदांच्या अर्थाविषयीं संशय असल्यास जो अर्थ बुद्धीला पटणाऱ्या सिद्धांताशीं जुळेल तोच ग्राह्य. ह्या अर्थनिर्णायक सिद्धांताकडे प्रतिवादीने मुद्दाम लक्ष न दिल्यामुळे प्रतिवादीला वरील चुका करतां आल्या व वाचकाच्या डोळ्यांत धूळ फेकतां आली. ही धूळफेक वाचकांस समजूं नये म्हणून प्रतिवादीने बुद्धिपुरस्सर ब्रम्ह बुद्धिगम्य नाही असें ठरविलें आणि वेद अपौरुष आहेत म्हणजे बुद्धीचें कार्य नव्हेत असें ठरविलें. आणि ब्रम्हज्ञान बुद्धीच्या अधिकारा पलीकडे नेऊन टाकलें. बुद्धिपुरस्सर असा जो शब्द वर योजिला आहे त्याला प्रमाण असें आहे की 'वेद अपौरुषेय आहेत' हा सिद्धांत चूक आहे हें समजण्याइतकी अक्कल प्रतिवादींत खाचित आहे. "ब्रम्ह बुद्धिगम्य नाही" असें वादीचेंहि मत आहे असें दाखविण्याकरितां "तर्काप्रतिष्ठानादन्यथानुमेयमिति चेदेवमप्यविमोक्षप्रसंगः" ह्या सूत्राचा चुकीचा अर्थ प्रतिवादीने केला. तर्क अप्रतिष्ठित आहे हा सिद्धांत कोण्याहि समंजस माणसास मान्य होणार नाही. कारण

तर्क अप्रतिष्ठित मानला तर प्रतिष्ठित असें कांहींच रहात नाहीं. वचनें तर तर्कापेक्षाहि फारच अधिक अप्रतिष्ठित आहेत कारण तीं अनेक असूं शकतात व त्या प्रत्येकाचे अनेक अर्थहि होऊं शकतात. म्हणून "तर्क अप्रतिष्ठित आहे" हा सिद्धांत चूक आहे व तो वादीसहि मान्य नाहीं. ब्रम्हाचें देखील जेवढें ज्ञान होईल तितकें तर्कानेच होईल. व असें तर्कानेच होणारें ज्ञानच उपनिषदांमध्ये व वेदांमध्ये सांगितलेलें आहे. एकूण ब्रम्ह बुद्धिगम्य आहे असेंच वादीचें मत आहे आणि म्हणून वादीने ठिकठिकाणीं तर्काचा उपयोग केला आहे. वरील सूत्राचा खरा अर्थ असाः—

"तर्क अप्रतिष्ठित आहे म्हणून दुसऱ्या रीतीने म्हणजे वचनप्रामाण्याने अनुमान करावें असें तुमचें (म्हणजे पूर्वपक्षाचें) म्हणणें असेल तर तें चूक आहे. कारण ह्याप्रमाणें देखील तुमची (म्हणजे पूर्वपक्षाची) ह्या अप्रतिष्ठितत्वाच्या आक्षेपांतून सुटका होत नाहीं. शद्बप्रामाण्य मानल्यास शद्व अनेकांचे आहेत व त्यांचे अर्थहि अनेक करतां येतात म्हणून शद्बप्रामाण्यच अप्रतिष्ठित आहे म्हणून तर्क अप्रष्ठित मानूं नये आणि तर्काने सिद्ध होईल तेंच ब्रम्हाचें ज्ञान ग्रहण करावें." "दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः" (ब्रम्ह सूक्ष्मबुद्धि मनुष्यांच्या श्रेष्ठ बुद्धीने पाहिलें जातें) असें उपनिषदाने कंठरवाने सांगितलेंहि आहेच. "श्रुतेस्तु शद्बमूलत्वात्" २।१।२७ ह्या सूत्राचा अर्थ श्रीशंकराचार्य करतात तसा नाहीं. (पुराव्यांत दाखल केलेलें भाष्य पहा.) येथे कोर्टाने हें लक्षांत ठेवावें की ब्रम्ह बुध्दिगम्य नाहीं हें प्रतिपादून उपनिषदांचा अर्थ असाच करावा, तसा करूं नये हें म्हणण्याचा अधिकार प्रतिवादीने गमावला आहे. उपनिषदाचा हा अर्थ बुद्धीस पटलेल्या सिद्धांताशीं जुळतो म्हणून हाच उपनिषदांचा अर्थ आहे, असें वादी म्हणूं शकतो तसें प्रतिवादी म्हणूं शकत नाहीं.

(५) वादीच्या सूत्रांचा अर्थ करतांना प्रतिवादीने जी मुख्य चूक केली ती आनंदमयाधिकरणांत आहे. त्यांतील मुख्य सूत्र "आनंदमयोऽभ्यासात्" हें आहे. ह्याचा खरा अर्थ असाः—

" तैत्तिरीय उपनिषद २।५ येथें वर्णिलेला आनंदमय आत्मा म्हणजेच आनंदपूर्ण जीवात्मा ब्रम्हच होय. कारण तैत्तिरीय उपनिषद ३।६ ये गंल 'आनंदो ब्रम्हेति व्यजानात्। आनंदादेव खल्विमानि भूतानि जायंते। आनंदेन जातानि जीवंति। आनंदं प्रयंत्यभि संविशंति ' ह्या वचनांत आनंद शद्ब पुनःपुन्हा उच्चारला आहे आणि त्यावरून आनंदहि ब्रम्हच होय असें सांगितलें आहे. जर आनंद ब्रम्ह तर आनंदमय म्हणजे आनंदप्रचुर जीवात्मा हि ब्रम्हच." मागील " जन्माद्यस्ययतः " १।१।२ ह्या सूत्रांत जशी ब्रम्हाची एक व्याख्या आहे, त्या प्रमाणेंच " आनंदमयोऽभ्यासात्" ह्या सूत्रांतहि ब्रम्हाची दुसरी व्याख्या आहे. ह्या दुसऱ्या व्याख्येवरून वादीनें असें जाहीर केलें आहे की जीवस्थितींतील आत्यंतिक आनंदाची अवस्था म्हणजेच जीवन्मुक्ति हीच जीवाचें परमसाध्य आहे. उपनिषदामध्ये ब्रम्हाचें वर्णन दोन प्रकारचें आहे. एक अव्याकृत ब्रम्हाचें व दुसरें पूर्णपणें व्याकृत झालेल्या आनंदप्रचुर ब्रम्हाचें. पाहिल्या प्रकारची व्याख्या वादीने १।१।१ येथे दिली व दुसऱ्या प्रकारची व्याख्या "आनंदमयोऽभ्यासात्" ह्या सूत्रांत दिली. अर्थात् ह्या सूत्राचा अर्थ अशी आनंदप्रचुर जागृतावस्था प्राप्त करून घेण्याचा मनुष्यांनी प्रयत्न करावा. " अत्रब्रम्ह समश्नुते " म्हणजे जिवंतपणींच ब्रम्हाचा उपभोग घेतो असें कटांत स्पष्ट म्हटलें आहे तोच अर्थ ह्या सूत्रांत आहे.

प्रतिवादीनेंहि प्रथमतः असाच अर्थ केला. पण पुढे खुसपट काढून " इदंत्विहवक्तव्यं— ' सवाएपपुरुषोऽन्नरसमयः' तस्माद्वा एतस्यादन्नरसमयात् अन्योन्तर आत्मा प्राणमय " " तस्मादन्योन्तर आत्मा मनोमयः'तस्मादन्योन्तर आत्मा विज्ञानमयः'इतिच विकारार्थे मयट्प्रवाहे सति आनंदमय एवाकस्मादर्धजरतीयन्यायेन कथमिव मयटः प्राचुर्यार्थत्वं ब्रम्हविषयत्वंचाश्रीयत इति " (अर्थ—मागील अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय ह्या शद्बांत मय प्रत्यय विकारार्थीच एकसारखा योजला असतां शेवटीं कारणाशिवायच अर्धजरतीय न्यायाने 'आनंदमय' ह्या शद्बांतीलच मय प्रत्यय प्राचुर्यार्थी कसा घेतला जाईल आणि आनंदमय आत्मा ब्रम्ह आहे असें कसें म्हणतां येईल.) असें म्हणून

आणि मोठें लांबच लांब प्रतिपादन करून ह्या अधिकरणांतील सूत्रांचे दुसरे अर्थ केले आहेत. त्यांतील पहिल्या सूत्राचा अर्थ असा— "ब्रम्हपुच्छं प्रतिष्ठा इति स्वप्रधानमेव ब्रम्होपदिश्यते, अभ्यासात्। 'असन्नेव स भवति' इत्यस्मिन् निगमनश्लोके ब्रम्हण एव केवलस्याभ्यस्यमानत्वात्" (अर्थ-'ब्रम्ह पुच्छं प्रतिष्ठा' ह्या वाक्यानें स्वतः करिताच ब्रम्ह वर्णिलें आहे दुसऱ्या कोणाचें अंग म्हणून वर्णिलें नाही कारण 'असन्नेव स भवति' इ. निगमन श्लोकांत केवल ब्रम्हाचाच पुनः पुन्हा उच्चार केलेला आहे.)

हा अर्थ प्रतिवादीने सूत्रांतून कसा काढला त्याचें कोडें वादीला तरी अजून उकललें नाही. शिवाय अन्नमय, प्राणमय, मनोमय आणि विज्ञानमय ह्या शब्दांत मय प्रत्यय विकारार्थी आहे असें प्रतिवादीने कांहीहि प्रमाण न देतांच ग्रहण केलें आहे. येथलि 'मय' प्रत्यय विकारार्थी मानल्यास आपत्ति येते ती अशी की जो विकार तो त्याज्य मानावा लागतो परंतु पुढे आठव्या अनुवाकांत "उपसंक्रामति" ह्या शब्दाने त्या सर्व मयप्रत्ययांतांचा स्वीकार सांगितला आहे. त्या आठव्या अनुवाकांतील "उपसंक्रामति" शब्दाने सांगितलेला अर्थ असा आहे की विद्वान् मनुष्य भरपूर व आरोग्यकारक अन्न खाऊन पुष्ट शरीर मिळवितो, आरोग्याचे नियम पाळून रोगरहित व चिरकाल टिकणारे प्राण मिळविता, ज्ञानाच्या साधनाने आनंदी राहणारें मन मिळवितो, तो बुद्धीचा उपयोग करून पूर्ण ज्ञान मिळवितो आणि द्वैतबुद्धि व काम टाकल्यान आनंदप्रचुर अवस्थेचा म्हणजे जीवन्मुक्तीचा अनुभव घेतो. अशा सुंदर व बुद्धीस पटणाऱ्या अर्थाकडे लक्ष देण्याचें टाळून प्रतिवादीने मय प्रत्यय विकारार्थी ठरविला व जीवन्मुक्तावस्थेचेंहि हेयत्व ठरविलें. आनंद हा जीवावस्थेंतच संभवतो, निद्रावस्थेसारख्याच ब्रम्हावस्थेंत आनंद नाही, आनंदाकरितांच जीव झटतो, आनंदाचाच खरा मार्ग दाखविण्याकरिता उपनिषदें लिहिलीं गेलीं ह्या गोष्टींकडे प्रतिवादीने पूर्ण दुर्लक्ष केलें. निद्रेचें अभोग्यत्व छांदोग्यांत ८।११ येथें स्पष्ट सांगितलें आहे आणि ब्रम्हावस्थाहि निद्रेसारखीच आहे हेंहि छांदोग्य ६।८ येथें स्पष्ट

सांगितलें आहे. आणि अद्वैतावस्थेंत आनंद नाही हें " एकाकी न रमते " ह्या वाक्याने बृहदारण्यकांत १।४।३ स्पष्ट सांगितलें आहे. ह्या गोष्टीकडे प्रतिवादीने पूर्ण दुर्लक्ष करून जीवास केव्हांच भोग्य न वाटणारी अव्याकृत ब्रम्हावस्थाच जीवाचें साध्य ठरविली हा अन्याय आहे. जीवाला अभीष्ट असलेलेंच आनंदप्राचुर्य मिळविण्याचा खरा मार्ग जीवाला दाखविला पाहिजे तोच वादीने उपनिषदानुसार बुद्धीला पटेल असा दाखविला आहे, इकडे कोर्टाने लक्ष द्यावें.

(६) प्रतिवादीने केलेला वादीच्या सूत्राचा दुसरा महत्वाचा विपर्यास " तदनन्यत्वमारंभणशब्दादिभ्यः " २।१।१४ ह्या सूत्राच्या भाष्यांत दिसून येतो. ह्या सूत्राचा प्रतिवादीने केलेला अर्थ जरी चूक नाही तरी त्यावरून त्यांनी काढलेलें उपसिद्धांत मात्र फारच भयंकर आणि चुकीचे आहेत. प्रतिवादी त्या भाष्यांत म्हणतो, "अतश्चेदं शास्त्रीयं ब्रम्हात्मत्वमवगम्यमानं स्वाभाविकस्य शारीरात्मत्वस्य बाधकं संपद्यते रज्वादिबुद्धयइव सर्पादिबुद्धीनाम्। बाधिते च शारीरात्मत्वे तदाश्रयः समस्तः स्वाभाविको व्यवहारो बाधितो भवति " ( अर्थ :— शास्त्रांत सांगितलेलें ब्रम्हात्मत्व म्हणजे अद्वैत समजलें तर तें स्वभावतः दिसणाऱ्या शारीरात्मत्वाचें म्हणजे जीवत्वाचें म्हणजे द्वैताचें बाधक होतें. ही रज्जु वगैरे आहे हें ज्ञान हा सर्प वगैरे आहे ह्या ज्ञानास बाधक होतें तसेंच तें होतें. शारीरात्मत्व म्हणजे जीवरूपी द्वैत बाधित झालें म्हणजे त्याच्याच आधारावर राहणारा सर्व स्वाभाविक व्यवहार बाधित होतो. म्हणजे अद्वैत ज्ञान झालें असतां कर्मे होऊं शकत नाहीत किंवा कर्मे करण्याची आवश्यकता रहात नाही. ) ह्या उपसिद्धांतांचा अर्थ असा होतो की जीवावस्था हा विवर्त म्हणजेच भ्रम आहे अर्थात् त्या अवस्थेंतील कर्मे टाकून द्यावीं म्हणजे संन्यासाश्रम घ्यावा. पण हें उपसिद्धांत चूक आहेत, हें ह्या सूत्राच्या मागील सूत्राच्या प्रतिवादीच्याच भाष्यावरून प्रतिवादीस सहज दिसून आलें असतें. प्रतिवादीच त्या भाष्यात म्हणतो, "तस्मात्प्रसिद्धस्यास्य भोक्तृभोग्यविभागस्याभावप्रसंगाद्-युक्तमिदं ब्रम्हकारणतावधारणमिति चेत् कश्चिचोदयेत्तं प्रतिब्रूयात्

लोकवादिति । उपपद्यते एवायमस्मत्पक्षेऽपि विभागः एवं लोके दृष्टत्वात् । तथाहि—समुद्रादुदकात्मनोऽनन्यत्वेऽपि तद्विकाराणां फेनवीचितरंगबुद्बुदादीनामितरेतरविभाग इतरेतरसंश्लेषादिलक्षणश्च व्यवहार उपलभ्यते । नच समुद्रादुदकात्मनोऽनन्यत्वेऽपि तद्विकाराणां फेनतरंगादीनां इतरेतरभावापत्तिर्भवति । नच तेषामितरेतरभावानापत्तावपि समुद्रात्मनोऽन्यत्वं भवति । एवमिहापिनच भोक्तृभोग्ययोरितरेतर भावापत्तिः नच परस्माद् ब्रम्हणोऽन्यत्वं भविष्यति "

( अर्थः—ब्रम्हापासूनच सर्व उत्पन्न झालें असें मानल्याने प्रसिद्ध असलेला भोक्तृभोग्यविभाग नाहीसा होण्याचा प्रसंग येतो म्हणून तसें मानणें अयोग्य आहे असा आक्षेप जर कोणी घेईल तर असे उत्तर द्यावें. लोकामध्यें ज्या अर्थी असा विभाग दिसून येतो त्या अर्थीं आमच्या पक्षींहि म्हणजे सर्व ब्रम्हापासून झालें असें मानलें तरी हा भोक्तृभोग्यविभाग उपपन्न आहे. जसें उदकरूपी समुद्रापासून त्याचे विकार फेन, वीचि तरंग बुद्बुद वगैरे भिन्न नसूनहि त्यांचे परस्परापासून भिन्न असणे व त्यांचें परस्पराशीं संश्लिष्ट होणें वगैरे व्यवहारहि दिसून येतो. हे विकार समुद्रापासून भिन्न नसूनहि ते परस्पराशीं एकरूप होत नाहीत, तसेच फेन तरंग वगैरे परस्पराशीं एकरूप होत नसले तरी ते समुद्रापासून भिन्न नाहीत. त्याप्रमाणेंच ह्या बाबतींतहि भोक्तृभोग्य परस्परांहून भिन्नहि आहेत आणि ब्रम्हाहून भिन्नहि नाहीत. )

ह्यावरूनच सिद्ध होतें की जगद्ब्रम्हजीवांचें अद्वैत असलें तरी कर्मे होऊं शकतात. किंवा कर्मे करण्याची गरजहि असूं शकते. अद्वैताचें ज्ञान झालें म्हणजे ही परिस्थिति बदलते असाहि आक्षेप प्रतिवादी घेऊं शकत नाही. कारण "आनारब्धकार्ये एव तु पूर्वे तदवधेः ॥४।१।१५॥ ह्या सूत्राच्या भाष्यांत तो कबूलच करतो की, "बाधितमपितु मिथ्याज्ञानं द्विचंद्रज्ञानवत् संस्कारवशात् कंचित्कालमनुवर्तत एव । अपिच नैवात्र विवदितव्यं ब्रम्हविदा कंचित्कालं शरीरं ध्रियते न वा ध्रियत इति "। ( अर्थः—बाधित झालेलें मिथ्या ज्ञान म्हणजे द्वैत ज्ञान देखील दोन चंद्रांच्या ज्ञानाप्रमाणें संस्काराच्या

जोरामुळे कांही काळ म्हणजे शरीरमृत्युपर्यंत चालूच राहतें. ब्रम्हवेत्ता देखील कांही काळ शरीर धारण करतो किंवा धारण करीत नाही ह्याविषयीं वाद करूं नये. ब्रम्हवेत्ताहि कांही काळ शरीर धारण करतोच हा भाव आहे.) अर्थात् ब्रम्हावेत्ताहि मृत्यु येई पर्येत कर्म करूं शकतो. आणि जो कर्म करूं शकतो त्याने कर्म करणें आवश्यकच आहे. आणि हेंच वादीने आपल्या सूत्रांत प्रतिपादिलें कीं ब्रम्हवेत्त्यानेहि कर्में केलीं पाहिजेत. ह्याविषयीं असें सांगणें भाग आहे की प्रतिवादीने अध्याय ३ पाद ४ येथील सूत्राचे अर्थ चुकीचे केले व त्यांत कर्मसंन्यास सांगितला आहे असें प्रतिपादिलें. वास्तविक ह्या पादांत वादीने सर्व कर्मांचा त्याग कोणत्याच सूत्रांत सांगितला नाही. फक्त अग्नींधनादि कर्में म्हणजे यज्ञादि कर्में आवश्यक नसून काम्य आहेत असें "अतएव अग्नींधनाद्यनपेक्षा" ४३।४।२५ आणि "सर्वापेक्षाच यज्ञादिश्रुतेरश्ववत्" ३।४।२६ ह्या सूत्रांत सांगितलें आहे.

(७) मागील परिच्छेद (४) (५) व (६) ह्यांत दाखविलेल्या चुकांना अनुरूप व पोषक अशा इतर अनेक चुका प्रतिवादीला कराव्या लागल्या व त्याने केल्या. त्या सर्व ह्या अर्जाच्या पूरणिकेंत दाखवावयाच्या आहेत. ती पूरणिका तयार करून पेश करण्याकरितां कोर्टाने वादीला एक वर्षाची मुदत द्यावी अशी विनंती आहे. वास्तविक अशी पुरवणी पेश करण्याची गरज नाही कारण प्रतिवादीच्या सर्व चुका वादीने पुराव्यांत दाखल केलेल्या ब्रह्मसूत्राच्या वादीच्या वकीलाने तयार केलेल्या भाष्यांत ठिकठिकाणीं दाखविल्याच आहेत. ही पुरवणी फक्त कोर्टाच्या सोयीकरितां प्रतिवादीच्या सर्व चुका सहज दृष्टिक्षेपाने समजाव्या ह्याकरितां पेश करावयाची आहे. तिच्या वाचून प्रतिवादीचें कांही नडावयाचें नाही. वादीच्या वकीलास मात्र ती लिहून काढण्यास एक वर्ष लागेल म्हणून ही पुरवणी पेश करण्यास एक वर्षाची मुदत मिळावी किंवा अशा पुरवणी शिवायच कोर्टाने काम करावें.

(८) प्रतिवादीच्या ब्रम्हसूत्रांच्या व उपनिषदांच्या चुकीच्या भाष्यामुळे भारताचें फार नुकसान झालें आहे. संन्यासाश्रम हाच

मुक्तीचा किंवा आत्यंतिक आनंदाचा मार्ग समजून सद्गुणसंपन्न लोकांनीच संन्यासाश्रम घेतला. त्यामुळे गुणसंपन्न लोकांस व त्यांच्या संततीस भारतीय समाज मुकला. त्यामुळे समाजांत दुर्गुणी-लोकांचें बाहुल्य झालें. अशा ह्या दुर्गुणी लोकांनी आपसांत भांडून भांडून भारताचें स्वातंत्र्य गमावलें व त्यानंतर त्यांनीच भारताचें पारतंत्र्य ७५९ वर्षे कायम टेविलें. आतां शके १८६९ मध्यें जरी स्वातंत्र्य मिळालें आहे तरी संन्यासाश्रमाचें प्रावल्य झाल्यास तें गमावण्याचाहि संभव आहेच. ब्रम्हवेत्ते सतत कर्म करतील तरच तें स्वातंत्र्य टिकूं शकेल. म्हणून प्रतिवादींच्या भाष्यांची हकालपट्टी करणें जरूर झालें आहे.

(९) वादीने पुढील पुराव्याचे कागद दाखल केले आहेत.

(१) व्यास सूत्रांवरील प्रतिवादींचें भाष्य.

(२) व्यास सूत्रांचें वादीच्या सांगण्याप्रमाणें वादीच्या वकीलानें केलेलें मराठी भाष्य.

(३) ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडुक्य, कौषीतकी, ऐतरेय, तैत्तिरीय, छांदोग्य, बृहदारण्यक ह्या अकरा उपनिषदांची वादीच्या वकीलाने तयार केलेलीं मराठी भाष्यें. हीं वादीने वाचून पाहिलीं आहेत व वादीला मान्य आहेत. वादीने आपलीं सूत्रें लिहिलीं तेव्हां हीं व श्वेताश्वतर अशीं बाराच उपनिषदें होतीं. हें वादी शपथ घेऊन जाहिर करतो. आज जीं दुसरीं १६७ उपनिषदें उपलब्ध आहेत तीं आधुनिकांनी लिहिलीं आहेत. त्यांना मनुसप्तर्षींची मान्यता कधीच मिळाली नव्हती. ज्या ज्या ग्रंथास मनुसप्तर्षींची मान्यता मिळे त्यालाच वेदत्व किंवा उपनिषत्त्व प्राप्त होत असे. 'श्वेताश्वतरांस' अशी मान्यता मिळाली नसावी कारण "वेदांते परमं गुह्यं पुराकल्पे प्रचोदितं" ६।२२ ह्या वाक्यांत त्याचा कर्ता वेदांताच्या म्हणजे उपनिषदांच्या निर्मितिकाळाला 'पुराकल्प' ह्या शद्बाने निर्दिष्ट करतो. ह्यावरून वरील अकरा उपनिषदांनंतर बऱ्याच दीर्घ काळाने 'श्वेताश्वतर' झालें व तें झाल्यानंतर मनुसप्तर्षींची

परिषद भरली किंवा नाही असा संशय उत्पन्न होतो. शिवाय तो ग्रंथ स्वतंत्रपणें विचार करून लिहिला नसून पुराकल्पांतील उपनिषदांचें मत ग्रंथकर्त्यास जसें दिसलें तसें सांगण्याकरितां लिहिला हें वरील श्लोकावरूनच उघड आहे. म्हणून त्या उपनिषदास काहीच किंमत नाही. म्हणून वादीने त्याचा कधींच उपयोग केला नाही. प्रधानवादी त्याचा जो उपयोग करीत त्याचें फक्त खंडन करण्याकरितां वादीने १।४।८–१० हीं सूत्रें रचलीं. इतर १६७ उपनिषदें आधुनिकांनी लिहिलीं ही गोष्टच प्रतिवादीला माहीत नाही कारण तो वादीपेक्षा वयाने फारच लहान आहे. मनुसप्तर्षींची शेवटची परिषद मगध-देशांतील 'शुचि' राजाचें राज्य चालू असतां झाली व त्यानंतर केव्हांच झाली नाही. वादीचाच जन्म शुचि राजानंतर सुमारें १०२८ वर्षांनी झाला. मनुसप्तर्षींच्या मान्यतेनेच वेदत्व व उपनिषत्त्व व अर्थात् प्रामाण्य प्राप्त होते ह्या गोष्टीची प्रतिवादीस कल्पना देखील नव्हती. व मनुसप्तर्षींची शेवटची परिषद वादीच्याहि जन्मापूर्वीच झाली होती ही गोष्टहि प्रतिवादीस माहीत नव्हती. वास्तविक पहातां प्रतिवादीने ह्या गोष्टींचा कधींच विचार केला नाही. एकूण प्रतिवादी वर सांगितलेल्या अकरा उपनिषदांशिवाय इतर उपनिषदें पुराव्यांत दाखल करील तर तीं बनाऊ समजून कोर्टाने पुराव्यांत स्वीकारूं नयत. कारण त्यांस मनुसप्तर्षींची मान्यता नाही आणि शिवाय तीं स्वतंत्रपणें विचार करूनहि लिहिलीं नसून त्याच्यामतें मागील उपनिषदांचा जो अर्थ असेल तोच सांगतात. वादीने पुराव्यांत दाखल केलेले कागद प्रतिवादी स किंवा त्याच्या वकीलाला वादीच्या वकीलाच्या घरीं पहावयास मिळतील.

(१०) प्रतिवादी वादीची व उपनिषदांची बदनामी व लोकांचें नुकसान, प्रतिवादीने भाष्य लिहिलें तेव्हांपासून आजपर्यंत एकसारखें करीतच आहे व पुढेहि करीतच राहणार हेंहि उघडच आहे. म्हणून वादीच्या दाव्याला मुदत आहे किंवा नाही हा प्रश्नच उत्पन्न होत नाही.

(११) प्रतिवादी हा अदृश्य होऊन बसला आहे तो ह्या दाव्याचे समन्स घेण्याचें टाळील हें उघड आहे. म्हणून कोर्टाने

ह्या दाव्याचें समन्स प्रतिवादीच्या शिष्यांवर बजावावें म्हणजे तें समन्स प्रतिवादीस मिळेल. ह्या दाव्याचें समन्स मिळाल्यावरहि प्रतिवादी कोर्टांत हाजर होईलच असें निश्चयपूर्वक सांगतां येत नाही. तरी कोर्टाने त्यास एक वर्षाची मुदत द्यावी. एक वर्षांत प्रतिवादीने आपलें उत्तर कोर्टांत पेश न केल्यास कोर्टाने त्याचे विरुद्ध एकतर्फी कारवाई करून वादीची मागणी मान्य केल्याचा हुकूम द्यावा.

(१२) वादीची कोर्टास प्रार्थना अशी आहे की "प्रतिवादीची ब्रम्हसूत्रावरील व उपनिषदांवरील भाष्यें कोणीहि कोवळ्या बुद्धीच्या लहान मुलांस किंवा अल्प बुद्धीच्या मोठ्या मनुष्यास शिकवूं नयेत. आणि कोणासहि प्रतिवादीचीं हीं भाष्यें शिकवावयाचींच असतील तर त्या पूर्वीं किंवा नंतर ह्या दाव्यांत पुराव्यांत दाखल केलेलीं ब्रम्हसूत्रांचीं व उपनिषदांचीं भाष्यें शिकविलींच पाहिजेत" असा हुकूम कोर्टाने देऊन त्याची अंमलबजावणी करावी.

(१३) ह्या दाव्याचें वादीचें काम लोककल्याणार्थ वादीच्या वकीलान फुकट केलें आहे. म्हणून वकीलाचा खर्च वादी मागत नाही. पण कोर्टांतील अनेक न्यायाधीशांच्या वाचनाकरितां पुराव्यांतील कागद नंबर २ व ३ छापून काढणें जरूर आहे. व तें फार खर्चाचें काम आहे व तितका खर्च करण्याइतकी ऐपत वादीजवळ नाही. म्हणून तितका खर्च कोर्टाने कोणत्यातरी समर्थ मनुष्याजवळून वसूल करावा. अशा सत्कार्याकरितां कोणाहि समर्थ मनुष्याजवळून पैसा वसूल करण्याचा ह्या कोर्टास अधिकार आहेच.

वरील सर्व हकीकत वादीस असलेल्या व मिळालेल्या माहिती प्रमाणें व वादीच्या समजुतीप्रमाणें खरी आहे असें वादी शपथेवर सांगतो आणि वादीस स्वतः लिहितां येत नाही म्हणून आपल्या वकालास ह्या दाव्याच्या अर्जावर वादी तर्फे सही करण्याचा अधिकार देतो.

| | |
|---|---|
| मुक्काम नागपूर, माघशुद्ध सप्तमी रविवार (टिळक पंचांग, शके १८६९ | वादीतर्फे वकील केशव लक्ष्मण दप्तरी |

---

प्रकाशित "उन्मेष" एप्रिल १९४८

# मेघदूताचा खरा पाठ कोणता ?

## आषाढस्य प्रथम दिवसे की आषाढस्य प्रशम दिवसे

### लेखकः—म. म. कृष्णशास्त्री घुले.

एकदा कोण्या एका काळीं अलकानगरींतील एका यक्षाकडून त्याच्या कामांत कांही प्रमाद घडल्यामुळे त्याचा प्रभु जो कुबेर त्याने त्याला शिक्षा म्हणून एक वर्षपर्यंत पत्नीवियोगाचा शाप दिला. त्यामुळे तो यक्ष पत्नीला अलकेंत सोडून रामगिरि नांवाच्या पर्वतावर येऊन राहिला. येथे सुमारे आठ महिने पत्नीच्या विरहदुःखांत अतिशय कष्टाने घालविल्यावर वर्षाकालाच्या आरंभीं त्याला त्या पर्वतावर एक मेघ आलला दिसला. त्याला पाहून वर्षर्तूत विरहिणी स्त्रियांचें दुःख त्यांना असह्य होत असल्याचें माहित असल्याने तें दुःख असह्य होऊन कदाचित आपली प्रिय पत्नी प्राणत्याग करील किंवा दुःखांत होरपळून मरेल अशी कल्पना येऊन अत्यंत विव्हल झालेला तो यक्ष त्या मेघाकरवीं आपण कुशल असल्याचें वृत्त आपल्या पत्नीला कळवावें या उद्देशाने त्याला प्रार्थनापूर्वक निरोप सांगत आहे अशी कल्पना करून कालिदासाने एक अप्रतिम काव्य रचलें आहे. त्याला मेघदूत किंवा मेघसंदेश असें म्हणतात हें प्रसिद्धच आहे. ह्या काव्यांत यक्षाला मेघाचें दर्शन प्रथम कधीं झालें तें कालिदासाने पुढील श्लोकांत सांगितलें आहे.

तस्मिन्नद्रौ कतिचिदबलाविप्रयुक्तः स कामी ।
नीत्वा मासान् कनकवलयभ्रंशरिक्तप्रकोष्ठः ॥
आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं ।
वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श ॥

ह्या श्लोकांतील 'आषाढस्य प्रथम दिवसे' हा पाठ मल्लिनाथसंमत आहे. आणि हाच सध्या सर्वत्र प्रचलित आहे. या पाठाप्रमाणें यक्षाने आषाढाच्या पहिल्या दिवशीं मेघाला पाहिलें असें ठरतें. पण याच्या पूर्वीचा टीकाकार दक्षिणावर्तनाथ ह्याने आषाढस्य प्रथम दिवसे याच्या ऐवजी आषाढस्य प्रशम दिवसे असा पाठ दिला आहे. त्या पाठाप्रमाणें यक्षानें मेघाला आषाढाच्या शेवटच्या दिवशीं पाहिलें असें ठरतें. पहिला दिवस आणि शेवटचा दिवस यांत फारच मोठें पूर्वोत्तर ध्रुवाइतकें अंतर आहे. अर्थात तें उपेक्षणीय नाही. व त्याची कशी-तरी योजना करणेंहि शक्य नाही. त्यामुळे ह्या दोन परस्पर विरुद्ध पाठापैकी खरा म्हणजे कालिदासाला अभिप्रेत असलेला पाठ कोणता हा प्रश्न उत्पन्न होऊन त्यावर आतापर्यंत बरीच भवति न भवति झाली. आणि मल्लिनाथोक्त 'प्रथमदिवसे' हाच पाठ बरोबर आहे असें आज तरी बहुमतानें ठरलें आहे. पण मला मात्र 'आषाढस्य प्रशम दिवसे' हाच पाठ खरा म्हणजे कविसंमत आहे असें वाटतें. तें कां हें आज मी आपल्या समोर सांगणार आहे.

मल्लिनाथाने त्या श्लोकावर टीका लिहिली तेव्हां नाथाचा पाठ त्याच्या समोर होता. त्याचा विचार करून व तो अग्राह्य ठरवून त्याने 'प्रथम दिवसे' हा पाठ निश्चित केला आहे. त्याने 'प्रशम दिवसे' हा पाठ अग्राह्य कां ह्याचीं कारणेंहि आपल्या टीकेंत दिलीं आहेत. तीं अशीं—

"केचि'दाषाढस्य प्रथम दिवसे' इत्यत्र 'प्रत्यासन्ने नभसी' ति वक्ष्यमाण नभोमासप्रत्यासत्त्यर्थं 'प्रशमदिवसे' इति पाठं कल्पयन्ति। तदसंगतं। प्रथमातिक्रमणे कारणाभावात्। नभोमास प्रत्यासत्त्यर्थ मित्युक्तमिति चेन्न। प्रत्यासत्तिमात्रस्य स्वमासप्रत्यासत्त्यैव दिवसस्याप्युपपत्तेरत्यन्तप्रत्यासत्तेरुपयोगाभावेनाविवक्षितत्वात्। विवक्षितत्वे वा स्वपक्षेऽपि प्रशमदिवसान्तिमक्षणे मेघदर्शनकल्पनायां प्रमाणाभावेन तदसंभवात्। प्रत्युत अस्मत्पक्ष एव कुशलसंदेशस्य भाव्यनर्थ-प्रतीकारार्थस्य पुरत एवानुष्ठानं युक्तं भवेदित्युपयोगसिद्धिः। कथं तर्हि शापान्तो मे भुजगशयनादुत्थिते शार्ङ्गपाणावित्यादिना भग-

त्प्रबोधावाधिकस्य शापस्य मास चतुष्टयावशिष्टस्योक्तिः शयनैकादशीमारम्भोत्थानैकादशीपर्यन्तं मासचतुष्टयं भवति दशदिवसाधिक्यादितिचेत् , । स्वपक्षेऽपि कथं सा, विंशतिदिवस न्यूनत्वादिति संतोष्टव्यम्। तस्मादीषद्वैषम्यमविवक्षितमिति सुष्ठूक्तं 'प्रथमदिवसे' इति।

याचा भावार्थ असा, कोणी 'प्रत्यासन्ने नभसि दयिता जीविताल्म्बनार्थी। जीमूतेन स्वकुशलमयीं हारयिष्यन्प्रवृत्तिं ' ह्या त्याच्या पुढील श्लोकांत श्रावण मास जवळ आल्यामुळें आपल्या प्रियपत्नीच्या जीवाला अपाय होऊ नये या बुद्धीने मेघाकडून पत्नीला आपली कुशल वार्ता कळवावी असें यक्षाने ठरविलें असल्याचें कालिदासाने सांगितलें आहे. त्यांतील 'प्रत्यासन्ने नभसि' म्हणजे श्रावण जवळ आला या विधानाशीं जुळण्या करितां कोणी 'प्रशम दिवसे' असा पाठ करितात. पण तो बरोबर नाही. कारण की पहिला दिवस सोडण्याला कांही कारण नाही. श्रावण मासाचें सामीप्य हें कारण आहे असें म्हणता येत नाही. कारण मासाच्या सामीप्याने दिवसाचेंहि सामीप्य अनायासेंच लाभतें. अत्यंत सामीप्य कवीला विवक्षित नाही. तसें विवक्षित आहे म्हटलें तर शेवटल्या दिवसाच्या शेवटल्या क्षणीं अशी कल्पना करावी लागेल आणि त्या कल्पनेंत कांही स्वारस्य नाही. उलट आमच्या पक्षांत कुशल संदेश जो पाठवावयाचा तो जर पुढील अनर्थ टाळण्याकरिता आहे तर त्याची आधीपासून योजना केलेली असणें हेंच सुसंगत दिसतें. येथें जर असें म्हणाल की 'भुजगशयनादुत्थिते शार्ङ्गपाणौ' यांत प्रबोध एकादशीला उरलेले शापाचे चार महिने पुरे होतात असें म्हटलें आहे. पण हें शयनी एकादशीपासून आरम्भ केला तर प्रथम दिवसापासून एकादशीपर्यंतचे १० दिवस अधिक येतात त्याची वाट काय ? तर आम्ही असें म्हणतों की तुमच्या पक्षांत तरी २० दिवस कमी येतात त्याची वाट काय ? २० दिवस कमी घेण्यांतच जर तुमचा संतोष होत असेल तर खुशाल तसें करा. तेव्हां चार महिने म्हणजे अगदी बरोबर चार महिने, थोडे दिवस देखील कमी अधिक नाहीत, असें विवक्षित नसून सुमारे चार महिने असें विवक्षित आहे. म्हणून 'प्रथम दिवसें' हेंच बरोबर आहे.

दा. म. म. द. वा. पोतदार.

मल्लिनाथाच्या म्हणण्याचा सारांश असा की पहिला दिवस घेतल्यास १० दिवसाच्या आधिक्याचा दोष येतो व शेवटला दिवस घेतल्यास २० दिवसाच्या न्यूनत्वाचा दोष येतो. अशा रीतीने उभयपक्षींहि दोष येत असल्यास २० दिवस कमी घेण्यापेक्षां १० दिवसांच्या आधिक्याचा दोष उपेक्षणीय आहे. कारण यक्षाला तरी अगदी बरोबर चार महिनेच विवक्षित होते असें म्हणतां येत नाही. म्हणून 'प्रथम दिवसें' हाच पाठ योग्य आहे.

या शिवाय ' प्रत्यासन्ने नभसि ' याच्या ऐवजी नाथाच्या प्रतींत ' प्रत्यासन्ने मनसि ' असा पाठ आहे. त्या ठिकाणीं मल्लीनाथ म्हणतात, की, नाथांचा पाठ प्रत्यासन्ने मनसि असा असल्यामुळे त्यांना श्रावण मासाच्या प्रत्यासत्तीचाहि आधार मिळत नाही. एकूण ' प्रथम दिवसे ' हाच पाठ सर्वथा योग्य ठरतो.

मल्लीनाथाचा काल इ० स० चें १४ वें शतक असून नाथाचा काल १२ वें शतक आहे. त्यांच्या हि पूर्वीच्या वल्लभ देवा ( इ. स. ९२४ ) च्या टीके वरून पाहतां त्याहि काळीं हे दोन्ही पाठ अस्तित्वांत होते. तो म्हणतो " आषाढस्य प्रशमदिवसे समाप्तिदिने ग्रीष्मावसाने । केचित्तु शकारथकारयोर्लिपिसादृश्यमोहात्प्रथम इत्यूचुः कथं-कथमपि चैतमेवार्थं प्रतिपन्नाः । वर्षाकालस्यप्रस्तुतत्वादाद्दिदिनमित्येतत्त्वतीव विरुद्धम् । " प्रबोधचन्द्रसेन गुप्त.

वरील विवेचनावरून पुढील गोष्टी निर्विवाद ठरतात. (१) कुबेराचा शाप प्रबोध एकादशीला म्हणजे कार्तिक शु. एकादशीला पूर्ण होणार होता. अर्थात् यक्ष द्वादशीला मुक्त होणार होता. (२) यक्षाला मेघदर्शन आषाढाच्या पहिल्या दिवशीं ( प्रथम दिवसे ) किंवा शेवटच्या दिवशीं ( प्रशम दिवसे ) झालें (३) त्या दर्शन दिवसापासून शापान्त दिवस चार महिने बाकी होता. मल्लीनाथाने शयन एकादशीपासून प्रबोध एकादशी पर्यंत चार महिने बाकी होते असें जें सूचित केलें आहे, ती केवळ मल्लीनाथी आहे. कारण आरम्भ दिवस मग तो प्रथम असो की प्रशम असो, यक्षाने नक्की

सांगून ठेविला आहे. तेव्हां त्या संबंधानें स्वकपोल कल्पना करण्या-करितां कोणतीहि जागा नाही. प्रथम दिवसा पासून एकादशी पर्यंतचे १० दिवस मेघाच्या प्रवासांत खर्ची पडले असावे किंवा खर्ची पडतील असें समजून यक्षाने ते १० दिवस वगळून ४ महिन्याचा अवधि सांगितला अशी जी सोमयाजी वगैरे संशोधकांनी कल्पना केली आहे ती मल्लीनाथीवरहि ताण आहे. कारण तशा अनुमानाला यक्षाच्या भाषणांत बिलकुल आधार नाही. तेव्हां आषाढाच्या पहिल्या किंवा शेवटल्या दिवसा पासूनच शापांताला सुमारे चार महिने बाकी होते हें निश्चित आहे. आता पहिला की शेवटला येवढेंच पाहावयाचें राहिलें. ते आता आपण पाहूं.

मल्लीनाथाच्या हिशोबाने आषाढाच्या पहिल्या दिवसा-पासून शापांता पर्यंत ४ महिने १० किंवा ११ दिवस अधिक येतात. व आषाढाच्या शेवटल्या दिवसापासून २०।२१ दिवस कमी राह-तात म्हणून मल्लीनाथाचें म्हणणें असें की २०।२१ दिवस कमी मानण्यापेक्षा १०।११ दिवस हे कमी असल्यामुळें तेच उपेक्षणीय मानणें अधिक युक्त होय. याचा अर्थ असा की, आरम्भ दिवसा-पासून अन्तापर्यंत ४ महिन्याला ज्या गणनेने कमी किंवा अधिक दिव-साचें अंतर कमी ती गणना ग्राह्य समजली पाहिजे. आणि हेंच सयुक्तिक आहे. तेव्हां या दृष्टीने विचार केल्यास मल्लिनाथाने जी मासांची गणना केली ती चान्द्र म्हणजे अमान्त मास धरून केली हें उघड आहे. पण मास गणनापद्धति अमान्त ही एकच नसून दुसरी सौर म्हणजे पौर्णिमान्तीहि पद्धति आहे. आणि यक्ष व कालिदास हे दोघेहि औदीच्य असल्यामुळे त्यांना तीच विवक्षित असली पाहिजे. तेव्हां त्या पद्धतीने विचार केल्यास आषाढाचा पहिला दिवस म्हणजे आपल्याकडील जेष्ठ वद्य १ होत असल्यामुळे तेथून कार्तिक शुद्ध एकादशीपर्यंत मोजल्यास ४ महिने २६ दिवस होतात. म्हणजे २६ दिवस अधिक होतात. व आषाढाचा शेवटला दिवस म्हणजे आपल्या कडील आषाढ शुद्ध पौर्णिमा होत असल्यामुळें तेथून गणना केल्यास कार्तिक शुद्ध एकादशीपर्यंत ४ महिन्याला फक्त ४ च दिवस कमी

येतात. पण मी हें कार्तिक शुक्ल एकादशी म्हणजे प्रबोधैकादशी हाच उत्थान दिवस होय असें समजून सांगत आहे. पण खरें पाहिलें तर कालिदासाच्या वेळीं प्रबोध दिन कार्तिकाच्या अन्त्यदिनीं होत असल्यास चार दिवसाचेंहि अंतर रहात नाही. अर्थात या गणनेप्रमाणें 'आषाढस्य प्रशमदिवसे' हाच पाठ ग्राह्य ठरतो.

आता दुसऱ्या दृष्टीने विचार करूं. यक्षाला मेघदर्शन ज्या दिवशीं झालें तो नक्की दिवस कालिदासाने सांगितला आहे. हें वर आलेंच आहे. मेघ अमुक दिवशीं आला असें सांगण्यांत त्या दिवसापासून किंवा फार तर त्याच्या दुसऱ्या दिवसापासून पावसाळा सुरू झाला असा कालिदासाचा अभिप्राय असला पाहिजे. एरव्हीं नक्की दिवस सांगण्याला स्वारस्यच रहात नाही. मेघदर्शनापासून जर १ महिन्याने वर्षाकाळाला आरंभ व्हावयाचा तर प्रथम दिवस सांगण्याचें स्वारस्य काय? आषाढमासांत मेघ दिसला असें म्हटलें असतें तरी बिघडत नव्हतें. मग पहिला दिवस किंवा शेवटचा दिवस असें त्याने कशाला सांगितलें असतें? आणि ज्या अर्थी त्याने असें नक्की सांगितलें आहे, त्या अर्थी दुसऱ्या दिवसापासून पावसाळ्याला आरंभ होणार असेंच त्याला सुचवावयाचें होतें हें उघडच दिसतें. मेघाच्या वर्णनावरून (परिणत गजप्रेक्षणीयं) व त्याला पाहून यक्षाच्या झालेल्या स्थितीवरून (तस्यस्थित्वा कथमपिपुरः इत्यादि श्लोकांत वर्णिलेल्या) प्रावृट्मेघाला पाहूनच विरही जनाला विरहव्यथा होत असतात, या कविसंकेतावरून व पावसाळ्याच्या वर्णनावरून तो मेघ पावसाळी होता हें स्पष्ट दिसतें. पावसाळी मेघ पावसाळ्याच्या पूर्वी बरोबर१ महिना अगोदर आल्याची कल्पना विसंगत दिसते. या सर्व गोष्टीवरून मेघाचा दर्शनदिन हा प्रावृट् प्रारंभ दिनच किंवा ग्रीष्मान्त दिनच असला पाहिजे असें अनुमान निघतें.व तो दिन आषाढाचा अन्तिम दिन घेतला तरच सुसंगत होतो.

आता कालिदासाच्या वेळीं आताप्रमाणें ज्येष्ठ आषाढांत प्रावृट्काल प्रारंभ होत होता की काय हें पाहिले पाहिजे. त्याहि काळीं आषाढांतच जर पावसाळ्याला प्रारंभ होत होता असें दिसून आलें तर 'प्रथम दिवसे' हाच पाठ योग्य ठरेल. पण वर्षारंभ श्रावणांत

होत असला तर 'प्रथम दिवसे' हा योग्य ठरेल. मल्लिनाथाच्या मतें 'प्रत्यासन्ने नभसि' या श्लोकावरून वर्षारंभ श्रावणांत होत होता हें स्पष्ट आहे. पण नाथाच्या प्रतींत 'प्रत्यासन्ने नभसि' असा पाठच नाहीं तेथें 'प्रत्यासन्ने मनसि' असा पाठ आहे. पण तो चूक दिसतो. कारण 'प्रत्यासन्ने मनसि' याला कांहींच अर्थ नाही. वस्तुतः तो पाठ त्याज्यच आहे. तरी संशयात्मक म्हणून त्याचा उपयोग न करितां माझ्या अर्थाला पोषक असें दुसरें वाक्य कोठे सांपडतें काय याचा विचार करूं. सुदैवाने तो काल रघुवंशामध्यें एका श्लोकांत स्वतः कालिदासाने सांगितला आहे. तो श्लोक असा—

स जहार तयोर्मध्ये मैथिलीं लोकशोषणः
नभो नभस्ययोर्वृष्टिमवग्रह इवान्तरे ॥ १२।२९

तो विराध नांवाचा राक्षस राम आणि लक्ष्मण यांच्यामध्यें असलेल्या मैथिलीला म्हणजे सीतेला हरण करता झाला. कसा तर श्रावण आणि भाद्रपद या दोन महिन्यांच्यामध्यें असलेल्या वृष्टीला अवर्षणाने हरण करून न्यावें त्याप्रमाणें. यांत श्रावण आणि भाद्रपद हेच त्यावेळीं वर्षाऋतुचे दोन महिने होते हें स्पष्ट सांगितलें आहे.

याशिवाय रघुवंशाच्या तिसऱ्या सर्गांत पुढील श्लोक आढळतो—

''तदाननं मृत्सुरभिः क्षितीश्वरो रहस्युपाघ्राय न तृप्तिमाययौ
करीव सिक्तं पृषतैः पयोमुचां शुचिव्यपाये वनराजिपल्वलम्

येथें शुचिव्यपाये याचा मल्लिनाथाने 'ग्रीष्मावसाने' असा अर्थ केला आहे. पण 'शुचि' या शब्दाचा 'ग्रीष्म' हा अर्थ कांहीं कोषकारांनीं दिला असला तरी अमरांत तो अर्थ दिला नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अमरसिंहाने शुचि शब्दाचा 'आषाढ' असा अर्थ दिलेला आहे. ज्येष्ठे शुक्लः शुचिस्त्वयम् । आषाढे;

एवंच कालिदासाच्या काळीं पौर्णिमांत मास प्रचलित असल्याने 'आषाढस्य प्रथमदिवसे' हाच पाठ घेतला असतां सर्व श्लोक संगतवार लागतात. एरव्हीं तसे लागत नाहीत म्हणून 'प्रथमदिवसे' हाच ग्राह्य ठरतो.

---

टीपः—प्रस्तुत निबंध 'मध्यप्रांत संशोधन मंडळा'च्या सभेपुढे ता. १२-१-१९४१ रोजीं वाचण्यांत आला होता

# पुराणांतील आन्ध्रभृत्य राजवंश

लेखकः- म. म. वा. वि. मिराशी,
प्राचार्य, विदर्भ महाविद्यालय, अमरावती. )

हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास अद्यापि बराचसा अज्ञात आहे. गेल्या शंभर वर्षांत अनेक विद्वानांनी संस्कृत व प्राकृत वाङ्मय, शिलालेख, ताम्रपट, नाणीं इत्यादिकांचा अभ्यास करून भारताच्या प्राचीन इतिहासाची रूपरेषा निश्चित केली आहे. तथापि त्यांतील कित्येक कोनेकोपरे अद्यापि अंधारांत आहेत. या विशाल देशाच्या भिन्न भिन्न प्रांतांत प्राचीन काळीं राज्य करणाऱ्या राजवंशाविषयींहि आपणांस पुरेशी माहिती नाहीं. मग त्यांच्या काळीं होऊन गेलेले संस्कृत व प्राकृत ग्रंथकार, कलाकार, योध्दे इत्यादिकांविषयीं तसेंच तत्कालीन धार्मिक, सामाजिक, आर्थिक परिस्थितीविषयीं आपलें ज्ञान अत्यंत मर्यादित आहे, हें सांगणें नकोच. प्राचीन काळीं वाङ्मय, शास्त्रें, कला, शौर्य इत्यादि राजाश्रयाने भरभराटत असल्याने तत्कालीन राजवंश ही भारतीय इतिहासाची पोलादी चौकट होय, तेव्हां या राजवंशांविषयीं जितकी जास्त माहिती उपलब्ध होईल तितकी भारतीय इतिहासाच्या सर्वव्यापक ज्ञानास मदत होणार आहे. प्रस्तुत लेखांत दक्षिणच्या एका अज्ञात राजवंशाविषयीं अलीकडील संशोधनावरून उपलब्ध झालेली माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

पुराणांत प्रागैतिहासिक कालांतील सूर्यवंश, सोमवंश इत्यादि राजवंशाप्रमाणें ऐतिहासिक काळांतील प्रद्योत, शिशुनाग, नन्द, मौर्य, शुंग इत्यादि वंशांतील राजांचे त्रोटक उल्लेख आले आहेत. यांमधील बहुतेक राजवंश उत्तर भारतांतील आहेत. दक्षिणेंतील राजवंशांचा

क्वचितच उल्लेख आढळतो. याला अपवाद फक्त ' आंध्र ' वंश हा एक आहे. पुराणांत आंध्र वंशांतील राजांचीं नांवें व त्यांच्या कारकीर्दीचीं वर्षें दिलीं आहेत. पुराणें हीं वैदिक वाङ्मयाप्रमाणें मुखोद्गत करण्याचा प्रघात नसल्यानें लेखकांच्या प्रमादानें व अन्य कारणांनीं त्यामध्यें अनेक पाठभेद उत्पन्न झाले आहेत. व त्यांतील कांहीं माहिती तत्कालीन शिलालेखादि अस्सल पुराव्यावरून पडताळून पाहतां बरोबर ठरत नाहीं. तथापि उपलब्ध साधनांच्या साहाय्यानें या माहितीचा योग्य उपयोग केल्यास आपल्या प्राचीन इतिहासाच्या ज्ञानांत पुष्कळ महत्वाची भर पडते यांत संशय नाहीं.

पुराणांतील माहिती प्रमाणें शुंग व काण्व राजवटीनंतर आंध्रांचा दक्षिणेंत उदय झाला. या राजवंशाचा संस्थापक म्हणून शिशुक नृपतीचें नांव पुराणांत येतें. हा शिशुक व जुन्नर जवळच्या नाणे घाटांतील लेण्यांत ज्याची कोरलेली मूर्ति अद्यापि भग्नावस्थेंत विद्यमान आहे तो शिमुक हे एक होत हें अनेक पुराव्यांवरून दाखवितां येतें. पुराणांत याला आंध्र वंशाचा पहिला राजा असें म्हटलें असलें तरी तो वंश त्यापूर्वी निदान पन्नास पाउणशे वर्षें दक्षिणेंत राज्य करीत होता असें अलीकडील संशोधनावरून सिद्ध झालें आहे. कोरीव लेखांत या वंशाला ' सातवाहन-कुल ' असें म्हटलें आहे याचें कारण या वंशाचा संस्थापक सातवाहन नामक राजा होता. या राजाचें नांवहि पुराणांत येत नाहीं, तथापि त्याचीं दोन तांब्याचीं नाणीं अलीकडे सांपडलीं आहेत त्यावरून त्याच्या तत्कालीन अस्तित्वाविषयीं संशय राहत नाहीं. यापैकीं एक नाणें औरंगाबादेस व दुसरें वरंगळ जवळ सांपडलें होतें असें समजतें. सातवाहनाच्या वंशजांचे पहिले पहिले लेख महाराष्ट्रांत जुन्नर, नाशिक वगैरे ठिकाणीं आढळतात. त्यांच्या नाण्यांचे संचय मध्यप्रांत-वऱ्हाडांतील अकोला व चांदा जिल्हे व निजामच्या संस्थानांतील कोंडापूर येथें सांपडले आहेत. त्यांची राजधानी गोदावरीच्या कांठीं प्रतिष्ठान ( सध्याचें पैठण ) येथे होती. या सर्व पुराव्यावरून हें राजकुल मूळचें आंध्र नसून महाराष्ट्रीय होतें यांत संशय नाहीं. पुढें यांच्या साम्राज्याचा

विस्तार पूर्वेस समुद्र किनाऱ्यापर्यंत होऊन त्यांत आंध्र देश अन्तर्भूत झाला म्हणून त्याला 'आंध्र' असें पुराणांत म्हटलें असावें.

आंध्र राजवटीचा अस्त इ. स. २५० च्या सुमारास झाला. त्या नंतरच्या राजवंशांविषयीं पुराणांत खालील उल्लेख आढळतात.

आंध्राणां संस्थिते राज्ये तेषां भृत्यान्वया नृपाः ।
सप्तैवान्ध्रा भविष्यन्ति दशाभिरास्तथा नृपाः ॥

( अर्थः--आंध्रांच्या राज्याचा अस्त झाल्यावर त्यांच्या भृत्य वंशांत सात आंध्र व दहा आभीर राजे होतील. )

यांपैकीं आभीर वंशांचें राज्य आंध्र किंवा सातवाहन कालानंतर महाराष्ट्रांत पसरलें हें आतां सिद्ध झालें आहे. या राज्याचा मूळ संस्थापक आभीर नृपति ईश्वरसेन हा होता. याच्या काळचा एक कोरीव लेख नाशिकच्या लेण्यांत अद्यापि विद्यमान आहे. याने इ स. २४९ मध्यें स्थापलेला शक महाराष्ट्र, गुजराथ, कोंकण, मध्य हिंदुस्थान इत्यादि प्रदेशांत आभीर साम्राज्याच्या विस्ताराबरोबर प्रचलित झाला. पुढें त्याचा उपयोग उत्तर हिंदुस्थानादि देशांवर राज्य करणाऱ्या कलचुरि राजांनीं केला म्हणून त्याला 'चेदिकाल' किंवा 'कलचुरिकाल' असें नांव प्राप्त झालें. आभीर वंशांत दहा राजे होऊन गेले. त्यांनीं १६७ वर्षे राज्य केलें असें पुराणांतील उल्लेखावरून दिसतें.

आभीरांप्रमाणें आन्ध्रभृत्य राजांचाहि उदय आन्ध्र किंवा सातवाहन राजवटीनंतर झाला असें पुराणांतील वरील श्लोकांत म्हटलें आहे. त्याविषयीं काय माहिती मिळतें तें आतां पाहूं.

गेल्या दोनतीन वर्षांत दक्षिण हैद्राबादचे प्रसिद्ध नाणकसंग्राहक श्रीयुत हरमुझ कौस या पारशी गृहस्थांनी तीनचार नाण्यांचे छाप मजकडे पाठविले. हीं नाणीं मी भारतीय नाणक मंडळाच्या नियतकालिकांत प्रसिद्ध केलीं आहेत. त्यापैकीं एक नाणें अत्यंत प्राचीन आहे. हें नाणें चौकोनी असून त्याच्या पुढील भागावर वृषभाची आकृति व स्वस्तिक चिन्हें दिसतात. वरच्या भागी 'रंञो सेवकस'

( राजा सेवकाचें ) अशी अक्षरें प्राकृत भाषेंत कोरलीं आहेत. नाण्याच्या मागील भागावर नन्दीपद, नागचिन्हें व उज्जैनी चिन्हांचीं वर्तुळें दिसतात. नाण्यावरील अक्षरवाटिका व चिन्हें हीं अत्यंत प्राचीन आहेत. त्यावरून सेवक राजा मौर्य कालानंतर लौकरच उदयास आला असावा असें दिसतें. अशीं वृषभांकित चौकोनीं नाणीं विदर्भांतहि सांपडलीं आहेत. या तऱ्हेचें दिमभाग नामक राजाचें नाणें मध्यप्रांतांच्या भंडारा जिल्ह्यांतील पौनी नामक गांवांत सापडलेलें प्रस्तुत लेखकानें प्रसिद्ध केलें आहे. त्याचीहि अक्षरवाटिका अशीच प्राचीन आहे.

सातवाहन व गुप्त नृपतींप्रमाणें हा सेवक राजाहि राजकुल संस्थापक होता असें दिसतें. गतवर्षी श्री. कौस यांनीं दोन नाण्यांचे छाप मजकडे पाठविले. हीं नाणीं वर्तुळाकृति आहेत. त्यांच्या पुढील बाजूवर डावीकडे तोंड करून उभा राहिलेला घोडा, त्याच्या समोर चक्र व पाठीवर एक प्राचीन चिन्ह हीं दिसतात. सभोंवार ' कससिवसेवकस ' अशीं अक्षरें आहेत. मागील बाजूवर बौद्धस्तूप व त्याखालीं नंदी यांच्या आकृति आहेत.

नाण्यांवर आलेलें राजनाम पूर्ण नाहीं. आरंभींचें एक अक्षर नाण्यावर आलें नाहीं. पूर्ण नांव 'पकससिवसेवकस' असें असावें. त्याचा अर्थ 'हें नाणें प्रकाशशिवसेवकाचें' असा होईल. त्यावरून प्रकाशशिव राजा सेवकवंशी होता व त्या वंशाला हें नांव त्याचा मूळ पुरुष 'सेवक' याच्यापासून प्राप्त झालेलें दिसतें. अशा प्रकारचीं कांहीं उदाहरणें भारताच्या प्राचीन इतिहासांत आढळतात. सुविख्यात गुप्तवंश गुप्त नामक राजानें स्थापला होता व म्हणून त्या वंशांतील चंद्रगुप्त, समुद्रगुप्त, कुमारगुप्त इत्यादि सर्व राजांनीं आपल्या नांवांनंतर ' गुप्त ' असें पद लावलें होतें. तसाच प्रकार या ' सेवक ' वंशाच्या बाबतींत झालेला दिसतो.

अक्षरवाटिकेवरून प्रकाशशिव सेवकाचें नाणें मूळ वंशस्थापक सेवक राजानंतर कित्येक शतकांनीं पाडलेलें दिसतें. त्याची घडणहि सेवक राजाच्या नाण्याहून निराळी आहे. अशा तऱ्हेचीं अश्वांकित

नाणीं आंध्र किंवा सातवाहनवंशांतील यज्ञश्रीसारख्या शेवटच्या कांहीं राजांनी पाडलीं होतीं. या तऱ्हेचें एक नाणें कोंडापूर येथील उत्खननांत सांपडलें आहे; त्यावरचीं अक्षरें अस्पष्ट असलीं तरी त्या ठिकाणच्या इतर नाण्यांवरून तें नाणेंहि सातवाहनवंशी राजानें पाडलेलें असावें असा तर्क केल्यास तो चूक ठरणार नाहीं. सातवाहनांच्या या अश्वांकित नाण्यासारखीं नाणीं प्रकाशशिव सेवकानें पाडलीं होतीं. त्यांवरून तो सातवाहनानंतर लौकरच होऊन गेला असें दिसतें.

सातवाहनांचें राज्य महाराष्ट्र, विदर्भ व आंध्र या सर्व प्रांतांवर होतें. सातवाहनांचा अस्त झाल्यावर उत्तर महाराष्ट्र आभीर राजांच्या अमलाखालीं गेला. विदर्भ व दक्षिण महाराष्ट्र येथें वाकाटकवंशी विंध्यशक्ति नृपतीनें आपली सत्ता प्रस्थापित केली. आंध्र देशाच्या कांहीं भागांत (सध्या निजामच्या राज्यांत अन्तर्भूत झालेल्या प्रदेशांत) या सेवकवंशी राजांनी आपलें स्वातंत्र्य पुकारून राज्य स्थापलेलें दिसतें.* तन्निदर्शक त्यांनीं हीं नाणींहि पाडलीं असावीं. पूर्व आंध्र प्रांतावर इक्ष्वाकुवंशी राजांचें राज्य झालें असें नागार्जुनीकोंड येथें सांपडलेल्या अनेक शिलालेखांवरून आतां सिद्ध झालें आहे. तेव्हां सेवकवंशी राजांच्या अमलाखालीं फक्त पश्चिम आंध्रप्रांत होता असें दिसतें.

या राजवंशाचा मूळ संस्थापक सेवक हा स्वतंत्र राजा होता. तथापि त्याच्या काळानंतर सातवाहनांच्या साम्राज्यांत त्याच्या वंशजांना मांडलिकत्व प्राप्त झालें असावें. सातवाहनांच्या काळानंतर त्यांना स्वातंत्र्य प्राप्त झाल्यामुळें त्यांचा उल्लेख पुराणांत आला आहे. हे राजे पूर्वी सातवाहन किंवा आंध्रराजांचे मांडलिक होते म्हणून पुराणांत त्यांना ‘ आन्ध्रभृत्य ’ म्हटलें आहे. शिवाय ते आपणांस सेवकवंशी म्हणवीत. संस्कृतांतील ‘ वबयोरभेदः ’ या न्यायानें त्या सेवकांना कालांतरानें सेवक म्हणूं लागले तर आश्चर्य नाहीं. किंबहुना ‘ सेवकस ’ अशी किंचित् अस्पष्ट अक्षरें असलेल्या एका नाण्याचा फोटो हैदराबाद संस्थानांतील पुराण वस्तुसंशोधनखात्याचे प्रमुख ख्वाजा मुहम्मद अहमद यांनी मजकडे पाठविला होता; त्यावरून

या वंशांतील नंतरच्या कांहीं राजांनी ‘ सेवक ’ नांव धारण केलें होतें असें स्पष्ट दिसतें.

पुराणांतून वर उध्दृत केलेल्या श्लोकांत ज्या आंध्रभृत्य राजांचा निर्देश आहे ते व सातवाहन किंवा आंध्र नृपति हे एकच होत, असें कै. डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकरांनीं आपल्या ‘ दक्षिणच्या प्राचीन इतिहासांत ’ म्हटलें आहे. पण वरील विवेचनावरून ते आंध्रनृपतींहून निराळे असून सेवकवंशी होते हें वाचकांच्या ध्यानांत येईल. असे राजे सात होऊन गेले व त्यांनी बावन्न वर्षे राज्य केलें असें पुराणें सांगतात. ( आन्ध्राः श्रीपर्वतीयाश्च ते द्विपञ्चशतं समाः । ) त्यापैकीं एका ‘ प्रकाशशिव ’ नामक नृपतीचें नांव नुकत्याच उपलब्ध झालेल्या नाण्यांवरून ज्ञात झालें आहे. बाकीच्या राजांचीं नांवेंहि यापुढील संशोधनानें विस्मृतींतून बाहेर पडतील अशी आपण आशा करूं या.

कै. म. म. द. वा. पोतदार, ग्रंथ संग्रह

# नागपुरांतील साहित्यिक परंपरा, वेद-विद्या व ज्योतिष इत्यादि

**नरः पतितकायोऽपि यशःकायेन जीवति**

( ले० : श्री. दे. गो. लांडगे )

भोसल्याचे वेळीं प्रत्येक प्रमुख सरदार व राज मंडळांतील पुरुष व राण्या यांचेकडे धार्मिक शिक्षणाकरितां एक पुराणिक असे. त्याने दररोज विशिष्ट वेळीं येऊन वाड्यांत पुराण सांगावयाचें असा प्रघात असे. जे पहिल्या दर्जाचे विद्वान असत ते मुख्यतः शास्त्रार्थ सांगत व दोघानाहि राजाश्रय असे. कांहींना मोकासेहि होते. अशा शास्त्री, पंडित, गोसावी, मंत्रशास्त्री, तपस्वी वगैरेची संख्या राज्य बुडाल्याचे वेळीं १९० होती व त्यांना १०१६१ रु. वार्षिक बैठें वेतन मंजूर झालें होतें. यावरून दरमाणसी सरासरी वार्षिक ५३ रु. येतें व त्यांच्यावर कोसळलेल्या दारिद्याचीहि कल्पना येतें.

२. कोणत्याहि इतिहास ग्रंथांत किंवा कागद पत्रांत पंडितांचा विशेष उल्लेख सापडत नाहीं. जो कांहीं इतिहास उपलब्ध आहे तो राजकीय स्वरूपाचा असल्या कारणाने सांस्कृतिक इतिहासाचीं साधनें अत्यंत विरल व दुर्मिळ आहेत. संतांची ठाव ठिकाणें सापडतात व वंशजहि आहेत, परंतु शास्त्री पंडितापैकी अनेक कुटुंबें नामशेष झालीं आहेत. जीवन कलहामुळे व राजाश्रय गेल्यामुळें झालेल्या वृत्तीच्छेदामुळे त्यांचेपैकीं कांहींचे तुरळक तंतू तेवढे हातीं गवसतात. जुन्या सरकारी अधिकाऱ्यांचे कांहीं तरी अवशेष शिल्लक आहेत. तथापि बदलत्या काळाची काळोखी छाया त्यांच्यावरहि पडली आहे. वैदिक, वैद्य व कलाकार इत्यादि वर्गाची परंपरा मागील पिढी पावेतों कांहीं तरी अंशाने कायम होती. पंडितांविषयीं एवढेंच म्हणतां येईल की त्यांच्या कक्षेंत जेवढी मंडळी आली त्यांचे पैकीं कांहींनी नव विद्येचा स्वीकार करून त्यांत आपलें नांव काढलें.

३ पेशवाईच्या काळांत व यापूर्वीहि विदर्भांत व महाराष्ट्रांत अनेक विद्वान प्रसिद्धीस आलेले दिसतात, तसें नागपूर प्रान्ताचे नाही. याला ऐतिहासिक कारणें आहेत व जुनी परंपरा तुटली व नवीन दृढमूल होण्यापूर्वीच महाराष्ट्रीय राजवट विलयास गेल्यामुळें ज्या तोलाचे विद्वान विदर्भांत झाले तेवढे येथें झाले नाहीत. दुसरें मुलुखहि डोंगराळ, व झाडीचा असल्यामुळें मैदानी भागावर जेवढी प्रगति सौकर्यानें होणें शक्य असते तेवढी ती होणे येथें शक्य नव्हतें या व अशा इतर कारणांची चर्चा करण्यांचें हें स्थळ नव्हे. तरी एवढें सांगितलें पाहिजे कीं, देवगडच्या गोंडराजांचे पाय या भागाला जेम तेम लागले तोंच त्यांना औरंगजेबच्या काळांत मुसलमानी दीक्षा घ्यावी लागली. चंद्रपूरच्या गोंडराजानी कांहीं महाराष्ट्रीय व कलिंगजनतेच्या मदतीनें विद्येला वगैरे उत्तेजन दिले; नाहीं असें नाहीं. परंतु देवगडच्या व चांद्याच्या दोन्ही गोंडराजांवर मराठ्यांची जरब बसली भोसल्यांचे आरंभीची ५०-६० वर्षे नवीन प्रान्त जिंकणें व ते अमलाखाली आणणें, पुणे दरबारशी कधीं वितुष्ट तर कधीं सलोखा गृहकलह व भाऊबंदकी यांत गेल्यामुळें १८ व्या शतकाच्या अंत्यपादापर्यंत या प्रान्तास शांतता लाभली नाहीं. ही संधि आली तोंच इंग्रजांचें संकट आलें व अडगांवच्या १८०३ च्या लढाईने अर्धे अधिक राज्य विलयास गेलें. विद्वान लोकांना शान्ति लाभल्याशिवाय त्यांचे कडून सरस्वतीची सेवा होऊं शकत नाहीं. तथापि द्वितीय रघूजींच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धापासून म्हणजे १८९० ते १८९५ पासून आपल्याला विद्वन्मंडळीचा मागोवा घ्यावयास मिळतो.

४. चंद्रपूर व छत्तीसगड हे इलाखे प्रथम रघूजींचे एक पुत्र बिंबाजी यांचे नंतर मधला थोडा काळ सोडून दिल्यास द्वितीय रघूजींचे तिसरे व धाकटे बंधु व्यंकोजी उर्फ नानासाहेब यांचेकडे आले. व्यंकोजीचा मृत्यु १८११ सालीं झाला. त्यांचे नंतर त्यांचे चिरंजीव प्रसिद्ध अप्पासाहेब भोसले हे स्थानापन्न झाले. यांच्यांतील अवगुण द्वितीय रघूजी जिवंत असताच दृग्गोचर व्हावयास लागले. स्वतःचा मुलगा परसोजी राज्य चालविण्याच्या दृष्टीनें निरुपयोगी असल्यामुळें

द्वितीय रघूजीची भिस्त आपासाहेबावर होती. उलट आपासाहेबाने मात्र आपल्या आग्रही स्वभावामुळें व तारुण्याच्या मदांत चुलत्याचा द्रोह करणें सुरू केलें. वरि राघवाचार्य नांवाचे पंडित द्वितीय रघूजीकडे तर कृष्णशास्त्री रामानुज आपासाहेबाकडे असे दोन प्रतिद्वंद्वी पंडित होते. या दोहींत कोण सरस समजावा हें निश्चित करण्याचा प्रश्न उद्भवला. तेव्हां मध्यस्थ म्हणून काशीचे तरुण पंडित वैय्याकरणकेसरी सदाशिव भट्ट धुले यांस मुधोजीने पाचारण केलें. मुधोजीच्या पत्रास उत्तर म्हणून सदाशिव भट्टांनी एक पत्र पाठविलें. तें विद्वन्मणि म. म. कृष्णशास्त्री घुले यांच्या जवळ आहे. मुधोजी उर्फ आपासाहेब यांची राजकीय भूमिका काय आहे हें माहीत नसल्याकारणानें त्या पत्रांत शास्त्रीबोवांनी आपासाहेबांची स्तुति केली आहे. वस्तुतः शास्त्रीबुवानी केलेल्या स्तुतीस तो मुळीच पात्र नव्हता. त्यांत दोन संस्कृत श्लोक, एक संस्कृत गद्य वाक्य व तीन वाक्यें 'भाषया' म्हणजे मराठी गद्यांत लिहिलीं आहेत. पत्रावर शक नाहीं. तरी शास्त्री बुवा नागपुरास द्वितीय रघूजीच्या मरणापूर्वी म्हणजे २२-३-१८१६ पूर्वी वर्षसहामहिने आधीं आले असावे. कित्येक पिढयापासून महाराष्ट्रातील अनेक लोक काशीवास करीत आले आहेत. काशी हे विद्यापीठ व पुण्यभूमि असल्या कारणाने पुष्कळ महाराष्ट्रीय मंडळीनी तेथें कीर्तीहि मिळविली होती. १९३४ साली म. म. कृष्णशास्त्रींनी स्वतः वागीश्वरी मासिकात नागपुरातील साहित्यिकांची माहिती दिली आहे. तींत स्वतःच्या कुटुंबांचीहि माहिती दिली आहे. ह्या व इतर आधारावरून जें संक्षेपतः सांगता येईल तें सांगितलें पाहिजे. सदाशिव भट्टांचेहि मूळ कुटुंब दक्षिणचेंच. यांचे मूळ पुरुष गंगाराम भट्ट हे काशींत आले. यांचे पासून विद्यमान म. म. कृष्णशास्त्री ११ वे पिढींतील होत. सदाशिव भट्टापासून ५ पिढ्यापूर्वी अनंतभट्ट नांवाचे जाडे पंडित होऊन गेले. यांनी 'दुर्बोध पदचंद्रिका' नांवाची महाभारतावर टीका लिहिली आहे. यानांच वेद व्यासांचें दर्शन होऊन त्यानी तुझ्या कुटुंबांत सारखे विद्वान निपजतील म्हणून शुभाशीर्वाद दिला होता. याचे नंतर एक पिढी सोडून राजाराम भट्ट व पुढे दोन

पिढ्यांनी रामकृष्ण भट्ट हे मोठे पंडित झाले. या दोघांनीहि कित्येक प्रमाण ग्रंथांवर टीका लिहिल्या आहेत. रामकृष्ण भट्टांचे चिरंजीव सदाशिव भट्ट होत व हेच सुमारे ३५ वर्षांच्या वयांत ( जन्म इ. स. १७८१ ) नागपुरास आले यांनीं शब्देन्दु शेखरावर 'शेखरविवृत्ति' नांवाची शाश्वत कीर्ति संपादन केलेली टीका लिहिली आहे. हिचा पाठ सांगणारे काशींत देखील दुर्मिळ आहेत. त्यांनी परिभाषेन्दु शेखरावरहि विवृत्ति लिहिली होती पण ती उपलब्ध नाही. एके प्रसंगीं त्याचें व्याकरण व न्याय या शास्त्राचे गुरु प्राणनाथाचार्य व अमृतराव पेशव्यांचे पदरचे विद्वान् **गंगाधर शास्त्री गाडगीळ** यांच्याशीं वाद चालला असतां प्राणनाथाचार्य अडचणींत सांपडले. त्यावेळीं खास परवानगी घेऊन सदाशिव भट्ट पुढे आले व दोन तीन कोट्यांत गाडगीळ शास्त्रींना निरुत्तर केलें. या प्रसंगीच सदाशिव शास्त्रींना पेशव्यांनी 'वैयाकरण केसरी' ही बहुमानाची पदवी बहाल केली. सदाशिव भट्ट नागपुरास आल्यावर त्यांना नागपूरच्या दोन उपरोक्त पंडितांच्या वादांत पंच म्हणून नेमिलें. वाद २१ दिवस झाला. शेवटीं दोघेहि तुल्यबल आहेत म्हणून शास्त्रीबुवांनी निकाल दिला व राजानें २५०० रु. उत्पन्नाचा मोकासा देऊन त्यास नागपूर येथें स्थाईक केलें.

नागपुरास असतां सदाशिव भट्टाकडे अनेक विद्यार्थी शिकत कित्येकांचा पोषण खर्चहि शास्त्रीबुवाच निभवीत. त्यामुळें कर्जहि झालें. अशा एका प्रसंगांतून नागपूर येथील सरदार यादवराव काळू यानी त्याना ऋणमुक्त केल्याची कथा आहे. यांचा स्वभाव फार करारी असून वृत्तीनें निस्पृह असत. त्यांचा राजा व प्रजा दोघांवरहि धाक असे व त्याचा निर्णय शेवटचा समजला जाई. मृत्यु इ. स. १८५८. कुटुंबांचा विस्तृत परिचय देण्याचें हें स्थळ नव्हे तरी थोडासा क्रम लक्षांत यावा म्हणून लिहिलें पाहिजे. यांना दोन मुलें झालीं व तीं मोठीं होऊन शास्त्रीबुवांच्या समोरच निवर्तलीं. पैकी एकाचे म्हणजे हरीराम शास्त्रींचे पुत्र सीताराम शास्त्री ऊर्फ भाऊशास्त्री हे होत. ते विद्यमान कृष्णशास्त्रींचे वडील होत. ९५ वर्षांच्या वयांत १९२५

सालीं ते निवर्तले. तेहि उत्तम वैयाकरण असून त्यांच्या वाक्सिद्धीबद्दल कांहीं गोष्टी प्रसिद्ध आहेत. त्यांचे बंधु विश्वनाथ भट्ट उर्फ बावाजी घुले हे गायन विद्येंत तज्ञ होते. ते कधीं बैठकींत म्हणत नसत. फक्त पुराण प्रवचन रूपानें आपला गुण प्रकट करीत व विद्यार्थ्यांस शिकवीत. हल्ली या कुटुंबांत एक म. म. कृष्णशास्त्री, वे. शा. लक्ष्मण शास्त्री व ॲडव्होकेट बाबूराव घुले प्रभृति मंडळी आहेत. दुर्दैवानें कृष्णशास्त्रींना अंधत्व आलेलें आहे. सदाशिव भट्टानाहि याच आपत्तीशी सामना करावा लागला. अशी या कुटुंबाची त्रोटक माहिती आहे. म. म. कृष्णशास्त्री घुलेविषयी एक माहितीपूर्ण ग्रंथ तयार होत असल्या कारणानें त्यांच्या विषयीं लिहिण्याचें प्रयोजन नाही. तसा त्यांचा परिचय अखिल महाराष्ट्राला या पूर्वीच त्यांच्या विद्वत्ता प्रचुर लिखाणामुळे झालेला आहे. हल्ली त्यांचें वय ७८ वर्षांचें असावें. तरी त्यांची ज्ञान पिपासा अजून कायम आहे व योग्य मदत मिळाल्यास वेळोवेळी संशोधनात्मक लेखहि लिहीत असतात. मध्यप्रांत संशोधन मंडळाचे ते एक उपाध्यक्ष असून त्यांची त्य. संस्थेविषयीची कळकळ कायम आहे.

६. वै. केसरी सदाशिव भट्ट घुले यांच्या प्रमुख शिष्यांपैकीं काशीतील पं. भिकोबा पाठक हे एक व नागपुरांतील पं. रंगाचार्य हे दुसरे होत. पं. भिकोबा पाठक शास्त्रीबुवाजवळ अध्ययन केल्यावर काशीस जाऊन राहिले. पंडित रंगाचार्य हे मात्र नागपुरास आर्वीकर शास्त्रींच्या घरामागे रहात. पंडित रंगाचार्य हे भरत खंडांतील प्रथम श्रेणीच्या पंडितांपैकीं असत असे लेखकास कै. पं. प्रभाकर शास्त्री रोडे [ मृत्यु २८–९–४६ ] यांनी सांगितलें आहे व हेंच नागपुरांतहि कित्येक वृद्धांच्या तोंडून आम्ही ऐकिलें आहे.

७. सदाशिव भट्ट घुले यांचे समकालीन व कांहीं अंशानें प्रतिस्पर्धी असे दुसरे एक पंडित नागपुरास नावाजले होते. त्यांचें नांव **सीतारामशास्त्री केळवदकर** हें होय. असें सांगतात कीं, सामान्यतः त्यांच्या नांवाचा उच्चार सदाशिव भट्ट करीत नसत. त्यांना ते गरूड खांब या नावानें संबोधीत उलट सीताराम शास्त्री सदाशिवभट्टांना

'केळीबाग' असें म्हणत. कारण सीतारामशास्त्री इतवारींत गरूड खांबाजवळ राहत व बुलेशास्त्री मुन्नालाल हलवायाच्या घरामागे केळी-बागाजवळ असत. सिताराम शास्त्रींचे वडील शिवराम भट्ट हे येथील एक सिद्धपुरुष व पंडितै **मृत्युंजय शास्त्री कोकीळ** यांचे जवळ शिकले. शिवरामभट्टांचे एक सहाध्यायी **सिताराम शास्त्री वखरे** हे होत. यांच्या जवळ सिताराम शास्त्री केळवदकरांचें अध्ययन झालें, हे उत्तम नैय्यायिक म्हणून प्रसिद्ध असून राजाची शिष्यवृत्ति घेऊन काशीहून शिकून परत आल्यावर त्यांना सदाशिव भट्टांच्या सल्ल्यावरुन राजाने सर न्यायाधीश नेमलें होतें. नागपुरांत तृतीय रघूजींच्या वेळीं कलंकी प्रकरण म्हणून एक सामाजिक बहिष्काराचें प्रकरण उद्भवलें होतें. स्वत: राजाचा कल बहिष्कृतांना शुद्ध करून घेण्या-कडे वळत होता व त्याच मताचे सिताराम शास्त्रीहि होते, परंतु बुले शास्त्री अधिक काटेकोर व शास्त्रीय वृत्तीचे असल्यामुळें ते राजाशी शास्त्रदृष्ट्या सहमत नसत. व्यवहारत: तेहि अनुकूल असावे, कारण तसे ते मनाने उदार असत. सिताराम शास्त्री हे तृतीय रघूजींच्या मृत्यू नंतर ३-४ वर्षांनी दिवंगत झाले. मृत्युसमयीं त्यांचें वय ६५ वर्षांचें होतें. रुक्मांगदशास्त्री ( सिटीकॉलेजच्या दक्षिणेस ) बाळा-शास्त्री देवपुजारी ( नागोबाची गल्ली ) जयत्र्यंकटाचार्य व गजानन शास्त्री वखरे हे त्यांचे प्रमुख शिष्य होत. या सर्व पंडितांच्या उद्बोधक कथा लेखकांच्या संग्रहीं आहेत; त्या स्वतंत्रपणे संकलित करावयास हव्या.

८ पं. **गजाननशास्त्री वखरे** हे दोन पिढ्यापूर्वीं प्रसिद्ध नैय्यायिक नागपुरांत होऊन गेले. यांचें कुटुंब मूळ पैठणचें असून वृत्तीकरितां वसइ येथे आले व तेथून पुढे त्यांनी नागपुरास स्थलान्तर केलें. यांचे वडील पं. सिताराम शास्त्री यांचा वर उल्लेख आला आहे. नागपुरांत पं. **रामशास्त्री खरे** म्हणून एक साहित्यिक असत. त्यांचे

---

१ यांचें घर म्हणजेच गोपाळराव गुजराथी सावकार यांचें पातालेश्वर रोडवरील घर होय.

जवळ गजानन शास्त्री काव्य शिकले व न्याय शिकण्याकरितां त्यानी सिताराम शास्त्री केळवदकरांचें शिष्यत्व पत्करिलें. त्या नंतर गुरूनेच व्याकरणाचे अध्ययनाकरितां त्यांचे वाह्यतः विरोधी असे सदाशिव भट्ट घुले यांचे कडे वखऱ्यांना पाठविलें. वरील पंडितां पैकीं ग्रंथकार असा कोणीच नाही, तरी गजानन शास्त्रांनी राजाच्या मृत्यूवर 'गोपी-सान्तवन' या नांवा खाली एक आर्याशतक लिहिल्याचे ऐकिवांत आहे. शास्त्री बुवांची कीर्ति पुणे बडोद्या पावेतों पसरली होती. त्यांचा बडोदे सरकारने एका प्रसंगी गौरवहि केला व नोकरीहि देऊं कली, पण ती त्यानीं स्वीकारली नाहीं. त्यांचा स्वभाव फार प्रेमळ व विनोदी असे. मताने ते अगदी पुराणमतवादी नव्हते, कारण नैयायिकाची बुद्धि तर्ककर्कश अधिक. शास्त्रीबुवांच्या जवळ पुष्कळ लोक शिकावयास असत, पण काळ बदलल्या मुळें कोणी नैपुण्य संपादन केलें नाहीं. विद्यमान दादासाहेब जामदार, कै. राजेबहादुर जानोजी महाराज प्रभृति हे शास्त्रीबुवांच्या शिष्यवर्गापैकीं होत. म. म. कृष्णशास्त्री घुले म्हणतात. "शास्त्रीबुवा दिवंगत झाले त्यांच दिवशीं न्याय शास्त्र नागपुरांतून निघून गेलें." मृत्यु १९०४ सालीं झाला. शास्त्रीबुवानंतर त्यांचेकडे जुनी विद्या एका पिढीच्या वर राहिली नाहीं. त्यांचें घर गजानन तात्या साल्पेकरांचे देवस्थानाचे मागे असे. हल्ली तेथें श्री. भागवतवार असतात.

९. नागपुरांतील दोन पिढ्यापूर्वीचे दुसरे एक विद्वान कै. म. **जयकृष्ण उर्फ भट्टजी शास्त्री घाटे** हे होत. यांचा जन्म तळेगांव दशासर येथें १८३४ इ.त झाला. या गावावरून अनेक मंडळी नागपुरकडे येऊन रायपुर पर्यंत पसरली आहे व त्यानी आपापल्या परी कीर्तीहि मिळविली आहे. यांच्या वडीलांचे नांव श्रीकृष्ण. हेच नागपुरास आले. शास्त्रीबुवांचे गुरु, कृष्णशास्त्री वार्शीकर उर्फ लंगडे, हे होत. हे दारिद्र्यास कंटाळून नागपुरास आले व भटजी शास्त्रीनी त्यांच्या ज्ञानाचा लाभ घेतला. कृष्णशास्त्री, सदाशिव भट्ट घुल्यांचे शिष्य असून काळु-पुऱ्यांत राहत असत. पंडित रंगाचार्य, भिकोबा पाठक व कृष्णशास्त्री

लंगडे हे व्याकरण दिग्गज जो पावेतो नागपुरांत असत, तो पावेतो व्याकरणाची विद्या नागपुरांत दुमदुमत होती. त्याच कीर्तीचा लाभ भटजी शास्त्रींनाही झाला. विशेषतः कॉलेजांतील प्राध्यापक, रा. ब. वाडेगांवकर, कै. म. म. प्रो. ताम्हण, कै. म. म. प्रो. देहाडराय, कै. प्रो. जटार, कै. प्रो. गर्दे प्रभृति विद्वानानीं भटजी शास्त्रींच्या व्याकरणाच्या ज्ञानाचा पुरेपूर लाभ घेतला, शास्त्री बुवांची उत्तररामचरित्रावरील टीका प्रसिद्ध आहे. कै. बाळाशास्त्री घाटे. कै. भाऊजी उर्फ धुंडीराज जोशी, कै. राधाकृष्ण पाणशे, कै. गोविंद शास्त्री [ वर्धा ] कै. लक्ष्मणशास्त्री देव, कै. मार्तंड बापुजी बाईकर ही सर्व मंडळी शास्त्रीबुवाजवळ अध्ययन केल्यापैकीं होत. शास्त्रीबुवांचे जेष्ठ चिरंजीव कै. पंढरीनाथ शास्त्री यांच्या बुद्धिमतेची कल्पना नागपुरांतील जनतेपैकीं अनेकास आहे. त्यांचे पुतणे हे वकील असून संस्कृत विषयांत एम्. ए. आहेत. भटजी शास्त्रींना १९०० सालीं सरकारनें महामहोपाध्याय ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. त्यांचा मृत्यु १९१० सालीं झाला. मरण समयी त्यांचें वय ७६ वर्षांचें होतें. त्यांचा फोटो वेद शाळा व भोसला नगरभवनांत पाहावयास मिळतो.

१०. नागपुरांतील दुसरे एक महान् विद्वान् परंतु दुर्दैवानें लोकांत कमी प्रसिद्ध असलेले गृहस्थ म्हणजे **गंगाधर शास्त्री मंग्रूळकर** हे होत. यांच्या कुटुंबाविषयी आम्ही स्वतंत्र लेख लिहिला आहे. यांचा जन्म १७९० सालीं झाला असावा. हे कै. सदाशिवभट्ट घुले, कै. सिताराम शास्त्री केळवदकर यांचे वेळीं हयात असून त्यांचा शके १७६९ सालीं गंगाधर शास्त्रींनी स्वतः लिहिलेल्या कल्की प्रकरणाच्या हकीकतींत स्पष्ट उल्लेख आलेला आहे. यांचे धाकटे बंधु चंद्रमा शास्त्री हे होत व त्यांचे वंशजांपैकीं चि. श्रीधरराव मंग्रुळकर ॲडव्होकेट वगैरे मंडळी नांवारूपास आलेली आहे. शके १७५७ ला वेदान्तसार व शके १७६४ सालीं संगीत राघव हा ग्रंथ पूर्ण केल्याचें त्यानी लिहून ठेविलें आहे. लेखकानें अनेक दिवस खर्च करून कष्टानें यांच्या संग्रहांतील पोथ्या वगैरे तपासल्या. त्यावरून हा

**कै. म. म. द वा. पोतदार**

विद्वान मोटा चौफेर बुद्धीचा व चिकित्सक दिसतो. टोकळमानानें या पोथ्यांची संख्या २०० भरते व त्यांपैकीं कांहीं अपवाद सोडल्यास बहुतेक हस्तलिखित आहेत. यांत वैद्यशास्त्रावर एक व रत्नशास्त्रावर दोन असे ग्रंथ असून बाकीचे काव्य वेदान्त, व्याकरण, संस्कार, प्रयोग, संहिता वगैरे विषयांवरील आहेत. गंगाधर शास्त्र्यांच्या वडीलांचें नांव विठ्ठल शास्त्री असें होतें. ते आपल्याला विठ्ठल पौराणिक असे म्हणवीत. गंगाधर शास्त्रीचे वडील द्वितीय रघूजीच्या काळीं नागपुरांत आले असावें. कारण या राजाच्या गुप्तखात्याचे मुख्य, नवघरे, यांचा उल्लेख मंग्रुळकरांच्या लिखाणांतून सांपडतो. त्याचप्रमाणें जगदेवराव मोऱ्यांचाहि उल्लेख दिसतो. जगदेवराव मोरे हा तृतीय रघूजीच्या वेळीं बराच महत्वाला चढला असून हिस्लॉप कॉलेज मागील विठ्ठल रूक्माईचें मंदिर त्याचेंच हातचें आहे. गंगाधर शास्त्रीचे मराठी व संस्कृत गद्य व पद्य यांचे नमूने अनेक दाखवितां येतील व त्यावरून त्यांच्या ज्ञानाची परीक्षा करितां येईल. त्यांनी भामाविलास, गुरु-तत्व विचार, हरिलीलामृत, रामप्रमोद, अपराध-मार्जन, राधाविनोद, गणेशलीला व शंकराचार्यकृत आनंद लहरी या ग्रन्थावर गद्य पद्यात्मक टीका लिहिल्या असून शिवाय, छन्दशास्त्र पुस्तिका प्रसन्न माधव, चित्र मंजुषा, रतिकुतूहल, विलास गुच्छ संगीतराघव, गंगाष्टपदी हे स्वतंत्र ग्रंथ आहेत. या शिवाय जैमिनीअश्वमेध हें मराठी पद्यांत लिहिलें आहे. तात्पर्य हें मूळ निजामशाहींतील मंग्रूळ या प्रसिद्ध गावावरून आलेलें एक व्युत्पन्न कुटुंब असून, त्यांत गंगाधरशास्त्री सारखा विद्वान निपजला असतां त्याची दखल कोणीच घेऊं नये हें दुर्दैव होय. शवटीं लेखकानें थोडी खटपट करून रा. करंबेळकर एम्. ए.* यांचे मार्फत शास्त्रीबुवांचें सर्व लिखाण नागपुर युनिव्हर्सिटी पावेतों पोंचवून त्याला आता मान्यता मिळाली आहे व कदाचित ग्रंथांची तशी योग्यता असल्यास ते प्रसिद्धहि होण्याचा योग येईल. लेखकास मात्र ग्रंथ हुडकून काढण्याचा योग आला परंतु त्यांची योग्यायोग्यता तपासून ते जनतेपुढे विवेचनात्मक पद्धतीनें मांडण्याची

* आतां पी. एच्. डी.

संधि आली नाहीं. तत्पूर्वीच लिखाणानें स्थानान्तर केलें असलें तरी त्याचा योग्य पुरुषांकडून परामर्ष घेतला जाईल, अशी आशा आहे.

कै. पं. प्रभाकर शास्त्री रोडे:—यांचा जन्म छिंदवाडा येथें शके १७७९ म्हणजे इ. स. १८५७ सालीं झाला व मृत्यु २८-९-१९४६ ला झाला. अर्थात् मरण समयीं यांचें वय ८९ वर्षांचें होतें. यांचे वडील श्रीधर शास्त्री हे चांगले वैदिक असून इ. स. १८९९ त ८४ वर्षांच्या वयांत वारले. आजोबा प्रल्हाद भट्ट ६५ वर्षांच्या वयांत १८२९ इ. त वारले. यावरून हें कुटुंब दीर्घायुषी दिसतें प्रल्हाद भट्टांना चंद्रपूर येथें राजाश्रय मिळाला होता. त्यापूर्वी त्यांचे चुलते हरि नारायण रोडे हे नागपुरांत येऊन राहिले होते व त्यांचा शिष्यपरिवारहि बराच होता. ते वैदिक होते. प्रल्हाद भट्ट त्यांच्याच जवळ शिकले. वेदशाळेमागे असणाऱ्या नागपुरांतील घराण्यांत वैदिक विद्येची व साहित्याची परंपरा अजून चालू आहे. यांचेपैकी एक मागील पिढींतील कै. कृष्णशास्त्री तेलंगांचे शिष्य होते. ते आंभोऱ्याच्या डोहांत बुडून वारले. प्रल्हाद भट्टाला अमरवाड्यांचे कमाविसदार, देवपुजारी, यांची कन्या दिल्यामुळे प्रल्हादभट्ट तेथें जाऊन राहिले. प्रल्हाद भट्टांचे आजोबा गोविंद भट्ट हे पैठणचे राहणारे असून चांगले वैदिक होते.

प्रभाकर शास्त्री आपल्या वयाच्या १८ व्या वर्षी नागपुरास येऊन त्यांनीं कै. म. म. भटजी शास्त्रीजवळ ४ वर्षे अध्ययन केलें. बुद्धि तीव्र असल्यामुळें त्यांनी आपल्या नागपुरांतील वास्तव्यांत न्याय, व्याकरण, मीमांसा इत्यादि विषयांची पार्श्वभूमि तयार करून घेतली व पुढे तोच व्यासंग कायम ठेऊन त्यांत बरीच प्रगति केली. ज्योतिषशास्त्राची त्यांना आवड होती. त्यांचें धर्मशास्त्राचें गाढ ज्ञान घटाटे दत्तकप्रकरणीं न्यायाधीश व वकीलवर्ग यांच्या निदर्शनास आलें. पंडित मदनमोहन मालवीय यांनी त्यांचा काशी विश्वविद्यालयांत सन्मान केला होता व फेलोशिप आणि १०० रु. वेतन देऊं केलें होतें. परंतु शास्त्रिबुवांनी विनयपूर्वक त्याचा इनकार

केला. शास्त्रीबुवांचें वास्तव्य जरी मुख्यत: छिंदवाडा येथें होतें, तरी त्यांच्या ज्ञानाचा व सत्संगतीचा लाभ नागपूरकरांस अनेक प्रसंगीं होत असे. पुन: तसें म्हटलें तर एक शाखा नागपूर येथेंहि असल्या-कारणानें व त्यांचेपैकीं कांहींची नकललेली हस्तलिखितेंहि असल्या-कारणानें प्रभाकरशास्त्रींचा व त्यांचे कुटुंबांचा नागपूरशीं बराच ऋणानुबंध होता, हे उघड आहे. नागपुरांतील कुटुंबाची पट्टींतल्या वैदिकामध्यें गणना होत असे. कै. ' नानाजी रोडे हे कोणास ठाऊक नाहींत ?

प्रभाकर शास्त्रींची नजर चौफेर असल्याकारणानें त्यांच्या दृष्टिपथांतून मराठी वाङ्मयहि सुटलें नाही. मोरोपंत व वामन पंडित यांचा त्यांना फार नाद असे व त्यांनीं अनेक स्फुट व प्रासंगिक कविताहि केल्या आहेत. त्यांच्याशी बोलण्यांत संस्कृत साहित्याचा सात्विक आनंद तर येत असेच, पण पंडिती थाटाच्या मराठी वाङ्मयाच्या त्यांच्या व्यासंगाचाहि अंतेवासीयांना लाभ होत असे. ते वृत्तीने खेळाडू व प्रेमळ असत. त्यांच्या फारशी भाषेच्या ज्ञानामुळेहि मराठींत आलेल्या अनेक फार्शी शब्दांची व्युत्पत्ति चटदिशी लागत असे. लो. टिळकांच्या निस्सीम भक्तांपैकीं ते एक होते व त्यांचा राष्ट्रीय अभिमानहि बराच जागृत होता. सामाजिक बाबतींत ते जुन्या कर्मठ पंडितां-प्रमाणें एकान्तिक वृत्तीचे नव्हते. छिंदवाड्याला त्यानीं ' सत्यधर्म मंडळ ' स्थापन केलें होतें व त्याचे ते अध्यक्ष असून त्यामार्फत सामुदायिक प्रार्थना करीत. ते आपलीं धर्मकृत्यें टिळक पंचांगाप्रमाणें करीत. त्यांची स्नानसंध्या आमरण चुकली नाहीं. त्यांचे तीन मुलगे पदवीधर असून श्रीयुत केशवराव हे झूरिचचे पी. एच्. डी. आहेत. चतुर्थ चिरंजीव श्री. वि. प्र. रोडे हे एम्. ए. असून नागपूर म्यूझियमचे असिस्टन्ट क्यूरेटर आहेत. एकंदरींत या कुटुंबांतील दोन्हीं शाखांत वेद, साहित्य व धर्मशास्त्र यांची ६–७ पिढ्या परंपरा अखंडित असून बुले शास्त्रींच्या कुटुंबाप्रमाणेंच हें एक नामवंत पंडित घराणे आहे. कालाच्या ओघाप्रमाणें हल्लीच्या पिढीचा आधुनिक विद्येवर जरी भर असला, तरी त्यांचेपैकीं प्रत्येकाला प्राचीन

विद्येचा व परंपरेचा अभिमान आहे. दुर्दैवानें प्रभाकर शास्त्री-सारख्या मार्मिक, चतुर, विनोदी, व राष्ट्रीय वृत्तीच्या प्रकांड पंडिताची राज्यकर्त्यांनीं किंवा जनतेनेंहि घ्यावी तशी दखल घेतली नाहीं, तरी त्यांचे अनेक चाहते व गुणग्राही होते, यांतच समाधान मानलें पाहिजे.

**श्रीनिवास शास्त्री हरिदास***—या कुटुंबांतील हल्लींची विद्वान व्यक्ति म्हणजे वे. शा. श्रीनिवास शास्त्री हे होत. यांना दुर्दैवानें कांहीं वर्षांपासून अंधत्व प्राप्त झालें आहे. हे १८९१ सालीं उमरावती येथें काशीबाई हायस्कुलांत संस्कृतचे अध्यापक होते व ते जेव्हां पुढें कांहीं वर्षांनीं नागपुरास आले तेव्हां त्यांचा बहुतेक काळ कै. गुलाबराव महाराज या साधुवर्यांच्या सानिध्यांत जात असे मधून मधून ते हिस्लॉप कॉलेजांत संस्कृतच्या प्राध्यापकाचेही काम करीत व वेदशाळेंत नेमानें संस्कृत शिकवीत. यांना इंग्रजीभाषेचाहि परिचय असे. हे निगर्वी, मनमिळाऊ व रसिक आहेत.

पंडित श्रीनिवास शास्त्रींचें कुटुंब नागपुरांतील विख्यात कुटुंबा-पैकीं एक होय. यांचे मूळ पुरुष शंकर शास्त्री हे अमृतराव पेशवे नाशीक येथे असतां नांदत होते. यांचे मूळ उप नांव जपें परंतु नाग पुरांत आल्यावर 'हरिदास' हें उपनांव रूढ झालें. पुढें अमृतराव पेशवे काशीस गेले त्या संधानांत हें कुटुंब निराश्रित झाल्यामुळें नागपुरास आलें. शंकरशास्त्रींना सिताराम व बकाराम या नांवाचे दोन पुत्र होते. ते दोघेहि नागपुरास आले. दोघेही अल्पवयी व अशिक्षित होते. त्यानी जपजाप्य सुरू केले व त्यांना काळान्तरानें कांही अनुकुल दृष्टान्त व्हावयास लागले. बकाराम बुवा कीर्तन करीत व सिताराम बुवा साथ देत. हा काळ तृतीय रघूजीचा म्हणजे सुमारे १२० वर्षां-पूर्वीचा होय. सर्व देवळांत हरिदासांची वर्णी लागली असल्या कार

* टीप—यांचा मृत्यु नागपूर येथे त्यांच्या राहत्या घरीं ता० ३-३-१९४८ रोजी झाला. मृत्यूसमयीं त्यांचें वय ८२ वर्षांचें होतें.

णानें यांना स्थान मिळेना म्हणून यांचे करिता वाड्या शेजारी एक छोटेसें देऊळ बांधून दिलें. तें तेथे अद्यापहि आहे. यांत उपरोक्त बंधू कीर्तन करीत. पुढें आपासाहेब भोसल्यांची पत्नी सावित्रीबाई हिनें आश्रय दिला व कालान्तरानें सध्यांचे सिटीस्कूल जवळील खरेवाड्या-मागील घर लाभलें बकारामबुवांना दादाजी, सदुभाऊ, व गोपाळजी असे तीन पुत्र होते. पैकीं दादाजी हे यशस्वी वैद्य असत. गोपाळजी हे कीर्तन करीत परंतु त्यांनाहि पुढें वैद्यकी करावी लागली व त्यांत त्यांनी असामान्य कीर्ति मिळविली. त्यांचें अध्ययन रामशास्त्रीखरे या विद्वान साहित्यिकाजवळ झालें. गोपाजीचें स्वकृत मराठी काव्य बरेंच आहे व त्यापैकीं कांही छापूनहि निघालें आहे. संस्कृत साहित्याची उपस्थिति चांगली असून ते विद्यार्थ्यांना मुक्तहस्तानें विद्या

म/236

देत. सिताराम बुवांना बापुजी रामचंद्र व जयराम असे तीन पुत्र होते. बापुजी कीर्तन करीत परंतु ते पुढें गणोबाचे वाडींत गणोबामहाराजांचें शिष्यत्व पत्करून तेथेच राहिले.श्रीनिवास शास्त्रींचा एक होतकरु मुलगा डॉक्टर झाला होता; तो दुर्दैवाने अल्पवयांत वारला. हल्ली पांच मुलगे व त्यांचा परिवार आहे. पैकीं एक ‘ गोखले हरिदास ’ या प्रसिद्ध इंजिनियरिंग कंपनीचे भागीदार आहेत. दुसरे वैद्य असून तिसरे याज्ञिकी करीत असतात. नागपुरांत एकेकाळीं गोपाळजी हरिदासांच्या स्वकृत काव्याची बरीच ख्याति होती व अझूनहि श्री दादाशास्त्री कायरकर, श्री बाबूराव दक्षिणामूर्ति वगैरे हरिदास गोपाळजींची आख्यानें लावीत असतात व तेणें करून जुन्या काव्य पीयूषाचा आस्वाद रसिकांना देत असतात.

पं. रंगाचार्य हें एक नागपुरांतील अद्वितीय पंडितरत्न होय. हे वैष्णव पंथाचे असून मूळ गंगाखेड तालुक्यांतील अंबाईच्या जोग्याचे राहणारे होत. जन्म १८३३ इ. सुमारें. यांचे खरें नांव रंगनाथ असून आडनांव कारंजकर असें होतें. हे वै. केसरी सदाशिवशास्त्री घुले यांचे पट्ट शिष्य होत. सदाशिव भट्टांनी मृत्युसमयीं यांनाच आपल्या महत्वाच्या पोथ्या दिल्या,असें म्हणतात व कदाचित् आचार्य ही पदवीहि त्यांनीच दिली असावी. आचार्य या पदाची दुसरी एक उपपत्ति अशी आहे

की, वैष्णवांत कोणी विद्वान झाला की त्याच्या नांवाचे पुढें आचार्य हे उपपद लावीत असतात म्हणूनहि त्याना रंगाचार्य हें नामाभिधान प्राप्त झालें असलें पाहिजे. महालावरील बापुजी देवळे यांचें मूळ आडनावहि कारंजकर हेच आहे परंतु बक्षीच्या देवळाची त्यांचे पूर्वज पूजा अर्चा करीत (अजूनही तसेंच चालू आहे) म्हणून देवळे हे आडनांव पडलें. रंगाचार्यांचे घर आर्वीकरांचे घराजवळ असे. हल्ली तें दुसऱ्याच्या मालकीचें झालें आहे. कै. म. म. भाऊ शास्त्री घुले व कै. म. म. भटजी शास्त्री हे रंगाचार्यांचे मानानें दुय्यम श्रेणीचे समजले जात. त्यांना सहाहि शास्त्रांचे ज्ञान असून त्यांच्यासारखा विद्वान् ब्राह्मण काशीपासून रामेश्वर पावेतो कोणी नव्हता असें कै. प्रभाकर शास्त्री रोडे म्हणत. कदाचित् यांत थोडी फार अतिशयोक्तीहि असेल असे गृहीत धरलें तरी रंगाचार्य जाडे विद्वान् असत हे मात्र सर्वतोमुखी होतें. एवढे हे विद्वान परंतु फार खेळाडू वृत्तीचे होते. तसेच ते फार खर्चिकहि असत व कोणासहि वाटेंत भेटणारास घरी जेवावयास बोलावीत. यांना सोंगट्याचा एवढा नाद असे कीं, पट खाकोटींत मारून बाहेर पडत व बाजारांत जातां जातां कोणाशीहि चार हात खेळून घेत. कै. भटजी शास्त्री हे अहेररावाचे पंडित समजले जात व भाऊ शास्त्री घुले हे जानोजीचे पंडित समजले जात. या दोघांच्या वादांत पं. रंगाचार्य हे मध्यस्थाची भूमिका धारण करीत. आचार्यांच्या विद्वत्तेमुळें सर्वांत अधिक पेन्शन व निरनिराळ्या संस्थानांतून देणग्या मिळत, तेणेंकरून त्यांचा योगक्षेम चाले. रंगाचार्यांना बापुजी नांवाचा एक मुलगा होता. तोहि शास्त्री होता. रंगाचार्य केव्हां वारले हें मात्र सांगता येत नाहीं.

**पंडित बापूशास्त्री देवः**—या देशांत इंग्रजाचें राज्य झाल्यावर भारतीय व पाश्चिमात्य दोन्ही प्रकारच्या गणितांत जी थोडी विद्वान् मंडळी होउन गेली, त्यापैकीं बापूशास्त्री देव एक होत. बापूशास्त्रींचा उत्कर्ष नागपूरच्या बाहेरच विशेषकरून झाला. परंतु त्यांचें पूर्व वय नागपुरांत गेल्यामुळें, त्यांना नागपूरचे पंडित म्हणून धरून चालावयास हरकत नाहीं. त्यांचा जन्म कार्तिक शु. ६ ला शके १७४३

रोजीं ( १-११-१८२१ ) नागपूर येथें झाला. त्यांचें शिक्षण नागपुरास असतां ढुंढीराज नामक कान्यकुब्ज पंडिताजवळ झालें. बापूशास्त्री व श्रीकृष्णशास्त्री योगे हे तरुण पंडित नागपुरास विल्किन्सन रेसिडेंट असतां ( हा १८३७ च्या आसपास होता. ) त्याला शिकवीत हें आश्चर्य होय. पुढें विल्किन्सन भोपाळ येथें रेसिडेंट असतां त्याने बापूशास्त्रींना सिहोर येथें नेले व त्याला सेवाराम पंडिताजवळ रेखागणिताच्या अध्ययनार्थ ठेविलें. १८४१ त काशी विद्यापीठांत बापूशास्त्रींची रेखागणिताचे अध्यापक म्हणून योजना झाली. केवळ २० वर्षांच्या वयांत त्यांचा एवढा उत्कर्ष झाला ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे.' ते १८८९ त सेवानिवृत्त झाल्यावर पुढें एक वर्षानें वारले. यावेळीं त्यांचे वय ६८ वर्षांचे होतें. १८६४ त रॉयल एशिआटिक सोसायटीचे व १८६६ त बंगाल एशि० सोसायटीचे ते सदस्य झाले. १८६९ त ते अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे फेलो झाले व १८७८ त सी. आय्. ई. झाले. व्हिक्टोरिया राणीच्या शतार्धोत्सवानिमित्त त्यांना महामहोपाध्याय ही बहुमानाची पदवी मिळाली. रेखागणित प्रथमाध्याय, त्रिकोणमितीचा काही भाग, सायनवाद, प्राचीन ज्योतिषाचार्याशय वर्णन सोत्तर अष्टादश विचित्र प्रश्नसंग्रह, ज्योतिर्विवेक परीक्षा, मानमंदीरस्थ यंत्र वर्णन, अंकगणित हे सर्व ग्रंथ संस्कृतांत असून, छापले आहेत. तसेच त्यांचे अंकगणित, बीजगणित व फलितावरहि हिंदीतून लिहिलेले कांहीं छापील ग्रंथ आहेत. ते नॉटिकल ॲलमनाकचे आधारे पंचांगहि करीत. याशिवाय यांचे सिध्दांत शिरोमणि गोलाध्याय, सूर्य सिध्दांत हे अनुवादात्मक ग्रंथहि प्रकाशित आहेत. कांहीं लहान सहान असे ग्रंथ आहेत कीं, ज्यांचे मुद्रण होऊं शकले नाहीं.

**गंगाधर भट्टदेव:**—महालावर चांदे गल्लीप्रमाणें पंचांग गल्ली प्रसिद्ध आहे. या देवांचा कै. पं. आपाशास्त्री देव यांचेशीं कांहीं संबंध नाहीं. कारण दोघांचीं गोत्रें भिन्न आहेत. दुसरे आप्पाशास्त्री चित्पावन ऋग्वेदी, तर हे देशस्थ ऋग्वेदी. या कुटुंबांत श्री. गंगाधर शास्त्री देव हे गृहस्थ हयात असून, विशेषतः नागपूर

पंचांगामुळें ते सुपरिचित आहेत. यांचें इंग्रजी शिक्षण जरी बेताचें झालें असलें तरी गणित व ज्योतिष शास्त्रांचें ज्ञान बऱ्याच वरच्या दर्जाचें आहे व हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना ते सहज शिकवू शकतात व शिकवीत आहेत.

२. यांच्या ज्या मूळ पुरुषाविषयीं थोडी फार माहिती आहे, त्यांचेंहि नांव गंगाधर भट्टच होतें. गंगाधर भट्ट हे वैदिक व धर्मशास्त्री असत. नागपुरांत दोन पिढ्यांपूर्वी त्र्यंबकजी देवजी म्हणून प्रसिद्ध असत. त्यामानानें गंगाधर भट्टाचे नांव लोकांचे तोंडी नव्हते. तरी कुटुंबाला विद्वन्मान्य व राजमान्य करवून घेण्यांत यांचीच योग्यता कारणीभूत झाली असावी. गंगाधर भट्टांच्या वडीलांचेंहि नांव त्र्यंबक होतें. तेव्हां या घराण्याची कीर्ति कदाचित् या त्र्यंबकजींपासूनहि असणें संभवनीय आहे. नागपुरांत मात्र जेव्हां जेव्हां आमच्या लहानपणीं वृद्ध लोक 'शास्त्रार्थाकरितां त्र्यंबक देवजीकडे गेलों होतों' म्हणून म्हणत तेव्हां द्वितीय त्र्यंबकजी यांस अनुलक्षून ते बोलत, असा आमचा समज आहे. सरकारी कागद पत्रावरून त्र्यंबकजी यांचें वय १८७३ सालीं ४५ वर्षांचें दिसतें. यावरून त्यांचा जन्म १८२८ सालीं झाला असावा. यांनीं १८६६ सालीं आपली मूळ पेन्शन कमी करून घेतली होती. ती मुळांत किती होती हें सांगतां येत नाहीं. परंतु १८७३ सालीं मात्र ती वार्षिक १०० रु. ( नाग. रुपये ) होती. पेन्शन त्यांच्या जीवमाना पर्यंत मिळाली.

३. हें कुटुंब मूळ कोणत्या गांवावरून आलें हें नक्की सांगतां येत नाही. कुलदैवत श्री व्यंकटेश हें आहे. खुद्द गंगाधर भट्टांचे हातचा इ. स. १८२५ त लिहिलेला 'चातुर्मास्य-प्रयोग' या नांवाचा ग्रंथ आहे. त्यावरून हें कुटुंब सुमारें १२५ वर्षांपूर्वी नागपुरास आलें असलें पाहिजे. दुसरें, ज्याअर्थी तृतीय रघूजीच्या कारकीर्दींत कुटुंबांत वेतन होतें, त्याअर्थीं हें कुटुंब वर म्हटल्याप्रमाणें १२५ वर्षांपेक्षां जुने दिसत नाहीं. यांचे कुटुंबांत

धर्माधिकारीपणाची भोसल्यांची सनदहि आहे. परंतु ती पहावयास न मिळाल्यामुळें कालाविषयीं बिनचूक विधान करतां येत नाहीं. याबाबतींत कुटुंबीयांकडून माहिती न मिळाल्यामुळें पुष्कळसें अवान्तर पुराव्यावर सोपविणें भाग पडलें. तरी भोसले दप्तर पाहण्याचा योग आला तर आणखी प्रकाश पडण्याचा संभव आहे. यांचेकडे कांहीं वर्षांपूर्वीं पावेतों कोठींतील धार्मिक हस्तलिखितें संभाळण्याचें काम होतें. तें हल्लीं बंद झालें आहे. सांप्रत ताम्हणे शास्त्रीकडे तें काम आलें आहे.

४. गंगाधर भट्टांना त्र्यंबकजी उर्फ दादाजी व विश्वनाथ असे दोन पुत्र होते. त्र्यंबकजी, ज्योतिष व धर्मशास्त्र या दोन विद्येंत निपुण होते व त्यांचा धर्माधिकारी म्हणून चांगला मान होता. ते स्वतः निपुत्रिक वारले, परंतु त्यांचे बंधु विश्वनाथभट्ट यांस राजाराम शास्त्री, रामकृष्ण शास्त्री व लक्ष्मण शास्त्री असे तीन पुत्र होते. धाकटे लक्ष्मणशास्त्री हे १९१९ साली साटोच्या घरांत वारले व वडील बंधू रामकृष्णशास्त्री हे १९२६ सालीं सुमारे ७८ वर्षांच्या वयांत वारले. हल्लीं रामकृष्णशास्त्र्यांचे चिरंजीव गंगाधरशास्त्री आहेत. लेखकानें उपरोक्त बंधूना अर्थात पाहिलें आहे. लक्ष्मण शास्त्री हे पोषाखांत टापटिपीने रहात व रामकृष्णशास्त्री बहुधा एका उपरण्यावरच भागवीत. लक्ष्मणशास्त्रींनीं म. म. भटजी शास्त्री जवळ व्याकरणशास्त्राचें अध्ययन केलें होतें. रामकृष्णशास्त्री वैदिक असत. कुटुंबांतील मुख्य विद्या म्हणजे ज्योतिष, दोघासहि चांगलें येत असे.

**श्रीकृष्णशास्त्री घोंगे:**– हे एक नागपुरांत विद्वान पुरुष होऊन गेले. हे मूळ आकोल्याचे असून तेथें आजहि एक कुटुंब नांदत आहे. श्रीकृष्णशास्त्री यांस बळवंत नारायण जामदार, ( हयात यादवरावजींचे आजोबा ) यानीं नागपुरास आणलें. हे १८४० चे सुमारास रेसिडेन्ट विल्किन्सन यास ज्योतिर्गणित शिकवीत असत, म्हणून कै. या. मा. काळे आपल्या ग्रंथांत उल्लेख करितात, यांना तृतीय रघूजींचे वेळीं मान असे. राजाच्या १८५१ सालच्या खाजगी वहीखात्यांत इतर शास्त्र्यांबरोबर श्रीकृष्णशास्त्रीनाहि १० रु. दिल्यांचा

उल्लेख सापडतो. (इ. स १८५१) श्रीकृष्णशास्त्रींचा मुलगा राधाकृष्ण-शास्त्री चांगला पुराणिक असे. या नंतर केशव शास्त्री घोंगे हे श्रौतांत चांगले निष्णात होऊन गेले. आम्ही घोंगे कुटुंबाजवळ माहिती-काढण्यांचा प्रयत्न केला, परंतु त्यांत यश आलें नाहीं. यांचेच पैकीं हिस्लॉप कॉलेजांतील ड्रिलमास्तर माधवराव घोंगे कांहीना आठवत असतील. त्यांचे चिरंजीव नागपूर म्युनिसिपल कमीटींत नोकर आहेत. रा. रामभाऊ घोंगे हे वैदिक असून त्यांचेकडे गोपाल मुकुंद घोंगे यानीं इ. स. १७५८ त लिहिलेली एक पोथी आहे. शक्य झाल्यास सवडीनुसार यांचे विषयीं अधिक माहिती काढता येईल.

**रामशास्त्री खरे:**– हे काव्यांत अग्रणी असत. यांचें वास्तव्य मुन्शींच्या वाड्याकडे असे. त्यांच्या शिष्य परिवारापैकीं कै. गोपाळजी हरदास व कै. दादाजी साधू हे प्रमुख होत. यांचा जन्म व मृत्यु काळ उपलब्ध झाला नाहीं. तथापि ज्या अर्थी गोपाळजी हरिदासांसारखे यांचे शिष्य असत, त्या अर्थी १०० वर्षापूर्वी ही व्यक्ति नांदत होती, हें उघड आहे. खरे शास्त्रींचे गोपाळजीवर नितांत प्रेम असे व ते अभिमानानें म्हणत कीं, “ माझा गोपाळा जो पावेतो जिवंत आहे तों पावेतो मी मरूं शकत नाहीं ” कै. गजानन बावा वखरेहि यांचे जवळ काव्य शिकले. खरे वाड्याचे ( सिटी स्कूल जवळ ) मालक मात्र हे शास्त्री बुवा नव्हते, हें चौकशी अंतीं समजलें. तेथें हैद्राबादचे नबाबांचा वकील उतरत असे.

**अनंत शास्त्री काशीकर:**–१८५१ मधील तृतीय रघूजींच्या कारकीर्दीतील एका वहीखात्यांत अनंत शास्त्रींना १० रु० वेतन दिल्याचा उल्लेख सापडतो. यावरुन ही व्यक्ति आदरणीय असली पाहिजे. यांचे वडीलांचे नांव रामचंद्र. यांचा उल्लेख श्रीकृष्ण शास्त्री घोंगे वगैरे सारखे स्थानीय व्यक्ती बरोबर केलेला सापडतो. अनंत शास्त्रींना ३०० रु. ( नागपुरी ) ब्रिटिशाकडून पेन्शन मिळत असे.

वरील व्यक्ती खेरीज गणेश शास्त्री वाठणकर, नारोबा जोशी दाजी शास्त्री मेहरकर वगैरे मंडळी मागील दोन पिढ्यापूर्वी होऊन

गेली. नारोबा जोशी हेच नरसोबा नाना असावे, असे वाटते. नारोबा बाळाजी पुराणिक म्हणून सरकारी पेन्शनदारांत उल्लेख सांपडतो. यांचे वंशांत माफी व मोकासा चालू आहेत. **नरसोबा नाना** हे मूळ हैद्राबाद संस्थानांतील धर्मपुरी एथील होत. त्यांना एक मुलगा व मुलगी होती. मुलीचा मुलगा **ऋक्मांगद शास्त्री** हे होत. हे सिटी कॉलेज जवळ राहत. ते अंध असून भागवत सांगत. मुला मुलीचे दोन्हीहि वंश चालू आहेत. वेदशाळेजवळील नारायणराव जोशी प्रभृति तिघे बंधु हा मुलीचा म्हणजे रुक्मांगद शास्त्रींचे बंधु त्र्यंबकजी यांचा वंश होय. नारायणरावांचे वडील बाळकृष्ण शास्त्री हे भंडारा सरकारी हायस्कुलांत शिक्षक असत. त्यांनीच नागपुरांतील नेटिव इन्स्टिटयूशन ही शिक्षण संस्था काढली होती. यांचे चुलते महादेव शास्त्री यांना ज्योतिषविद्याही उत्तम येत असे. बापुजी पेंडके (नानाजी पेंडक्यांचे वडील) व राधाकृष्ण जोशी हे ज्योतिषी यांच्याच शिष्य वर्गांपैकी होत. **गणेशशास्त्री** वाटणकर हे वाईकरांच्या वाड्यांत असत. हे मनानें फार उदार असून शास्त्रीय वादांत नेहमी समतोल बुद्धि ठेवींत, अशी यांची ख्याति आहे.

**दाजी शास्त्री** मेहकरकर हा काव्याचा मोठा चिकित्सक बुद्धीचा रसिक असे. यांचे वंशज झेंड्याकडे राहतात. त्याना त्यांचे विषयीं विशेष माहिती असल्याचें दिसून आलें नाहीं. प्रभुज्ञातीतील **श्री व्यंकटराव** नाना हे हि संस्कृताचे रसिक होऊन गेले. महाल प्रायमरी स्कूल यांचेच जागेवर आहे. यांनी गंगालहरीच्या पद्धतीवर ‘ कृष्णावीचि ’ हें काव्य लिहिले आहे. ते शीघ्र कवीही होते. कै. **नीलोपंत नाना** हे बहुश्रुत व व्युत्पन्न असत. विद्वान् असून ते उत्तम मल्लही असत. हे कै. गोविंदराव इंदूरकांचे मल्लविद्येचे व मोक्ष विद्येचे गुरू होते. त्यांना न्याय, व्याकरण, अलंकार, मंत्रशास्त्र व गणित एवढ्या विद्या येत.

वरील केवळ संस्कृत विद्येच्या विद्वानाव्यतिरिक्त अशी एक व्यक्ति नागपुरांत होऊन गेली कीं जिचे मराठी काव्याचेंहि ज्ञान त्याच तोलांचे असे. ही व्यक्ति म्हणजे लेखकाचे परमामित्र

कै. जयकृष्ण केशव उपाध्ये यांचे आजोबा नानाजी जोशी हे होत. हे तृतीय रघूजींची भगिनी कै. गनाबाई शिर्के यांचेकडे पुराणिक असत. यांना कविवर्य मोरोपंत यांचें काव्य पुष्कळसें मुखोद्गत असे व त्याचा अर्थ लावण्याकरितां कै. आपासाहेब बुटीसारख्या अनेक रसिकांचा या विद्याव्यासंगी गृहस्थाभोंवतीं घोळका असे. यांच्या विद्वत्तेविषयीं आम्हास कांहीं गोष्टी ठाऊक आहेत, पण विस्तार भयास्तव त्या येथें देतां येत नाहींत. यांनींच आपला प्रिय नातू कै. जयकृष्णपंत यास संस्कृत विद्येची गोडी लाविली व कवितादेवीच्या प्रांगणांत प्रवेश करून दिला. पुढें त्यांची प्रतिभा विस्तार पावली हें आपणास विदित आहेच. आपल्या आजोबा विषयीं जयकृष्णपंत उर्फ बोबा नेहमीं कृतज्ञतेनें व अभिमानाने उल्लेख करीत व त्यांच्या कांहीं चटकदार गोष्टीहि सांगत.

**वाणीभूषण कै. कृष्णशास्त्री तेलंग:**—यांना पाहिलेले व यांच्या संस्कृत व मराठी वक्तृत्वाचा लाभ घेतलेले अनेक लोक आज नागपुरांत हयात आहेत. तेव्हां यांचेविषयीं विशेष सांगण्याची जरूरी नाही. यांचा जन्म शके १७८४ ( इ. स. १८६२ ) चा असून मृत्यु शके १८५० फाल्गुन व॥ ३ ला झाला ( १९२८ इ. ) शास्त्रीबुवा कै. गोपाळजी हरिदास यांचेजवळ काव्य व कै. पं. गजानन बाबा वखरे यांचेजवळ न्याय शिकले. यांचे शरीर फार स्थूल असे. त्यांचा पोषाखहि अर्थात् जुन्या पद्धतीचा पण फार टापटिपीचा असे. लेखकास यांच्या संगतीचा पूर्ववयात बराच लाभ घडला. त्यांच्याशीं जवळ जवळ घरोबा असे. साहित्याचार्य बाळशास्त्री हरिदास यांचे आजोबा हे त्यांचे मामा होत. हे राष्ट्रीय वृत्तीचे असून टिळक पक्षाचे कट्टर अनुयायी होते. ते सभांतून पुष्कळदां चित्ताकर्षक अशा संस्कृत भाषेंत भाषण करीत. यांचे चिरंजीव कै. मोरबाशास्त्री हे अल्पवयी वारले. हल्ली मोरबाशास्त्रींचा मुलगा आहे. तोहि संस्कृताचे अध्ययन करीत असतो. कै. कृष्णशास्त्रींचें त्यांच्या लोकप्रियतेमुळें व प्रभावशाली वक्तृत्वामुळें उत्पन्न चांगलें असे. किंबहुना दोन तपेंपावेतों नागपुरांत त्यांच्यासारखा जुन्या परंपरेतील एकहि वक्ता नव्हता म्हटलें तरी चालेल.

**कै. रामचंद्र उर्फ बाळाशास्त्री घाटेः**—हे श्रोत्रीय व उत्तम वैय्याकरण होते. यांच्या मुलांपैकीं वे. शा. वासुदेवशास्त्री हेहि संस्कृतचे पंडित आहेत. बाळाशास्त्रींची व्याकरण शास्त्राची एवढी उपस्थिति होती कीं, कै. भटजीशास्त्री निवर्तल्यावर कै. म. म. केशवरावजी ताम्हण यांचेकडे व्याकरणाची चिंतनिका करावयास जात. बाळाशास्त्रींचा जन्म इ. स. १८५९ चा असून १९३५ साली त्यांचे देहावसान झालें.

वर्डीवर वे. शा. **गोविंदशास्त्री** म्हणून प्रसिद्ध असून त्यांचें अध्ययन म. म. भटजीशास्त्री यांचेजवळ झालें होतें. पूर्वी हे शहरांत असत परंतु पुढें नवीन सुशिक्षितांना संस्कृत शिकवून ते आपला योगक्षेम चालवीत. ते १९३६ साली वारले. त्यांची मुले नवविद्या विभूषित असून सुस्थितींत आहेत.

आधुनिक काळांतील वरील सर्व विद्वान् केवळ संस्कृतज्ञ असत. म. म. केशवरावजी ताम्हण, म. म. सदाशिव जयराम देहाडराय, कै. प्रो. गोपाळराव गर्दे, कै. प्रो. जठार ही मंडळी इंग्रजी शिक्षणानेंहि विभूषित होती. ते सर्व कै. भटजीशास्त्री जवळ व्याकरण शिकत असत. प्रो. गर्दे खेरीज करून सर्वच विद्वान् संस्कृतांत एम्. ए. होते. प्रो. गर्द्यांचा विषय जरी गणित होता तरी तेहि संस्कृतांत व ज्योतिषशास्त्रांत तज्ञ होते. यां सर्वांचा विशेष हा कीं यांचा कल साहित्यापेक्षां व्याकरणाकडे अधिक असे. कै. म. म. केशवरावजींनी कांहीं स्फुट कविता केल्या असून त्यांपैकीं कांहीं त्यांच्या रसिकतेची व प्रसादाची साक्ष देतात. यांच्या सदाचरणामुळें यांना मोठमोठे लोक ऋषितुल्य मानीत.

**कै. गोपाळ आन्याजी पोफळी** हे लेखकाचे गुरु होते. संस्कृतज्ञांत त्यांचेंहि स्थान महत्वाचें होतें. ते म. म. ताह्मण शास्त्री व कै. ह. ब. करमकर वकील यांचे दैनंदिन बैठकींतील एक प्रमुख रसिक असत. ते. म. म. ताह्मण शास्त्री पूर्वी सुमारें १ वर्ष (२१-११-३८) आधीं वारले.

स्थलाभावास्तव मागील पिढींतील इतर संस्कृत विद्येच्या उपासकाचा परामर्ष घेतां येत नाहीं व तो लेखकांचा मुख्य विषयहि

नव्हे. तसेंच त्यापूर्वींच्याहि इतर विद्वानांचा लेखकास परामर्ष घेतां आला नाहीं तरी दिग्दर्शन या नात्यानें वाचकास आता पावेतों अवश्य तेवढी माहिती मिळाली असेल असें वाटतें.

तथापि हा लेख संपविण्यापूर्वी एक दोन गोष्टींचा उल्लेख करणें अवश्य वाटतें. वरील भोसलेशाहींतील व जवळपासच्या काळांतील बहुतेक सर्व विद्वान हाडा पेरानें चांगले मजबूत असत किंबहुना त्यांचे पैकीं बरेच लोक मल्ल विद्येचेहि उपासक असत व त्यांत त्यांना अभिमानहि वाटत असे. उदाहरणार्थ, कृष्णानंद उर्फ दादाजी महाराज सा रू ( यांचा उल्लेख हरिदास मंडळींत लेखकानें इतरत्र केला आहे. ) म. म. सदाशिव शास्त्री घुले यांना ज्यांनी पाहिलें असेल त्यांना माझ्या म्हणण्याची सत्यता पटेल. दुसरें असें की, या सर्व मंडळींचें शील व आचाराचें पावित्र्य संशयातीत असुन बव्हंशी अनुकरणीय होतें. त्यांचें आपले शिष्यावर व शिष्यांचे त्यांच्यावर निरतिशय प्रेम असे व वेतनाचा कांहीं प्रश्नच नसल्यामुळें ते मुक्त हस्तें विद्यादान करीत ही परंपरा परवा परवापर्यंत कायम होती. त्याशिवाय वेदांत तीर्थ दाणी शास्त्री किंवा प्रा. सोमलवार यांच्या सारखे आधुनिक संस्कृतज्ञ निर्माण झाले नसते. फार काय पै. रा. सा. (खानसाहेब नव्हे) पंडित अबदुल अझीमखां (ओरियेन्टल ट्रान्सलेटर) यांच्यासारख्या हिंद्वेतर गृहस्थावरहि गुरूंचे तसेंच प्रेम असे. कै. गोपाल आन्याजी हे नेहमी दर प्लेगांत खान साहेबाकडे सकुटुंब जाऊन राहात. उलट गोपाल आण्याजी हे एका यात्रेच्या ठिकाणी फार आजारी आहेत म्हणून समजले असता पंडित अबदुल अझीम मुद्दाम सुटी घेऊन गुरूच्या भेटीस तेथें जाऊन आले. कोठे तो काळ व कोठे आजचा. तरी आजच्याहि काळांत लेखकांचे अनेक मित्र या विद्येची ज्योत तेवत ठेवण्याचा अहर्निश प्रयत्न करीत आहेत, ही समाधानांची गोष्ट होय. त्याचें चीज करणें तरुण पीढीचें, या आर्य देशाच्या सुपुत्राचें, परमकर्तव्य होय.

---

हा निबंध म सं. मंडळांत १६-२-४७ व २-३-४७ या दिवशीं दोन विभागात वाचला होता.

# तीन कालिदास

(लेखकः- डॉ. के. ल. दफ्तरी)

कालिदासाच्या कालाविषयीं अजून संशोधकांचें एक मत होत नाहीं. कोणाला तो शकाच्या पांचव्या शतकांत दिसतो तर कोणाला शकाच्या पूर्वीच दिसतो. ह्या घोटाळयाचें कारण काय असावें ह्याचा विचार माझ्या मनांत अनेकदां आला. पण त्याचा निश्चय अजूनहि झालेला नाहीं. तथापि महामहोपाध्याय प्रो. मिराशी ह्यांचा कालिदास हा ग्रंथ वाचून व तेथील पान ३३ वरील " एकोऽपि जीयते हत कालिदासो न केनचित् । शृंगारे ललितोदगारे कालिदास त्रयी किंमु " ॥ हें अवतरण वाचून कालिदास तीन असल्यामुळें हा घोंटाळा होत असावा असें मला वाटूं लागलें. परंतु मी साहित्यिक नसल्यामुळें मी कालिदासाचें रघुवंश सर्ग ७ ह्याशिवाय इतर ग्रंथ वाचले नाहींत म्हणून मी निश्चयपूर्वक कांहींच ठरवूं शकलों नाहीं. म्हणून माझे विचार आपणा सारख्या विद्वानापुढें परीक्षणार्थ ठेवीत आहे. आपण त्याचें परीक्षण करून योग्य तें ठरवावें. माझा त्याविषयीं आग्रह नाहीं.

विक्रमाच्या काळा विषयीं असाच घोटाळा होता. तो नाहींसा करण्याकरितां मी " विक्रमादित्यांविषयींच्या घोंटाळ्याचा उलगडा " हा एक निबंध लिहून " सहविचार " ह्या मासिकांत प्रसिद्ध केला. त्यांत पांच विक्रमादित्य व त्यांची भिन्न कार्यें व स्थळें निश्चितपणें ठरविलीं आहेत. तेथील रीति अशी. ज्या ग्रंथांत विक्रमाचें वर्णन असेल त्या एकाच ग्रंथावरून त्याचा काळ, कार्य व स्थळ ठरवावयाचें इतर ग्रंथाचा त्यावेळीं विचार करावयाचा नाहीं. ह्या प्रमाणें तेथें पांच विक्रमादित्य ठरविलें. भिन्न ग्रंथावरून काळ भिन्न ठरल्यानें अर्थातच विक्रम व त्यांच्यादरबारांतील कालिदासहि भिन्न ठरतात. भविष्य पुराणावरून एक विक्रमादित्य ठरला त्याचा जन्मकाळ ६२० व मृत्यु

काळ शके ६९९ ठरतो ह्याने शके ६४९ ते शके ६९९ पर्यंत अवंती येथें राज्य केलें. हा आपला भाऊ शंख उर्फ प्रसिद्ध कवि भर्तृहरि ह्या नंतर राजा झाला. ज्योतिर्विदाभरणावरून जो विक्रमादित्य ठरतो तो ज्योतिषी वराह मिहिराचा समकालीन ठरतो. (अ. २५ श्लो. १०) त्याच्या दरबारांतील कालिदासानें ज्योतिर्विदाभरण ग्रंथ शके ५०२ ह्या काळीं केला हें निश्चितपणें ठरते (अ. २२ श्लोक २१ वा) ह्या श्लोकांत ग्रंथाचा काळ कलिचीं ३०६८ वर्षे असा दिला आहे. ग्रंथारंभीच ग्रंथकार म्हणतो कीं ग्रंथ वराहमिहिराच्या मतास अनुसरून केला आहे वराहमिहिर बृहत्संहितेत सप्तर्षिविचारांत "आसन् मघासु मुनय शासति पृथ्वीं युधिष्ठिरे नृपतौ। षड्द्विकपंच द्वियुत २५६६ शककालस्तस्य राज्यस्य" ह्या प्रसिद्ध श्लोकांत शकांत २५६६ मिळविल्यानें युधिष्ठिर काल म्हणजे कलिकाल येतो असें म्हणतो. म्हणून योतिर्विदारभरणाचा काल ३०६८–२५६६=५०२ शके ठरतो. तो कालिदास स्वता विषयीं म्हणतो कीं मी सुमति देणारीं रघुवंशपूर्व तीन काव्यें प्रथम निर्माण केली नंतर "श्रुतिकर्मवाद" हा ग्रंथ व नंतर ज्योतिर्विदाभरण हा ग्रंथ केला. (श्लो. २० अ. २२) शिलालेखांतील उज्जयिनीचा यशोधर्मदेव हाच असावा हें उघड आहे व ह्याचा राज्यारंभ काल शके ४४८ असला पाहिजे असें ज्योतिर्विदाभरण अ. ४ श्लो. ५३ येथील क्षयमासाच्या निर्देशावरून ठरते. अ. ४ श्लोक ५३ ह्यांत विक्रमकालाच्या १०३ वर्षांनीं क्षयमास येईल असें म्हटलें आहे. वराहमिहिराच्या मतानें म्हणजे आद्य सूर्यसिद्धांताच्या गणिताप्रमाणें क्षयमास शके ५५१ ह्या वर्षी येतो ह्मणून विक्रम राज्यारंभ काल शके ४४८ ठरतो. व हें यशोधर्म देवाच्या काळांशीं जुळतें. ह्या कालिदासानें आपल्या ग्रंथामध्यें नाटकांचा निर्देश केला नाहीं ह्यावरून रघुवंशादि काव्यें करणारा कालिदास निराळा व नाटकें करणारा कालिदास निराळा असा तर्क होतो.

तिसरा विक्रमादित्य राजतरंगिणीच्या तिसऱ्या तरंगावरून ठरला. ह्या तरंगांत मातृगुप्त नांवाच्या कवीला काश्मीरच्या गादीवर बसविणारा एक विक्रमादित्य वर्णिला आहे. मातृगुप्ताचा

राज्यकाल शके २९२ तो २९७ ठरतो. तो असा. कर्कोटक राजांचा अंत सप्तर्षिकाल ३१ वें वर्ष ह्या काळीं झाला असें तेथें सांगितलें आहे. सप्तर्षिकालाचें ३१ वें वर्ष म्हणजे शकाचें ७७ वें वर्ष, हें आठव्या शतकाचें होय असें त्यानंतरच्या राजांच्या कालावरून सहज ठरतें. म्हणजे कर्कोटकांचा अंत शके ७७७ ह्या वर्षी झाला. त्या पूर्वी कर्कोटकांनीं २५८ $\frac{५}{१२}$ वर्षे बालादित्य विक्रमादित्य, रणादित्य, नरेंद्रादित्य, युधिष्ठिर, प्रवरसेन व मातृगुप्त ह्यानीं अनुक्रमें ३७ $\frac{६}{१२}$, ४२, ३००, १३, ३९ $\frac{३}{१२}$, ६०, व ४ $\frac{९}{१२}$ वर्षे राज्य केल्याचें सांगितलें आहे. ह्यापैकीं रणादित्याचीं वर्षे ३०० हीं असंभाव्य वाटतात. पण तीं खरोखर ३० असावींत "त्रिंशतं"चा "त्रिशतं" हा पाठ चुकीनें झाल्यामुळें ३० चीं ३०० झालीं असावीं. म्हणून रणादित्यांचीं वर्षे ३० मानल्यास मातृगुप्ताच्या राज्याचा अंत शके २९७ हा येतो. हाच प्रसिद्ध सम्राट् समुद्रगुप्त ह्याच्या मृत्यूचा काळ आहे व विक्रमादित्य मृत्यु पावला तेव्हांच तत्काळ मातृगुप्तानें काश्मीरची गादी सोडली असें राजतरंगिणींत वर्णिलें आहे. ह्यावरून राजतरंगिणीतील विक्रमादित्य म्हणजे समुद्रगुप्तच असें निश्चितपणें ठरतें. रणादित्याचीं वर्षे ३० पेक्षा जास्त मानलीं तरी ह्या विक्रमाचा व मातृगुप्ताचा काळ मागें जाईल पुढे येणार नाहीं हें उघड आहे. ह्यावरून हा विक्रम उज्जयिनीचा यशोधर्मदेव नव्हे हें उघड आहे. व ह्यावरून म. म. प्रो. मिराशी यांचे पान २८, २९ वर निर्दिष्ट केलेला सिद्धांत मातृगुप्ताला काश्मीरच्या गादीवर बसविणारा यशोधर्मदेव होय हा चूक ठरतो. हा काश्मीरचा राजा कवि मातृगुप्त हाच दुसरा कालिदास असावा व ह्यानेंच आपल्यानंतर झालेल्या काश्मीरच्या "प्रवरसेन" राजास सेतुबंध काव्य लिहून दिलें असावें असा तर्क होतो. "मातृ" म्हणजे "काली" हें नामसादृश्य ह्या तर्कास पुष्टि देतें. तसेंच प्रवरसेनाचें व मातृगुप्ताचें समकालीनत्व आणि राजतरंगिणींत वर्णिलेले सलोख्याचे संबंध ह्यांनींहि ह्या तर्कास पुष्टीच येतें. म. म. प्रो. मिराशी ह्यानी पान २९।३० वर ह्याविरुद्ध जीं कारणें दिलीं आहेत तीं पटण्या जोगीं नाहींत. विक्रमाचें व प्रवरसेनाचें

वैर असेल हेंच पटत नाहीं; त्यांचें वैर असलें तरी मातृगुप्ताचें प्रवरसेनांशीं वैर नव्हतें हें उघड आहे.

राजतरंगिणीच्या दुसऱ्या तरंगांतहि एक विक्रमादित्य वर्णिला आहे. ह्याच्या प्रतापादित्य नावाच्या नातलगास काश्मीरच्या लोकांनीं काश्मिरचें राज्य दिलें असें वर्णन आहे. हा शकारि नव्हता असें कल्हण म्हणतो. प्रतापादित्य, त्याचा मुलगा जलौक व नातू तुंजीन ह्यांनीं १०० वर्षे राज्य केलें नंतर विजयादि तीन राजांनीं ९२ वर्षे राज्य केलें. नंतर मेघवाहनानें ३४ वर्षे श्रेष्ठसेन किंवा प्रवरसेन ह्यानें ३० व हिरण्यानें ३० वर्षे राज्य केलें व नंतर मातृगुप्त गादीवर बसला अशी हकीकत राजतरंगिणींत आहे. ह्यावरून प्रतापादित्य गादीवर बसण्याचा काळ शके ६ ठरतो. पण ह्यांत कांहीं अडचणी आहेत. शके ६ मध्ये उज्जयिनीस शक राजे प्रबळ असतां व त्यांचे सम्राट जे कुशान वंशाचे राजे पंजाबांत राज्य करीत असतां दक्षिणकडच्या ("दिगंतरात्" असे शब्द कल्हणानें योजले आहेत त्याचा अर्थ दक्षिणेकडून असा होतो.) राजाच्या नातलगाला काश्मीरच्या गादीवर बसणें शक्य नाहीं. दक्षिणेचा विक्रम शकारि असून त्यानें शकांचा मोड केला असेल तरच तें शक्य आहे पण कल्हण हा विक्रम शकारि नव्हता असें म्हणतो. शिवाय शकाच्या पहिल्या शतकांत "काश्मीर" येथेहि "हुष्क, जुष्क, कनिष्क व वासुदेव हे कुशान वंशीय राजे असले पाहिजेत व त्यांनीं सुमारे १०० वर्षे तेथें राज्य केलें असें कनिष्क शकारंभाच्या सुमारास झाला व त्यानें काश्मीर जिंकला ह्या दोन निश्चित गोष्टीवरून सिद्ध होतें. ह्या वरून असें अनुमान होतें कीं कल्हणानें दिलेला राजांचा क्रम चुकला असून, प्रतापादित्यादि तीन राजांनीं शकापूर्वीच्या पहिल्या शतकांत काश्मीरांत राज्य केलें अर्थात खरा राजांचा क्रम असा

प्रतापादित्यादि तीन राजे १०० वर्षे

हुष्क, जुष्क कनिष्क, वासुदेव १०० वर्षे

अभिमन्यु—सुमारे २४ वर्षे

ह्याचा काळ दिला नाहीं तो सुमारानें घेतला

विजय—शके १०६ मध्ये गादीवर बसला

ह्यावरुन प्रतापादित्याचा राज्यारंभकाळ शक पूर्व ११८ ठरतो. ह्या सुमारास दक्षिणेस कोणी विक्रमादित्य होता काय ? होय.

पुष्यमित्र शुगानें स्थापन केलेले मगध साम्राज्य विक्रमसंवतारंभी म्हणजे शक पूर्व १३५ च्या सुमारास मोडकळीस आलें शकपूर्व १३५ ह्या वर्षी मालवदेशांतील लोक स्वतंत्र झाले व त्यांनीं उज्जयिनीस गणराज्य ( republic ) स्थापन केलें. दक्षिणेंतील अधिक प्रबळ आंध्र राजेहि तेव्हांच स्वतंत्र झाले असले पाहिजेत व त्यांनीं शकपूर्व १३३ ह्या वर्षी मगध साम्राज्य शुंगापासून व त्यांचेच पेशवे जे कण्वराजे, त्यापासून जिंकून घेतलें. हें कार्य करणारा जो आंध्रराजा त्यालाच पुराणांत दिविलक किंवा विलव म्हटलें आहे. आंध्रराजांच्या नाण्यावरून विलिया व कुरा नावांचे दोन राजे झाले असें दिसतें " विलियाव " ह्याचें संस्कृतरूप " विक्रम " असें करणें संभवतें. आणि आंध्रराजा जो हाल त्यानें आपल्या सप्तशतीमध्ये विक्रमादित्यनावाचा एका आंध्राजाचा निर्देश केलाच आहे ह्यावरून असें निश्चित ठरतें कीं शकपूर्व १३५ म्हणजे विक्रम संवतारंभीं, विक्रमादित्य ही पदवी धारण करणारा आंध्रराजा जो सर्व हिंदुस्थानचा सम्राट् होऊन गेला ह्याचाच एक नातलग प्रतापादित्य नांवाचा काश्मीरचा राजा शकपूर्व ११८ च्या सुमारास केला गेला. ह्या विक्रमाच्या दरबारांत असलेल्या कालीदासानेंच मालविकाग्निमित्र, व विक्रमोर्वशीयं व शाकुंतल हीं नाटकें केलीं असें मानल्यानें पुष्कळ गोष्टींची उपपत्ति लागते असें वाटतें. ह्या विक्रमाच्या फारच थोड्याकाळपूर्वी शुंगराजा आग्निमित्र होऊन गेल्यामुळें त्याची खडानिखडा माहिती " मालविकाग्निमित्र " ह्या नाटकांत कालिदास देऊं शकला हा विक्रमादित्य सम्राट असल्यामुळें, " विक्रमोर्वशीय " यांत जो विक्रमाचा निर्देश आहे म्हणतात त्याची ही उपपत्ति लागते

ह्याप्रमाणें तीन कालिदास व त्यांचे तीन विक्रमादित्य व त्याची भिन्न ग्रंथरूपी कार्यें मानल्यानें कालिदासाच्या घोटाळ्याचा उलगडा होईल असें मला वाटते. रघुवंशात हूणांचा निर्देश आणि मालविकाग्नि मित्रांतील अग्निमित्राची खडानि

खडा माहिती ह्यांची उपपत्ति अनेक कालिदास मानल्यानेच होते. मी कालिदासाचे ग्रंथ वाचले नाहींत म्हणून मला खात्री वाटत नाहीं. तरी ज्यांनी कालिदासाच्या नावावर मोडणारे सर्वग्रंथ वाचले असतील त्यांनी माझ्या तर्कांचा विचार करून जुळत असल्यास त्याला पुष्टि द्यावी अशी विनंती करून हा लेख संपवितो.

ज्योतिर्विदाभरणांची भाषा कालिदासास शोभेशी नाहीं असें म्हणणें हि बरोबर नाहीं. कारण तो ग्रंथ फलज्योतिषाचा असल्यामुळें त्यात भाषा प्राविण्य दाखविण्यास अवकाश नाहीं तथापि अ. ११ मध्ये रघुवंश सर्ग ९ मधील श्लोकासारखेच अनुप्रास प्रचुर श्लोक दिलेलेच आहेत माझे तर्क सर्व खरे नसतील तथापि कांही खरे असतील मातृगुप्त हा सेतुबंधकर्ता कालिदास नसून, म. म. प्रोमिराशी ह्यांच्या तर्काप्रमाणें समुद्रगुप्ताचा मुलगा चंद्रगुप्त ह्याचा दरबारचा एखादा कालिदास नावाचा कवि सेतुबंधाचा कर्ता असेल. इतर तर्क खरे असण्याचा संभव जास्त आहे )

---

कै. न म. द वा. पोतदार
संग्रह

# पाणिनीच्या व्याकरणांतील कांही दोष

( ले. महामहोपाध्याय पं. स. कृष्णशास्त्री घुले )

येनाक्षरसमाम्नायमधिगम्य महेश्वरात् ।
कृत्स्नं व्याकरणं प्रोक्तं तस्मै पाणिनये नमः ।

पाणिनीच्या व्याकरणांत दोष आहेत काय हा प्रश्न ऐकल्याबरोबर वैय्याकरणांच्या मनाला आश्चर्याचा धक्काच बसेल. कारण पाणिनीचें व्याकरण म्हणजे अष्टाध्यायी निर्माण झाल्याला आज जवळ जवळ तीन हजार वर्षे झालीं असतील. तेवढ्या अवधींत त्याच्या कात्यायन • पतंजली यांच्यासारख्या अनेक सर्वज्ञकल्प महापंडितांनी अक्षरांची किंबहुना सूत्राची देखील छाननी करून दोष काढून केवळ गुणच तेवढे शिल्लक ठेवले आहेत. पाश्चात्य पंडितांनी त्याचा अभ्यास करून काहींनी जे दोष दाखविले होते त्यांचें कांहींनीं निरसन करून तें व्याकरण शुद्ध स्वरूपांतच आहे असा आपला निर्वाळा दिला आहे त्याकरितां उदाहरण प्रो. विल्सन आणि गोल्डस्टूकर यांचेंच देतां येईल. वेबर आणि बोथलिंग यांनी पाणिनीच्या व्याकरणावर घेतलेल्या आक्षेपांचे गोल्डस्ट्रकर यांनी पूर्णपणें निरसन केलें आहे. विल्सन यांनी पाणिनीचें व्याकरण म्हणजे जगांतील एक आश्चर्य होय असा अभिप्राय व्यक्त केला आहे

(Indian Wisdom) ह्या ग्रंथात त्याने असें म्हटलें आहे कीं, ',The Gramer of Panini is one of the most remarkable literary works that the world has ever seen, and no other country can produce any Grammatical system at all Comparable

to it either for originality of plan or for analytical subtilty. ) अशा या सर्वमान्य व्याकरणांत दोष आहेत काय असा प्रश्न मी विचारणें हें साहसच होय असें मलाहि वाटतें. परन्तु मला जर ते दिसतात तर ते दिसत नाहीत असें कसें म्हणावें ? जेथें प्राचीनांना दोष दिसले नाहीत तेथें ते मला दिसतात हा कदाचित माझ्या वयाचा किंवा दृष्टिमांद्याचाहि परिणाम असू शकेल. परंतु ते दिसतात एवढें मात्र खरें. तेव्हां मला जें दिसतें तें बरोबर आहे कीं तो माझा भ्रम आहे याचा निर्णय करून घेण्याकरितां मला जें दिसतें तें विद्वानांसमोर मांडणें हा एकच उपाय दिसतो. तेव्हां लोकांच्या उपहासाची किंवा निंदेची पर्वा न करतां आपल्या अंतःकरण शुद्धिकरितां व स्वतःच्या समाधानाकरितां मला जें दिसतें तें आज विद्वानांपुढें मांडण्याचें मी साहस करीत आहे. तरी विद्वज्जन मला त्याबद्दल क्षमा करतील अशी आशा आहे.

पाणिनीने वृद्धिरादैच् या सूत्रापासून प्रारंभ केला आहे. म्हणून मीहि तेथूनच आरंभ करणार होतों, परन्तु पाणिनीने ज्या अक्षर समाम्नायावर आपल्या व्याकरणशास्त्राची उभारणी केली आहे त्या अक्षरसमाम्नायाकडे माझें लक्ष जाऊन त्यांतच एक त्रुटि असल्याचें मला दिसून आलें म्हणून त्या त्रुटीचा प्रथम विचार करण्याचें मी ठरविलें आहे. ती त्रुटि म्हणजे ऋग्वेदानें परिगृहीत असा जो " ळ " वर्ण त्याचा त्यांत अभाव असणें ही होय. ऋग्वेदांत " ळ " हा वर्ण सर्वत्र वापरलेला असतांना साक्षात् महेश्वरापासून आलेल्या वर्ण समाम्नायांत त्याचा अभाव असावा हें आश्चर्य आहे. ' ळ ' हा वर्ण अक्षर समाम्नायांत व अर्थातच पाणिनीच्या व्याकरणांत आढळत नाही. ह्याचें कारण काय असावें या संबंधानें आजपर्यंत कोणत्याहि ग्रंथकारानें विचार केल्याचें आढळत नाही. त्यामुळे एक मोठें कोडेंच होऊन बसलें आहे. सायणाचार्यांनी आपल्या ऋग्वेद भाष्यांत " अग्निमीळे " यांतील ' ईळे ' या पदाची व्युत्पत्ति देतांना पुढील कारिका उध्दृत केली आहे. डकारं स्वरमध्यस्थं ळकारं बह्वृचा जगुः । ढकारं स्वरमध्यस्थं ह्ळकारंच तथाक्रमात् । ही कारिका कोठली होय हें त्यांनी

सांगितलें नाही तरी वस्तुस्थिति मात्र त्यांत सांगितल्याप्रमाणेच आहे. म्हणजे ऋग्वेद, ऐतरेय ब्राम्हण व आश्वलायन श्रौतसूत्र या ब्राम्हण वाङ्मयांत स्वरमध्यगत 'ड' चे ठिकाणी 'ळ' व 'ढ' चे ठिकाणी 'ह्ळ' आढळतो. अर्थात ऋग्वेदकालीं 'ळ' हा वर्ण पूर्णपणें प्रचारांत होता हें निर्विवाद आहे. असें असतां तदनतरच्या वैदिक वाङ्मयांत देखील त्या वर्णाचें उच्चाटन कां झालें असावें हें समजत नाही. याचें कारण तसें उच्चाटन बुद्धिपुरःसर केलें गेलें आहे असें दिसून येतें. उदाहरणार्थः—ऋग्वेदांतील अग्निमीळे...हा पहिला सगळा मंत्र तै. सं. च्या ४।३।१३।३ यांत आला आहे. पण मौज अशी की त्यांनी 'ईळे' या पदाचें मूळ रूप बदलून 'ईडे' असे डकारात्मक दिलें आहे. तसेंच 'क्रीळवः शर्धो मारुतं' या ऋङ्मंत्रातील क्रीळं या पदाचे क्रीडं असें रूपान्तर केलें आहे. तै. सं. ४।३।१३।६. (३) 'अपाह्ळमुग्रं पृतनासु' यांतील 'ह्ळ' या अक्षरांत असलेला 'ळ' हा वर्ण बुद्धिपुरःसर काढून त्याच्या जागीं 'ल' हा वर्ण घातला आहे. म्हणजे ह्ल असें केलें आहे. शुक्ल यजुर्वेदांत 'ळ' हा वर्ण नाही. ४ वेदांपैकी यजुः साम व अथर्व या तिन्ही वेदांत तो आढळत नाही. इतकेंच नव्हे तर जिथें तो यावयास पाहिजे तिथे त्याच्याऐवजी 'ड' हा वर्ण घातला आहे. सामवेदांत 'ह्ळ' च्या जागी 'ढ' हा वर्ण घातला आहे म्हणजे त्या वेदानेहि 'ळ' या वर्णाला बहिष्कृत केलें आहे. निरुक्तांत मात्र तो वर्ण जागजागीं आढळतो. यावरून यास्क हा 'ळ' या वर्णाला बहिष्कृत करणाऱ्या लोकांशीं सहमत नव्हता असें दिसतें. त्यानंतरच्या संस्कृत वाङ्मयांत त्याचा मागमूसहि नाही. हें असें कां झालें असावें व कां व्हावें हें कळत नाही. ऋग्वेदांत असलेला 'ळ' हा वर्ण ज्या इतर वेदांत आढळत नाही ते वेद ऋग्वेदाच्या नंतर तयार झाले असले पाहिजेत असें अनुमान केल्यास बाध येईल असें वाटत नाही. तरी संशोधक विद्वानांनी याचा अवश्य विचार करावा. या बरोबर दुसरा प्रश्न असा उत्पन्न होतो की, एके काळीं संस्कृत भाषेंत प्रचारांत असलेला

'ळ' हा वर्ण त्या भाषेंतून सर्वथा नाहीसा कसा झाला. तो संस्कृतांतून नाहीसा होऊन संस्कृतोद्भव जी मराठी भाषा तींत प्राचुर्याने कसा व कुठून शिरला ? तो वर्ण बंगाली हिंदी या भाषांतहि दिसत नाहीं. फक्त कर्नाटकी भाषेंत तो आढळतो. तेव्हां त्या भाषेंतूनच तो मराठी भाषेंत आला असावा असें म्हणावें लागतें. पण तो तरी केव्हां व कोणत्या कारणानें तींत शिरला हें कोडेंच आहे. त्याचा विचार विद्वानांनी करावा. पाणिनी, कात्यायन व पतंजली या मुनित्रयांनीहि या संबंधानें कांहीहि लिहिलें नाहीं. इतकें सांगून मी आतां पाणिनीच्या सूत्राकडे वळतों.

पाणिनींचें पहिलें सूत्र 'वृद्धिरादैच' हें आहे. या सूत्राच्या अंतीं जो च कार आला आहे त्याला चोः कुः या सूत्रानें कुत्व व्हावयाला पाहिजे होतें पण तें येथें झालेलें नाहीं. याचें कारण भाष्यकार म्हणतात वेदामध्ये नियमबद्धता असत नाहीं. त्यांत 'अय स्मय ) 'स सुष्टुभा गणेन' 'ऋक्वता गणेन', इत्यादि प्रयोग सामान्य नियमांच्या विरुद्धहि होत असतात. आणि पाणिनींचीं सूत्रें हीं वेदासारखींच ( छंदोवत् सूत्राणि भवन्ति ) असल्यानें ( त्यांतहि ) येथें कुत्व झालें नाहीं. म्हणून दोष म्हणतां येणार नाहीं. पण हें भाष्यकाराचें म्हणणें मला पटत नाहीं. हें नुसतें समर्थन झालें आहे: कारण वेदांमध्यें झालें तरी कांहीं ठिकाणीं नियम असतातच. क्वचित् त्या नियमांचा भंग झालेला दिसतो इतकेंच. शिवाय एक तर वेद हे अपौरुषेय आहेत आणि सूत्रें हीं पौरुषेय आहेत. वेद हे अरण्याप्रमाणें असून सूत्रें हीं उपवनाप्रमाणें आहेत. सूत्रें हीं शास्त्रें आहेत. वेद हें शास्त्र नव्हत. शास्त्रांनाहि जर व्यवस्थितपणा व नियमबद्धता नसली तर त्यांचें शास्त्रत्वच बाधित होतें. पाणिनीचें व्याकरण अनेक प्राचीन व्याकरणांचा परामर्श घेऊन त्यांच्यांतलि दोष दूर करून शुद्ध स्वरूपांत निर्माण केलेलें व्याकरण होय. असें असल्यामुळें पाणिनीनें स्वतःच केलेल्या नियमांची स्वतःच पायमल्ली करावी हें योग्य होय काय ? घटकाभर त्याचें छांदस् म्हणून समर्थन करतो म्हटलें तरीं तें जुळत

नाहीं. कारण वेदांमध्यें देखील प्रायः नियमाचा भंग झालेला नसतो आणि क्वचित दिसून आल्यास तशा ठिकाणीं त्याला आर्ष म्हणून त्याचा निर्वाह करतां येतो तसा तेथील कुत्वाभाव जर क्वाचित्य असता तर आर्ष म्हणून त्याचें समर्थन करतां आलें असतें. परन्तु हा कुत्वाभाव बुद्धिपुरः सर सार्वत्रिक केलेला दिसून येतो. प्रत्याहरांतील चकार आणि प्रत्ययाच्या अंतीं असलेला च कार यांना ' चोः कुः ' येणे करून कुत्व प्राप्त होत असतांनाहि पाणिनीच्या सर्व अष्टाध्यायी मध्यें असें एकहि स्थळ नाहीं की जेथें च काराला कुत्व केलें आहे. सर्वत्र त्या च करांना जश्त्वच केलेलें आढळतें. म्हणजे त्या च कारांना कुत्व होऊं नये जश्त्वच व्हावें असा पाणिनीचा कटाक्ष स्पष्ट दिसतो याच्या पुष्ट्यर्थ एकच उदाहरण देतो. त्यजूद्ब्राह्मणर्क्प्रथमाध्वर-पुरश्चरण माख्याता ठक् (४-३-७१ सूत्र १४५१.) या सूत्रांत त्यच्, ऋद्, ब्राम्हण, ऋच् प्रथमा अशीं पदें आहेत. त्यापैकीं पहिल्या चकाराला पाणिनीनें कुत्व न करतां जश्त्व केलें आहे. आणि दुसऱ्या ऋच् येथील चकाराला जश्त्व न करतां कुत्व केलें आहे. यावरून पाणिनी प्रत्यय प्रत्यहारगत अशा चकाराला कुत्व करण्याचें बुद्धि-पुरःसर टाळतो हें स्पष्ट दिसतें. पाणिनीने जे ' चोःकुः ' हें सूत्र केलें आहे, त्यासंबंधी भाष्यकार म्हणतात की ' वृद्धिरादैच ' येथील कुत्वाभाव छांदस समजावा. घटकाभर त्यांच्या आदरापुरता तसाहि मानला तरी त्यानंतरच्या सर्व ग्रंथांतहि तो छांदस मानावयाचा काय? पाणिनी वरील टीका देखील छदोवत् समजावयाच्या काय? आणि जर तसें समजावयाचें नाहीं तर ' अजन्त पुल्लिंग ' ' अज्भिरव्यवहितः हलः ' सिद्धमनच्वात् ' इत्यादि वार्तिकें व ' कथमनच्त्वःम् ' इत्यादि भाष्यप्रयोग यांतील कुत्वाभाव हे अशुद्ध समजले पाहिजेत की नाहीत? आणि जर नाहीत तर कां नाहीं? पतंजली पासून तो भट्टोजी दीक्षिता पर्यंत किंवा त्यांच्याहि नंतर नागोजी भट्टापर्यंत देखील इतर पदांच्या अन्यचकाराला कुत्व करीत असतां अच् वगैरे प्रत्ययाच्या किंवा प्रत्या-हाराच्या अन्त्य चकाराला कुत्व करीत नाहीत, असें असतांनाहि

त्यांना कोणीहि चूक म्हणत नाही हें आश्चर्य नव्हे काय? यावर कोणी असें म्हणतील कीं, प्रत्याहाराच्या नकाराला कुत्व केल्यास तो प्रत्याहार उकारान्त होऊन अ क, अव यामध्ये भेद राहणार नाही म्हणून पाणिनीनें तसें केलें नाही, पण हे तरी शास्त्रदृष्ट्या सदोषच आहे. याचा खुलासा पाणिनीनें कोठेंच केला नाही. मला तर असे वाटतें कीं, पाणिनीच्या व्याकरणांतला हा एक मोठाच दोष आहे त्यांनीच केलेल्या नियमांचें त्यांनी प्रतिपालन केलें नाही त्याकरतां अप्रत्यय प्रत्याहारस्य एवढें पद अधिक लावलें असतें. किंवा 'प्रत्यय प्रत्याहारस्यच प्रतिषेधो वक्तव्यः' असें वार्तिक केलें असतें तर निर्वाह झाला असता. पण तसें कोठें केलेलें नसल्याने वैय्याकरणांची मोठी तारांबळ उडाली आहे.

दुसरें, 'ङमोह्रस्वादचिङमुण्नित्यं' याचा अर्थ असा आहे कीं ऱ्हस्व स्वरापुढें पदान्तीं 'ङ् ण् न्' हे वर्ण आले असतां त्यांच्या पलिकडील स्वराच्या आधीं अनुक्रमें ङ ण् न् हे आगम नित्य होतात. म्हणजे ङ ण् न् हे प्रत्येकीं दोन दोन नित्य होतात. म्हणजे या नियमाला अपवाद असत नाही. असें हें पाणिनीनें सूत्र केलें असूनहि त्यानेंच त्याचा पदोपदीं भंग केला आहे. उदा० 'इको यणचि' 'तङानावात्मने पदम् सनाशंसभिक्षुः उणादयो बहुलम्' या सूत्रांत अनुक्रमे यण्णचि तङ्ङाना, सन्ना उण्णा, असें पाहिजे होतें. अशा प्रकारें शेकडो सूत्रांत ङमुट् केलेला नाहीं, हें झाले. पाणिनीच्या संबंधाने पण टीकाकार देखील 'दधी त्यत्रहराति शीतलं पष्ठं सान्द्र इत्येतेषु परेषु यणादिकं न' 'तिङन्तं प्रकरणम्' इत्यादि ङमुङभाव विशिष्ट प्रयोग करीत असलेले सर्वत्र दिसतात त्याचें समर्थन कसें करावयाचें? हे प्रयोग धडधडीत चूक असतां ह्याकडे कोणीहि लक्ष देत नाही. इतकेंच नाही तर ते शुद्ध म्हणून सर्वांना पाठ करावयाला सांगतात हें आश्चर्य नव्हे काय? पाणिनीने 'नित्यं' असें पद घालून त्याचा स्वतःच 'बहुलं' सारखा उपयोग करणें खरोखर दोषास्पद आहे असें मला वाटतें. याचा विद्वज्जनांनी विचार करावा.

येथपर्यंत पाणिनीच्या सूत्रांतील कुत्वाभावप्रयुक्त आणि ङमुङभावप्रयुक्त दोष सर्व वैय्याकरणांनी संगनमताने शुद्ध मानून घेऊन

आपल्याहि पचनीं कसे पाडले आहेत म्हणजे अर्थात् अशुद्ध प्रयोग बिनबोभाट शुद्ध म्हणून कसे प्रचारांत आणले आहेत हें दाखविलें. आतां त्याच्या इतर दोषांकडे वळतों.

पाणिनीचा तिसरा दोष म्हणजे पुष्कळ ठिकाणीं संज्ञाशब्द किंवा पारिभाषिक शब्द यांचीं लक्षणें न देतांच सूत्रामध्यें त्यांचा उपयोग करणें हा होय. त्याने 'वृद्धि' गुण, लोप वगैरे पुष्कळ संज्ञांचीं लक्षणें दिलीं आहेत. परन्तु अशा कांहीं संज्ञा किंवा पारिभाषिक शब्द त्याच्या सूत्रांत येतात कीं ज्यांचीं लक्षणें त्यांनी कोठेहि दिलीं नाहीत. त्यामुळें शास्त्र या नात्याने सूत्रांना वैगुण्य आल्याशिवाय राहात नाही. उदा० 'ऊकालो......' यांत ऊकाल म्हणजे काय हें पाणिनीनें कोठेंच सांगितले नाही. हा दोषच आहे. तसेंच 'तुल्यास्य प्रयत्नं सवर्णम्' (१।१।९) हें सूत्र घेऊं. यांत आस्य आणि प्रयत्न या शब्दांचा अर्थ काय हें पाणिनीने कोठेंच सांगितलें नाही. त्यामुळें त्यांचा अर्थ काय हें समजण्याला अडचण पडते. आतां व्याख्यानतो विशेष प्रतिपत्तिः नहि संदेहाद-लक्षणम्' ही परिभाषा प्रसिद्ध असून पतंजली आदि व्याख्याकारांनी त्या त्या शब्दांची तेथें तेथें फोड केली आहे हें खरें परन्तु सूत्रामध्यें त्यांचें लक्षण दिलेलें नसल्यामुळें त्यामध्यें उणीव भासल्याशिवाय राहात नाही. ज्याचें आस्य आणि प्रयत्न सारखे आहेत त्यांना सवर्ण म्हणावे किंवा ते सवर्ण होत असें सांगतांना आस्य आणि प्रयत्न म्हणजे काय हें आधीं सांगावयाला हवें होतें तें त्यानी सांगितलें नाही हा माझ्या दृष्टीने दोष झाला. पाणिनीने आस्य व प्रयत्न याची माहिती आपल्या सूत्रांतून न दिल्यामुळें भाष्यकारांना त्याच्या अर्थासाठीं कितीतरी खटपट करावी लागली. पण तितकेंहि करून कार्यसिद्धी झाली नाही ती नाहीच. त्यामुळें भट्टोजी दीक्षितांना 'अकुहविसर्ज-नीयानां कण्ठः' इत्यादि प्राचीन कारिकांचाच आश्रय करावा लागला. पण त्यांत ही जी एक अडचण आहे तिकडे दीक्षितांनी लक्ष दिलें नाही किंवा त्यांचें लक्ष गेलें नाही असेंहि म्हणा पाहिजे तर. पण ह्या कारिकेंत जी अडचण

आहे तिचा परिहार त्यांनी किंवा कोणीहि केलेला दिसत नाही. ती अडचण ही की कारिकेंत ‘ अकुह ’ असे शब्द आहेत. म्हणजे यांत ऱ्हस्व अकाराचा निर्देश आहे दीर्घादिकांचा नाही. त्यामुळे तेथें ‘ अ ’ ह्या ऱ्हस्व अकारानेच त्याच्या दीर्घादि सर्व भेदाचें ग्रहण होतें की नाही हें समजण्याला मार्ग नाही. भाष्यकार या संबंधाने कांही सांगत नाहीत त्यामुळें तेथील अकारानेच आकारादिकांचें ग्रहण होत नाही असें म्हणावें तर आकाराच्या आणि हकाराच्या अतुल्यास्यत्वा मुळें म्हणजे त्यांच्या स्थानभेदामुळें त्यांचें सावर्ण्य सिद्ध होणारच नाही. आणि सावर्ण्याची प्राप्तीच नसल्याने त्याच्या निषेधाकरितां “ नाऽऽज्झलौ ” या सूत्रांत आकारसहितो-च् आच् असा जो आकाराचा प्रश्लेष केला आहे तो अनुपपन्न ठरतो. कारण निषेध हा प्राप्तिपूर्वक असतो. आणि प्राप्तीच जर नाही तर त्याचा निषेध कसा संभवतो ? बरें अकाराने दीर्घादिकांचें ग्रहण होतें असें समजलें तर त्यावेळीं ( म्हणजे अकुहविसर्जनीयानांकण्ठ: ) या कारिकेच्या वेळीं ग्रहणक शास्त्र कोणतें होतें कीं ज्याच्या आधारें ऱ्हस्वानें दीर्घादिकांचेंहि ग्रहण करतां येईल ! आणि ग्रहणक शास्त्रावाचूनहि जर दीर्घादिकांचें ग्रहण होऊं शकत असलें तर मग ‘ अणुदित ’ सूत्र करण्याचीहि आवश्यकताच रहात नाही. अणुदित् सवर्णस्यचाप्रत्यय: म्हणजे प्रत्ययभिन्न असा जो अणू आणि उदित् हा सवर्णाचे ग्राहक होत. या सूत्रांमध्यें विवक्षित असलेल्या उदित् आणि प्रत्यय या शब्दांचें लक्षण सांगितलें नाहीत त्यांनी जागजागीं सूत्रांमध्ये प्रत्यय हा शब्द वापरला आहे आणि ‘ चो: कु: ’ इत्यादि सारखे उदित् शब्दहि वापरले आहेत. परन्तु ‘चो :कु:’ इत्यादि ठिकाणी सूत्रांत वापरलेले चु कु वगैरे शब्द हें ग्रहण शास्त्रांत विवक्षित असलेले उदित होत असें कोठेहि सांगितलें नाहीं. त्यामुळे त्याच्या अर्थाकरितां टीकाकारांचाच आश्रय करावा लागतो यामुळे सूत्राला शास्त्र दृष्ट्या कमीपणा येतो. ‘ स्वरितेनाधिकार: ’ यांतील स्वरित आणि अधिकार या दोन्हीं शब्दांचीं लक्षणें दिलीं नाहींत त्यामुळें अधिकार म्हणजे काय काढून घ्यावयाचा वगैरे सांगण्याची सर्व

जबाबदारी टीकाकारावर येऊन पडते व ' यथोत्तरं ' मुनीनां प्रमाण्यम् या सोडवणुकीचा आश्रय करावा लागतो. अशा प्रकारचीं अनेक स्थळें आहेत. तीं जिज्ञासूंनी शोधून पहावीं. मला एवढेंच सांगावयाचें कीं अशा प्रकारच्या अलक्षित संज्ञा पाणिनीनें सूत्रांत घातल्या असल्यामुळें त्याला तेवढ्या बाबतींत वैगुण्यच येतें.

पाणिनीचा चवथा दोष जो दिसतो तो हा कीं त्यानें आपल्या लक्षण सूत्रांमधून जीं नुसतीं विशेषणें दिलीं आहेत. त्याचें विशेष्य कोणतें हें समजण्याला कोठेंहि साधन नाही. उदा०—' तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम् ' हें घ्या. याचा अर्थ भट्टोजी दीक्षितांनी पुढील प्रमाणें केला आहे . ताल्वादिस्थानें आणि अभ्यंतर प्रयत्न ज्याचे ज्याच्याशीं तुल्य आहेत ( यस्य येन तुल्यम् ) ते परस्पर सवर्ण होत. यस्य येन तुल्यं ( ज्याचे ज्याच्याशी ) यांत जो कोण व तो कोण हें दीक्षितांनीहि सांगितलें नाही. अस्य अक्षरस्य असें म्हणावें तर अक्षर हा शब्द पाणिनीनें कोठेंहि वापरला नाही. तेव्हां याचें विशेष्य काय हें कळत नाही. दुसरें उदा०—' मुखनासिकावचनोऽनुनासिकः' मुख आणि नासिका यांनी उच्चारला जाणारा तो अनुनासिक होय. पण तो कोण हें पाणिनी सांगत नाही. दीक्षित म्हणतात ' उच्चार्यमाणः वर्णः' पण पाणिनी उच्चर्यमाण या अर्थामध्यें वर्ण शब्द कोठेंहि वापरत नाही. अष्टाध्यायींत त्या अर्थामध्यें वर्ण हा शब्द कोठेंहि आला नाही. ' वर्णाद्वर्णेन ' या सूत्रांत तो आला आहे पण तेथें तो रंग या अर्थाचा आहे. उच्चार्यमाण हा शब्द या अर्थाचा नाही. तसेंच ' ऱ्हस्वंलघु ' ' संयोगे गुरुर्दीर्घंच ' यांत गुरु, लघु आणि दीर्घ हीं विशेषणें आहेत. तीं कोणाचीं ? ऱ्हस्व दीर्घ हे अचाचे भेद आहेत आणि अच् हा शब्द पुल्लिंगी आहे. मागल्याच सूत्रांत ' ऊकालोऽज्झ्रस्वदीर्घप्लुतः' येथें अच् शब्दाचा पुल्लिंगी निर्देश आहे मग ' ऱ्हस्वः लघुः ' ' संयोगे गुरुः ' असें न म्हणतां ऱ्हस्व 'लघु ' ' संयोगे गुरु ' असा नपुंसकी निर्देश कां ? हें कोडें सुटत नाही. अशी उदाहरणें कितितरी दाखवितां येतील. पण येवढ्यावरून माझ्या म्हणण्याची कल्पना येईल.

पांचवा दोष कोठे कोठे दिसून येतो तो असा की पाणिनी पुष्कळ ठिकाणी अविभक्तिक निर्देश करतो. उदाः–अचोऽन्त्यादिःटिः ' शेषोध्यसखि ' यथें अचोन्त्यादि: टिः ' किंवा ' शेषोधिः असखि ' असं कां स्पष्ट करूं नये ? याचें कारण कळत नाही. तसेंच विभक्ति विपरिणाम करावा लागतो तो तरी कां ?

उदाः—कारके ही सप्तमी येथे अगदीच अनुपयोगी आहे. ' कारकं ' असा अधिकार पाहिजे. आणि तसा नसल्यामुळें टीकाकारांना ' प्रथमया विपरिणम्यते ' असे अर्थ करतांना मानावें लागतें तसेंच कांहीं ठिकाणी त्यानी पूर्वाचार्यांच्या संज्ञा न कळत आपल्या अष्टाध्यायींत घातल्या आहेत.

उदाः—' टाभ्याभिस् ' हे पाणिनीने दिलेले तृतीयेचे प्रत्यय आहेत. यातील टी च्या आ ला ना होत असतो. पण पाणिनी म्हणतात ' आङोनास्त्रियाम् ' इकडे टा असा प्रत्यय देवून आङाला ना होतो असें म्हणतात. त्यामुळें टीकाकारांना आङ इति टा संज्ञा प्राचाम् असें म्हणून सांभाळून घ्यावें लागतें. या सर्व गोष्टी शास्त्र या दृष्टीने पाहतां बरोबर आहेत असें म्हणता येणार नाही. कदाचित् पूर्व वैय्याकरणांचीं सूत्रें पाणिनीने जशींच्या तशींच उद्धृत केलीं असतील व त्यामुळें अशी गडबड कदाचित् दिसत असेल. तसें असलें तरी तें बरोबर नाही असेंच म्हणावें लागतें.

सहावा दोष ' ङसिधुट् ' ङमोन्हस्वादचि ङमुट् नित्यम् इत्यादि सूत्रांत सि, अचि इत्यादि पदें षष्ठयंत मानून त्यांचा सस्य, अचः असा अर्थ करावा लागतो. तसे करणें ' तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य ' या पाणिनीच्या परिभाषेच्या विरुद्ध आहे. पण विभक्ति विपरिणाम केल्यावाचून गत्यंतर नाही ही आपत्ति ओळखून भाष्यकारादि टीकाकारांनीं ' उभयनिर्देशे पंचमी निर्देशो बलीयान् ' अशी परिभाषा निर्माण करून त्या आपत्तीचा परिहार केला आहे. हे जरी खरें आहे तरी ही परिभाषा ' तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य ' ' तस्मादित्युत्तरस्य ' या ठिकाणी पाणिनीने स्वतःच घ्यावयाला पाहिजे

होती तरीच त्यांनी ती तेथे दिली नसल्याने ती आपत्ति निर्माण करण्याचा दोष स्वतः पाणिनीवरच येतो. कसा टळणार ? तसेच लटः शतृशानचावप्रथमासमानाधिकरणे, सूत्रांतील 'अप्रथमासमानाधिकरणे' हें पद निरर्थक दिसतें त्याने सूत्राला निष्कारण गौरव आणलें आहे. वैदिक काला पासून तों पाणिनीच्या काळापर्यंत प्रथमा समानाधिकरण्यांत लटाला शतृ प्रत्यय झाल्याची शेकडो उदाहरणें आढळतात त्यामुळें 'अप्रथमासमाधिकरणे' हें पद सदोष ठरतें.

आतां यापुढें कात्यायन पतंजली इत्यादिकांनी दाखविलेले पाणिनीचे दोष, दोष कसे नाहीत हे दाखविण्याचा मी प्रयत्न करतो.

पहिला मोठा दोष म्हणून ज्यावर सर्व वैय्याकरणांनी फार मोठें काहूर माजविलें आहे तो म्हणजे 'हलन्त्यम' या सूत्रात हल् म्हणजे काय हें न सांगताच त्याचा उपयोग केलेला आहे. खरें पाहिलें, तर मी मागे जे दोष दाखविले त्यांतील पहिल्या दोषासारखाच हा आहे. म्हणजे व्याख्या न देतां पारिभाषिक किंवा संज्ञा शब्दाचा उपयोग करणें. पण आस्य, प्रयत्न उदित इत्यादि शब्दांबद्दल ज्यांना काहीच वाटलें नाहीसे दिसते त्यांनीच हलन्त्यम् या सूत्राबद्दल इतकें तांडव करावें हें आश्चर्य आहे. हलन्त्यम या सूत्रावर टीकाकारांनी कितीतरी लिहिलें असून शेवटी 'हलन्त्यम्' या एका सूत्राच्या ऐवजी दोन सूत्रें केलीं पाहिजेत असा निष्कर्ष काढून एकच सूत्र करणाऱ्या पाणिनीला दोषी ठरविलें आहे. पण मला असें वाटतें कीं हा त्यावर दोषाचा आरोप वृथा आहे. कारण कीं आस्यादिक शब्दाचा अर्थ जर पूर्वाचार्यांच्या परंपरेनें विदित असल्याचें गृहीत धरून जसा त्या त्या सूत्रांचा त्यांनी निर्वाह केला तसाच हल्, अच् इत्यादि पदार्थांनाहि प्रसिद्ध असल्याचें समजून याहि सूत्राचा त्यांना निर्वाह करता आला असता पण त्यांनी तसा केला नाही येवढें खरें. मला असें वाटतें कीं, अच् आणि हल् हे शब्द स्वर आणि व्यंजन या दोन अर्थी अनुक्रमें रूढ होते. या कल्पनेला माझें पहिलें कारण असें आहे कीं, पाणिनीने

हल् हा शब्द व्यंजनार्थी जेथें वापरला आहे तेथे तो नपुसकलिंगी वापरला आहे आणि जेथें तो प्रत्याहारार्थी आहे तेथे तो पुल्लिंगी आहे. उदा:—आरंभी पहिल्याच पदाचं सहावे सूत्र जें 'हलोनन्तरा: संयोग:' यांत हल् शब्द पुल्लिंगी वापरला आहे. पण हलन्त्यम् या सूत्रांत 'अन्त्यहल्' असा नपुंसकलिंगी वापरला आहे. तसेंच 'हल्ड्यान्भ्यो दीर्घात् सुतिस्यपृक्तं हल्' यथे पहिला हल् पुल्लिंगी असून शेवटचा हल् नपुंसकलिंगी वापरला आहे. कोणतीही अनुपपत्ति न येता हलन्त्यम् आणि हल् शब्दाने व्यंजन अभिप्रेत होते असे मानल्यास या सूत्रावरील आक्षेप त्या सूत्राने दूर होतो. दुसरी गोष्ट अशी की इत्संज्ञेचें ज्ञान पाणिनीला पूर्वकाली देखील होते हें 'उणा दयो बहुलम्' या सूत्रावरून आणि धातुपाठावरून स्पष्ट दिसतें. उणा दयो बहुलम् या सूत्रावरून पाणिनीच्या पूर्वी उण आदि हे प्रत्यय प्रसिद्ध होते हें उघड आहे आणि उण् मध्ये णकार हा इत्संज्ञक असल्याशिवाय कारु या शब्दाची रूपसिद्धि होणार नाही. इत्संज्ञा लोपाचेच ज्ञान नव्हे काय पण ण कार इत्संज्ञक असल्यास आदि वृद्धि होते हेंहि पूर्वी माहीत होते असे यावरूनच म्हणावे लागतें. धातुपाठामध्ये जे निरनिराळे धातु दिले आहेत त्यांत 'अनुदात्तेत आत्मनेपद' इत्यादि मध्यें अनुदात्तेत आणि ङित असे जे धातु आहेत त्यांना आत्मनेपद करावे असे पाणिनी सांगतो. अर्थात् पाणिनीच्या पूर्वकाली प्रसिद्ध असलेल्या धातुपाठांत इत्संज्ञकांचा उपयोग विशिष्ट उद्देशाने केलेला होता हें उघड आहे. आतां धातुपाठ हा पाणिनीच्या पूर्वीचाच होता का नाही या बद्दल कोणी शंका व्यक्त करतील तर ती बरोबर होणार नाही. कारण 'भूवादय–धातव:' असें पाणिनीनें मानिलें आहे. त्यांत 'भू सत्तायाम्' हा भ्वादिचा आरंभ असल्याने भ्वादि म्हणण्याला कांही हरकत नाही. परंतु वादि कसें म्हटलें हा प्रश्न आहे वस्तुत: अदादि म्हणावयाला पाहिजे होतें तसें म्हटले नाही याचें समाधान माझ्या दृष्टीने असें करतां येईल की पाणिनीच्या काळीं 'वा' पासूनच हल्लीच्या अदादि गणाचा आरंभ होत असावा. परन्तु 'अदि प्रभृतिभ्य: शप:' हें सूत्र पाहून त्याच्या

नंतरच्या संस्करणकारांनी वादिच्या आधीं अद् धातु हा प्रथम आणला आहे. याच्या पुढील शपाच्या लुकाचा कांहीहि उपयोग नाही. वा प्रभृति सर्व आकारान्त धातुपुढें झालेल्या शपाचा लुक् न केला तरी त्याच्या रुपांत कोठेंहि कमी अधिक पणा येत नाहीं. म्हणून वा पुढे लागणाऱ्या शपाचा लुक् सांगण्या ऐवजी अद् धातुपासून पुढील धातूंना लागणाऱ्या शपाचा लुक् सांगितला आहे असें मी समजतों. यावर पूर्वीचा पाठ निराळा होता आणि संस्करणकारांनी धातुपाठ बदलला असावा या तर्काला आणखी काही प्रबल प्रमाण आहे काय असें जर कोणी विचारतील तर त्याला माझें उत्तर होय असें आहे. तें प्रमाण असें: —पाणिनीने ' तनादि कृञ्भ्यउः ' असें सूत्र केलें आहे. कृञ् हा धातु पाणिनीच्या वेळेस तनादि पाठामध्ये परिगणित असता तनादि म्हणून पुनः कृञ्भ्यः असे वेगळे म्हणण्याची काय आवश्यकता होती ? तनादिभ्यउः येवढ्यानेच निर्वाह होत होता मग कृञ्भ्य: हा गौरवोत्पादक शब्द त्यांनी कशाला घातला असता ? यावरून असें म्हणावे लागतें कीं त्यावेळीं पाणिनीच्या पाठात ' कृञ् हा धातु नव्हता तो धातु नवीन संस्करणकारांनी पाणिनीच्या सूत्राच्या आधारें त्या गणामध्यें मागाहून व तोहि शेवटीं घातला आहे हें स्पष्ट दिसतें. यावरुन धातुपाठ पाणिनीच्या पूर्वी प्रसिद्ध होता व त्यात पाणिनीच्या नंतरच्या संस्करणकारानी पुष्कळसा अदलाबदल केलेला असावा असें सिद्ध होतें. पाणिनीच्या पूर्वी धातुपाठात इत्संज्ञक धातु अनेक दिलेले आहेत त्यावरून इत्संज्ञकाची कल्पना पाणिनीच्या पूर्वकाली प्रचारात होती असें म्हणण्याला बाध येत नाही. आणि त्यांतील इत्संज्ञक जे हलीचे व्यंजन त्याला हल् अशी संज्ञा असून स्वराला अच् अशी संज्ञा होती. असें मानले म्हणजे कोणतीहि अडचण रहात नाही. व हलन्त्यम् या सूत्राची द्विरावृत्ति करण्याची आवश्यकताच नाहीशी होते.

दुसरा एक दोष प्राचीन वैय्याकरणानी पाणिनीला दिला असलेला जो मला असमर्थनीय वाटतो तो हा कीं, त्याने 'रषाभ्यांनोणः समानपदे ' यामध्यें ऋकाराचें ग्रहण केलें नाही. ही उणीव दूर

करण्याकरिता कात्यायनाने ' ऋवर्णा नस्यणत्वं वाच्यम् ' असें वार्तिक तयार केलें आहे पण मला वाटतें कीं हे वार्तिक करण्याची आवश्यकता नाही. ऋकारापुढें आलेल्या नकाराला 'णत्व' होतें हें पाणिनीला माहित होतें कारण 'अप्तृन् तृच् स्वसृनप्तृनेष्टृत्वष्टृक्षत्तृहोतृपोतृप्रशास्तृणाम् ' ' अनुप्रतिगृणश्च ' इत्यादि ठिकाणीं ऋकारापुढे असलेल्या नकाराला ' णत्व ' पाणिनीने स्वतः केलें आहे. तें तसें करूनहि तसा विधि त्यानें ( पाणिनीनें ) आपल्या सूत्रांत कोठेंहि दिला नाही याचें कारण काय असावें हा प्रश्न येतोच. त्याचे उत्तर माझ्या मते असे आहे की पाणिनी हा ऋकारामध्यें रेफाचा समावेश करीत होता. म्हणजे पाणिनीच्या मतें ऋकारामध्यें रेफांश आहे असे ठरतें याला प्रमाण ' कृपोरोलः ' या सूत्रांत ' कृपः रः लः । कृप् यांतील रेफाला रकार होतो असे पाणिनीने स्पष्ट म्हटलें आहे. वैय्याकरणांनी ' कृपोरोलः ' याचे कृप् उः रः लः असा विचित्र पदच्छेद करून अर्थ करण्याचा प्रयत्न केला आहे पण तो बरोबर नाही असें मला वाटतें. कौमुदीकारानें देखील ऋज ' गतिस्थानार्जनोपार्जनेषु ' अर्जते । नुविधौ ऋकारैकदेशो रेफो हल्त्वेन गृह्यते । ततो द्विहल्त्वान्नुट् । आनृजे । ' या ठिकाणी ऋ मध्ये रेफाचा संग्रह होता या गोष्टीला आपली कबुली दिली आहे. म्हणून कात्यायनाने केलेलें ऋवर्णात् नस्यणत्वं वाच्यम् ' हें वार्तिक न करतांहि रषाभ्यांनाणः समानपदे ' या सूत्रानेच ऋवर्णापुढील नकाराला णत्व होतें असें पाणिनीला सांगावयाचें होतें किंवा तोच त्याचा अभिप्राय होता हें सिद्ध होतें म्हणून उक्त वार्तिकाची आवश्यकता रहात नाही.

अस्थानीं दोषारोपणाचें आणखी एक उदाहरण देतों. ' ऋऌवर्णायोः मिथः सावर्ण्यम् वाच्यम् ' हें वार्तिक आणि र प्रत्याहार ह्या मागाहूनच्या कल्पना पाणिनीला कमीपणा आणतात. पण तशी कल्पना अगदी अनावश्यक आहे. ऋ ऌ हे दोन वर्ण स्थानाने आणि प्रयत्नानें परस्पराहून भिन्न असून त्यांचें सावर्ण्य शक्य नाही असें पाणिनीच्या

नियम सांगत असताहि सर्व प्रकारें भिन्न असणाऱ्या त्या दोन वर्णांचें सावर्ण्य कात्यायनानें जबरीनें ठरवावें आणि त्याला भाष्यकारांनी संमति द्यावी हें आश्चर्य होय. बरें एवढा आग्रह कशाकरितां तर होतॣकार या काल्पनिक उदाहरणाची त्यांच्या इच्छेप्रमाणे सिद्धि व्हावी म्हणून! वस्तुतः भाषा आधीं असून त्या भाषेच्या सिद्धि करितां व्याकरण नियमांची आवश्यकता असते. आतां होतॣकारः अशा अर्थाचें संस्कृत किंवा वैदिक भाषेमध्यें देखील एकहि उदाहरण दृष्ट नाहीं. तेव्हां होतॣकारः अशा प्रकारचें जगताच्या बाहेरचें काल्पनिक उदाहरण निर्माण करून त्याच्या सिद्धिकरितां नवा नियम करणें आणि तोहि पाणिनीच्या नियमाच्या विरुद्ध करणें योग्य नव्हे. हीच गोष्ट र प्रत्याहाराची. र प्रत्याहारामध्यें ल ण् येथील लकारांतर्वर्ती अकाराला इत् संज्ञक कल्पून र आणि अ असा प्रत्याहार करून रेफ र व ऌ यांचा संग्रह करावयाचा आणि तो कशा करतां तर 'तव ऌकारः' या काल्पनिक उदाहरणांत तवल्कारः रूप झालें पाहिजे, तवकारः असें होता कामा नये म्हणून. मी असें विचारतों कीं तवकारः असें रूप झालें तर काय अनर्थ होणार आहे? कोणत्या प्राचीन शास्त्रकाराला, वेदाला किंवा आणखी कशाला बाध येणार आहे कीं ज्याकरितां मुद्दाम ही रूपसिद्धि केली आहे? आणि याचा काहीं उपयोग नाहीं. हा व्यर्थ उद्योग आहे म्हणूनच काहींनी र प्रत्याहाराचें खंडण देखील केलेलें आहे. 'र प्रत्याहार मंडणम्' व 'र प्रत्याहार खण्डणम्' हे दोन्ही निबंध वैय्याकरणांना परिचितच आहेत.

अशा प्रकारें मी ही दिशा दाखविली आहे. मी दाखविलेले पाणिनीचे दोष व इतरांनी दाखविलेले दोष यांचें परीक्षण विद्वान लोक करतीलच. माझा उद्देश हा कीं या दिशेनें विद्वानांनी प्रयत्न करून इतर असलेले दोष आणि दोषाभास शोधून काढावे.

---

# महानुभावांचा एक प्राचीन ग्रंथ

[ लेखकः—श्री. बापुसाहेब भवाळकर ]

शय्यापालनाप्रमेय हा एक लहानसा गद्यप्रबंध असून, तो चक्रधर स्वामींनी आपल्या 'एकाइसे' नामक शिष्यिणीला सांगितलेल्या एका दृष्टान्ताच्या आधारावर रचिला आहे. आपल्या शिष्यांबरोबर वादविवाद व चर्चा करीत असतां श्री चक्रधर चर्चेचा विषय विशद करण्यासाठीं अनेक उद्बोधक उदाहरणें व दृष्टांत देऊन त्यांतील रहस्य मनावर बिंबेल व विषय सुगम होईल असें विवरण करीत असत. असे बरेच दृष्टान्त एकत्र करून व त्यांतील विचार-प्रणाली सुसंगतपणे मांडून आणि त्यांतील अध्यात्मिक तात्पर्य अखेरीस दाखल करून केशोराजव्यास यांनी एक 'दृष्टान्तपाठ' स्वामींच्या निर्याणानंतर संकलित केला. त्यांत ११४ दृष्टान्तांचा समावेश केला असून "शय्यापालनचा" दृष्टान्त क्रमपरत्वें ८९ वा आहे.

## ग्रंथाचा रचनाकाल

शय्यापालन दृष्टान्तावर भाष्यांच्या सूचींत दोन प्रमेयांचा उल्लेख आहे; पैकीं पहिले प्रमेय कवीश्वरव्यासाची शिष्या व नागदेवाचार्यांच्या महेश्वरपंडित नामक पुत्राची मुलगी 'नाति नागाईसे' हिनें लिहिला असून दुसरें प्रमेय कवीश्वरव्यासाचा शिष्य परशुरामव्यास याचें आहे. आजच्या प्रमेयाचें कर्तृत्व या दोघांचें नाहीं, असे वाटतें; आणि या प्रमेयांत जी पूर्वकाळीं संतांची नांवे आलीं आहेत, त्यावरून याचा रचनाकाल १४ व्या खिस्ती शतकाच्या उत्तरार्धांत अगर १५ व्याच्या पूर्वार्धांत अंदाज अनुमानिता येतो. तथापि हे प्रमेय १५ व्या शतकांत होऊन गेलेल्या मुरारीमल्लाच्या

पूर्वीचें असावें आणि त्यात जुन्या दोन्ही प्रमेयांचा भाव अंतर्भूत झाला असावा, असें अनुमान होतें. या प्रमेयानें हस्तलिखित पोथीची २१ पानें व्यापिलीं आहेत. व त्यांत सुमारे ३० चक्रधर सूत्रें व १४ केशीराजाच्या दृष्टान्तपाठांतील दृष्टान्त यांचा आधार व उल्लेख केला आहे. तसेंच प्रमेयांचें विवरण करीत असतांना लीळाचरित्रांतील चक्रधराच्या अनेक लीला देऊन ग्रंथाशय स्पष्ट केला आहे. पाच सहा शद्बांचें एक चक्रधर सूत्र घेऊन त्याच्यावरील पाच सहा ओळींच्या दृष्टान्तावर हें २१ पानाचें प्रमेय रचिलें आहे. ही प्रमेयस्वरूपाची रचना चक्रधरस्वामीच्या निर्याणानंतर नागदेवाचार्यांच्या नेतृत्वाखालीं केशीराजव्यास व दामोदरपंडितव्यास यांनीं जी पंथाची शास्त्रोक्त मांडणी केली, तेव्हांपासून सुरू झाली. चक्रधरोक्त सूत्राचे पाठ तयार झाले आणि लीळाचरित्र रचलें गेलें, त्याचवेळीं प्रमेयरचना प्रचलित होती. याला एक आधारहि आहे. केशीराजव्यासाच्या नांवावरील एका दृष्टान्तावर म्हणजे द्विभार्या दृष्टान्तावर रचिलेल्या एका प्रमेयाचा सूचींत उल्लेख आला आहे. विद्यामार्ग, संसरण महावाक्य, निर्वचन आणि उद्धरण या पांच प्रकरणावर प्रमेयें असून दृष्टांत प्रकरणावर ८ प्रमेयें आहेत. या सर्व प्रमेयांची सूचींतील संख्या १७ पर्यंत गेली असून सुरारी मल्लानें १२२ प्रमेयें केलीं असें म्हणतात. आमच्या वाचनांत पहिल्या अकरा प्रकरणांवर ४ प्रमेयें असून दृष्टांतावर २ प्रमेयें आलीं आहेत. त्यावरून या प्रबंधाची सामान्य कल्पना स्थूलतः येते. अनंतराजाचा द्वात्रिंशत् लक्षण हा मूळ संस्कृत ग्रंथ व त्यावरील लक्षणरत्नाकर नामक मराठी गद्य टीका यांच्या साहाय्यानें ती बरीच स्पष्टहि झाली आहे.

## ग्रंथाची विवेचनपद्धति

ही प्रमेय घाटणीची विवेचनपद्धति संस्कृत न्यायपद्धतीस अनुसरून आहे. या प्रमेयात्मक निर्वचन प्रकाराचें स्पष्टीकरण भावसर्वज्ञांनी ' न्यायसारांत ' केलें आहे. प्रमाणादिकांचा आश्रय करून जें जाणावयाचें तें काय असा प्रश्न करून तें ' प्रमेय ' होय असें उत्तर देऊन त्यांचे भावसर्वज्ञांनीं लक्षण केलें आहे. हे प्रमेय चतुर्विध आहे (१) हेय

(२) त्या हेयाचे निवर्तक (३) आत्यंतिक हाव आणि (४)त्या हावाचा उपाय. अप्राप्त असणारें म्हणजे जें आपल्या उपभोगार्थ न लाभलेलें असें २१ प्रकारचें दुःख आहे तें सर्व 'हातुं योग्यं' हेय होय. ह्या २१ प्रकारच्या दुःखाचें कारण अविद्या, तृष्णा, धर्म व अधर्म आहेत, असा तत्वविदांचा निश्चय आहे.त्या सर्वांचें हान करणें हाच त्याचा अेकमेव उपाय आहे. इतके प्रास्ताविक विवेचन केल्यावर भावसर्वज्ञ आत्म्याच्या स्वरूपाकडे वळतात. हा आत्मा दोन प्रकारचा पर आत्मा व अपर आत्मा. अपरात्मतत्त्वज्ञान म्हणजे जीवात्म्याचें यथार्थ ज्ञान झाले म्हणजे ते स्वर्गादि परलोकप्राप्तीस व अधर्मनाशास कारण होते. भावसर्वज्ञांच्या प्राप्तीस व अधर्मनाशास कारण होतें. भावसर्वज्ञांच्या न्यायसारांतील 'आगतपरिच्छेदाच्या' आधारें वर जो विचार केला आहे, त्याचें कारण महानुभाव ग्रंथांतील विचारसरणीचें न्यायसार संमतमार्गाशीं साम्य होय. यावरून उत्तर यादव काळीं महाराष्ट्रांत विशेषतः पैठण—देवगिरीकडे जी महावाक्यांतर्गत सिद्धांतप्रतिपादन पद्धति प्रचारांत होती ती तत्सदृश असावी असा ग्रह बनत जातो.

## ग्रंथांतील कथानक

शय्यापालनचा दृष्टांन्त चक्रधर स्वामींनीं एकाइसेला निरुपिला तो त्यांनीं बद्रिकेदारास जाण्याच्या वेळीं; ह्मणजे शके ११९४ माघ मासीं बेलापूर ग्रामीं आपल्या शिष्यवर्गाची शेवटची भेट घेऊन स्वामींनीं सर्व निरवानिरव केली तेव्हां सांगितला. अखेरच्या सात दिवसांत त्यांनीं शिष्यांस असंनिधान धर्माचा उपदेश केला आणि त्यावेळीं जे कांहीं दृष्टान्त सांगितले त्या १७ दृष्टान्तांचा समावेश केशीराजानीं आपल्या दृष्टांन्त पाठांत केला आहे. 'एकाइसे' ही बालविधवा होती आणि ती आपली आई व धाकटी बहिण यांच्या समागमें दृष्टान्त कथनाच्या पाच सहा वर्षांसाठीं स्वामींनीं जेव्हां आपल्या अवतार कार्यास प्रारंभ केला, तेव्हां वेरुळास आपल्य आप्तांबरोबर दर्शनास, गेली होती. या कुटुंबाची हकिकत अत्यंत हृदयद्रावक आहे. हिचा भाऊ मरण पावला, दायादांनीं बापाची सर्व मालमत्ता हरण

केली व आईस मायबाईसेला ' अन्नवस्त्रास महाग केलें. ती स्वतः लहानपणीं विधवा होऊन परत आली होती आणि तिची धाकटी बहिण जसमाइसे ही अपस्माराने पीडली म्हणून नवऱ्याने तिला टाकून दिलें होतें. या सर्व संकटांनीं गांजून गेल्यामुळें त्रिवर्गांनीं प्रायोपवेशनाचा निश्चय केला व द्वारकेस जाऊन क्षेत्राच्या संनिधानीं हा विधि उरकण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें यात्रेकरूंची सोबत मिळविण्यासाटीं त्या पैठण येथें आल्या व तेथें त्यांचा आप्त सारंग पंडित यांची गांठ पडून त्या त्याच्या मदतीनें द्वारकेस जाणाऱ्या यात्रेकरूंच्या सोबतीची चौकशी करूं लागल्या. सारंग पंडितास ही सर्व कहाणी ऐकून वाईट वाटलें व आपल्यापरी त्यांची समजूत घालून प्रायोपवेशनापासून त्यांचें मन वळविण्याचा त्याने यत्न केला. स्वामींची भेट झाल्यास त्यांच्या उपदेशाचा अनुकूल परिणाम झाल्यास पहावें या उद्देशानें त्यानें त्रिवर्गास एलापूरास नेलें. यथाकाल स्वामींचें दर्शन झालें व त्यांनीं त्यांना आत्महननापासून परावृत्त केलें. त्या उपदेशांतील कित्येक सूत्रें पाठांत समाविष्ट आहेत. स्वामींनीं सेवेस ठेविल्यामुळें जसमाइसेच्या अपस्माराचा जोर कमी झाला व व्याधी गेल्यावर एकाइसेला पाठराखणी देऊन मुलांची सासरी रवानगी करण्यांत आली. आईस ऋद्धपूर येथें गोविंद प्रभूच्या सेवेस जाण्यास सांगितलें. माइबाइसे ' हिला अशा प्रकारें मनःशांति मिळाल्यामुळें पुढें तिचें नांव शांतिबाईसे ' असें ठेवण्यांत आलें. पुढें ती ऋद्धिपुरीं कालवश झाली व एकाइसे "बाईसे" नामांविका इच्याजवळ राहून स्वामींच्या सेवेंत कालक्रमण करूं लागली.

अशाप्रकारें त्रिविध तापानें पोळलेली स्वामींच्या अनुग्रहाचा अनुभव घेतलेली वेल्होपुरी स्वामी आतां जाणार व पुन्हा त्यांचें दर्शन या जन्मीं होणार नाहीं, या दुःखानें व्याप्त झाली असतां तिला अनेक प्रकारचा उपदेश करून तिच्या दुःखित मनाचें समाधान करून ज्यांत असंनिधान धर्माचें तत्त्वज्ञान व आचरण विहित, असें ध्वनित असलेला व एकाग्राच्या भावार्द्र स्वभावास पटणारा असा हा शय्यापालनेचा दृष्टांत स्वामींनीं तिला सांगितला आहे.

## प्रमेयाचें वि.रण

व्यक्ति आणि प्रसंग यांचें स्पष्टीकरण झालें यानंतर दृष्टांताचें स्थान जें वेलापूर याच्र अध्यात्मिक स्वरूप या प्रमेयाच्यावर वादांत सांगून मग दृष्टान्ताकडे वळू "तें नाचि दुःखरूप। कांपां वियोगुमर्मी हा धर्मु पहिला." महानुभावाच्या भावनेस चक्रधराचें प्रकरण व स्थळ दुःखद विचार उत्पन्न करणारें असल्यामुळें असें वाटणें स्वाभाविक आहे शय्यापालनेचा दृष्टान्त येणेंप्रमाणें आहे कव्हणी एकि शय्यापालना असे. ते आपुलेल्या पतीचा धर्मी वर्ते: आपुलेया पतीची ए सेजे कव्हणा रिगों नेदी: आपण कव्हणाची वास (प्रतिक्षा) न पाहे। ति एचेया देखोदेखी ति एतें पुसपुसों मूद्रिणांहि तैसीचि वर्ते: तर जेचि गति तिएसि ( शय्यापालनेस ) होए तेचि गति तिएसि होय. या दृष्टान्तावर केशीराजाचें दृष्टांतिक आहे ते असें "तैसें संनिधानस्तीता पुरुषाचेया देखो वेखी तयातें पुसत पुसते असंनिधानस्तति पुरुषु तैसेचि वर्ते तरी जेचि गति तयासी होए तेची गति तयासि होए।" हा दृष्टान्त ज्या चक्रधरोक्त सूत्रावर आरुढ झाला आहे तें विचारपाठात दिलें आहे. "संनिधानी असंनिधान एका असंनिधानी संनिधान।" याच सूत्राला सदृश व अर्थविस्तार करणारें आणखी सूत्र आचारमालिकेंत आहे. यावर गुजर शिवव्यासाचें जें भाष्य आहे त्यातहि असेच स्पष्टीकरण आहे. या दृष्टांतावर प्रमेय करणें म्हणजे त्याच्या व्याप्तीची सादृश्यभावाची व अंतर्हित अध्यात्मिक रहस्याची मोजणी-मापणी करणें होय. दृष्ट अशी जी आधिभौतिक सृष्टि व तदुत्पन्न सुखदुःखें यांच्याशीं अदृष्ट अशी जी मानसिक म्हणजे आधिदैविक व अध्यात्मिक सृष्टि व तदुत्पन्न सुखदुःखे यांची परस्पर सादृश्यवैदृश्यद्योतक तुलना करून तारतम्यभाव स्पष्ट करून ह्या दृष्टादृष्टाचा आशय लक्षांत आणावा. हे बुझाविण्याचें कार्य दृष्टान्त करीत असते. या दृष्टान्ताचें दोन भाग असून पूर्वदलांत उदाहरण आणि उत्तरदलांत दृष्टांतिक संज्ञा ज्यास दिली आहे ते अध्यात्मिक समन्वयरूपी तात्पर्य अंतर्भूत होतें शय्यापालनाचा दृष्टान्त दृष्टान्तपाठाच्या चरण भागांत आला आहे व त्यांतील

एकंदर विचारसरणीच्या अनुरोधानें या दृष्टान्ताचा समर्पकपणा अधिक स्पष्ट होतो. परंतु, त्यासाठीं केशो राजाच्या 'लापणीकांनें' साहय घ्यावें. शय्यापालना प्रमेयाच्या सुरवातीस 'तरी शय्या पालना कां सांगितली ना असन्निधानीचा पुरुषु संविधानांचेया पुरुषा सारखें वर्तन करा: तरी दोहोसी एकच गति" असा सांगितला आहे. एकाइसेचा या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव आला होता. स्वामी नसतांना ती पाठराखणासाठीं ग्रामांतरीं असतां स्वामीच्या अनुग्रहानें तिला शांभवस्थिति प्राप्त झाली होती. हा पतिधर्मोपदेश दोन प्रकारचा आहे. 'अंतरक्रिया तेतुलें कर्म आणि व्रतक्रिया तेतुला धर्म" हा वास्तविक स्त्रीधर्म परंतु जीवांचा पति परमेश्वर असल्यामुळें तो पुरुषांस सांगितला. विश्वाचा पति परमेश्वर असल्यामुळें, जीव हा जर सर्व गुणसंपन्न असला तर 'अहेव' नाहीं तर "रांड" होईल हें उघड आहे, येथें प्रमेयकारानें दुर्भगादृष्टान्ताचा हवाला दिला असून पुढें असेच १५।१६ दृष्टान्त दिले आहेत. यापुढें या प्रमेयांत निर्दिष्ट जी शैय्यापालना तिच्या अवस्थेंचें वर्णन प्रमेयकारानें अत्यंत मार्मिकतेनें केलें आहे.

## ग्रंथांमुळें पंथावर पडणारा प्रकाश

याप्रमाणें या प्रमेयाचें विवरण करून शेवटीं प्रमेयकारानें बाह्यधर्म व अंतरधर्म प्रकट करून ज्यांनीं ते आचरणांत आणले त्यांचीं उदाहरणें दिलीं आहेत चक्रधराच्या वेळीं महाराष्ट्रांत जी धर्माचरणाच्या बाबतींत अव्यवस्था माजली होती तिचें विवेचन उद्बोधक असलें तरी तो आजचा विषय नव्हे. तथापि ज्या पंथांत अशाप्रकारची रचना होत होती, तो पंथ सद्बीजसंभूत आहे असें वाटावयास लागेल अशी उमेद आहे. या पंथाचें स्वरुप द्वैती असलें व ईश्वरप्राणिधानाचा त्यांचा मार्ग शास्त्रोक्त असून अवेदांतिक असला तरी अवैदिक नाहीं. चतुर्विध आश्रमापैकी संन्याशी लोकांचा आचारधर्म त्यावेळीं कलुषित झाला होता, धर्माधर्माची मर्यादा घालून देणारे लोक प्रतारकाच्या आहारीं गेले होते व निःश्रेयसाला देणारी कर्मभूमि भोगभूमि बनली होती. अशावेळीं सनातन नारायणीय मोक्ष

मार्गाचें पुनरुज्जीवन करण्याचें महत्कार्य चक्रधर व त्यांचे अनुयायी यांनीं केले व तो धर्म सर्वांस कळावा म्हणून त्यांनी जानपदभाषा हाताशीं धरून जी अनेक देशी लेणीं निर्माण केली त्यांचें वाचन व अध्ययन करणें भाषेच्या—वाङ्मयाच्या आणि संस्कृतीच्या दृष्टीनें आवश्यक व म्हणूनच संशोधनार्ह असेंच केवळ न समजतां ते महनीय श्रेय प्राप्त करून देणारें आहे.

# श्रीहरिनाथ यांची अद्यावत् परंपरा

( लेखक :—श्री. यशवंत खुशाल देशपांडे )

मराठी भाषेंतील आद्य कवि आणि ग्रंथकार म्हणून लौकिकांत प्रसिद्ध असलेले मुकुंदराज यांच्या संबंधानें त्यांच्या ग्रंथांत कांहीं माहिती मिळत नाही. त्यांच्या ग्रंथकर्तृत्वासंबंधाच्या शककालाची ओवी सर्वच प्रतींतून मिळत नाहीं आपला शिष्य जयंतपाळ याच्या करितां विवेकसिंधू ग्रंथ लिहिला अशी माहिती त्या ग्रंथांतच मिळते. शिवाय 'वेणु गंगेच्या तीरीं अंबा नगरीं' येथें ग्रंथ केला, असाही त्यांत उल्लेख आहे. शिवाय मुकुंदराजाचे गुरु रामचंद्र आणि आज-गुरु हरिनाथ त्यांच्या संबंधानें बरीच विस्तृत माहिती उत्तरार्धाच्या शेवटच्या प्रकरणांत मिळते. प्रत्यक्ष आदिनाथ शिव याच्या पासून हरिनाथांना स्फूर्ति होऊन त्यांनी हा वेदान्त मार्ग प्रसृत केला,' असे त्या ग्रंथांत आहे. वेणु गंगेच्या तीरावरील प्रसिद्ध अंबानगरी म्हणजे नागपूर जिल्ह्यांतील अंभोरे होय ही गोष्ट आतां विद्वानांस संमत झाली आहे. अंभोऱ्याजवळ कन्हान वैनगंगा आणि अंबानदी यांचा त्रिवेणी-संगम झाला आहे. या संगमाजवळच टेकडीवर श्रीचैतन्येश्वर महा-देवाचें प्राचीन हेमाडपंती मंदिर असून त्या खालींच हरिनाथांची समाधि आहे. अंभोरें या स्थळास चैतन्येश्वर मंदिरामुळें व हरिनाथाच्या समाधीमुळें क्षेत्राचें महत्त्व आलें असून आज तेथें दशाहार, दत्तजयंती, कार्तिक अमावास्या, शिवरात्रा इत्यादि उत्सव होतात. या मंदिराच्या आणि समाधीच्या व्यवस्थेकरितां एक पंच कमिटी निर्माण झाली असून, अंभोरा येथील मालगुजार व हायकोर्ट वकील श्री. विठ्ठल रामकृष्ण टोक नागपूर हे या कमिटीचे प्रमुख कार्यकर्ते

आहेत. या क्षेत्राचा इतिहास लिहिण्याची ते खटपट करीत आहेत आणि त्या कार्यातील एक भाग म्हणून मुकुंदराजांची शिष्यपरंपरा शोधण्याचा व ती हल्ली अस्तित्वांत आहे काय याची माहिती काढण्याचा ते प्रयत्न करीत आहेत.

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांत, सहा वर्षांपूर्वी महानुभाव वाङ्मयांत प्रचलित असलेली माहिती मी प्रसिद्ध केली होती त्यावरून शारदाश्रमांत मुकुंदराजासंबंधी आणखी कांहीं माहिती मिळते की काय एवढ्याकरितां श्री. ढोक हे मुद्दाम यवतमाळला आले होते. महानुभावांच्या एका पोथींत हरिनाथ चरित्र म्हणून छोटेंसे प्रकरण म. गोपीराज महंत रितपूर यांच्या कृपेनें मिळालें तें त्यांना दिलें. त्यावेळीं मुकुंदराजाच्या शिष्यपरंपरेसंबंधानें श्री. ढोक यांना जी माहिती उपलब्ध झाली ती त्यांनी आनदानें दिली व त्यांच्याच प्रोत्साहनानें मी नागपुरास दोन दिवस राहून त्यांच्याच सहकार्यानें वरीच नवीन माहिती मिळविली. महानुभावीय वाङ्मयांत मिळालेली माहिती येथें विचारांत घेतली नाहीं. अधिक ग्रंथ उपलब्ध होईपर्यंत त्याच्या संबंधानें चिकित्सा करण्याचें तूर्त तहकूब केलें आहे. पुढें दिलेली माहिती मुकुंदराजाच्या परंपरेतून मिळालेली आणि त्यांच्या परंपरेशीं संबद्ध अशा व्यक्तींकडून मिळालेली अशीच घेतली आहे आणि त्या माहितीचें श्रेय श्री. विठ्ठल रामकृष्ण ढोक यांनाच आहे हें मी आनंदानें नमूद करतों.

नागपूरला इंदोऱ्याच्या बाजूला गणायीचा वाडा म्हणून एक देवस्थान आहे. त्याची कांहीं इस्टेट असून त्या देवस्थान कमिटीचे नागपूरचे प्रसिद्ध श्री. काळीकर वकील हे प्रमुख आहेत. त्या कमिटींत श्री. ढोक वकील हे एक कार्यकर्ते आहेत. त्या देवस्थानांत सरासरी १०० हस्त लिखित ग्रंथ व्यवस्थित ठेविले आहेत. त्यांत ५।६ विवेकसिंधूच्या आणि २ परमामृताच्या हस्तलिखित प्रती आहेत त्यांतच विवेकभास्कर नांवाच्या एका मराठी श्लोकबद्ध अशा विस्तृत ग्रंथाच्या दोन हस्तलिखित प्रती आहेत. हा ग्रंथ वेदांतपर असून

त्याचे १० अध्याय आहेत. शेवटच्या अध्यायात ग्रंथकाराने आपली परंपरा व ग्रंथकर्तृत्वाचा शककाल दिला आहे. ग्रंथकाराचें नांव बकाजी रंगनाथ असून विक्रम संवत १८४७ चैत्रशुद्ध नवमी सौम्य वारी ग्रंथ पूर्ण झाल्याचें ग्रंथांत नमूद आहे. म्हणजे स्थूलमानानें याचा इ. स. १७९१ येतो. या ग्रथांत शिष्यपरंपरा आली ती ( १ ) श्री. आदिनाथ शंकर. २ श्रीहरि ३ रामचंद्र ४ मुकुंद ५ श्रीनृसिंह भारती ६ जगन्नाथ ७ सहज श्रीमुनि उर्फ सदानंद ८ रंगनाथ ९ केशव १० श्रीशंकर ११ वैद्यनाथ १२ श्रीभीम १३ नागेश ऊर्फ नागेंद्र १४ श्रीरंगात्मज बकाजी ह्मणजे विवेकभास्कर ग्रंथाचा कर्ता अशी त्या ग्रंथांत परंपरा आहे. या परंपरेंत केशव हा मोठा अधिकारी होऊन गेल्याचें दिसतें. कारण त्यापुढील परंपरेंत सर्वजण स्वतःस ' केशव सांप्रदायी ' ह्मणवितात. तसेंच वरील यादींत मागील नांव गुरूचें आणि पुढील शिष्याचें असें वर्णन आहे. परंतु केशवापुढील श्रीशंकर हें नांव शिष्याचें दिसत नसून केशव सांप्रदायांतील पुरुषाचें दिसतें. नागपूर येथील गोपाळ महाराजांच्या मठांत गुरुपरंपरा दिलेली आहे तींत ' सहज बोधापासून श्रीरंग उत्पन्न तत्शिष्य केशव जाण जो का विख्यात भूमंडळी, केशव सांप्रदायी श्रीशंकर ' असें स्पष्ट नमूद आहे.

विवेक सिंधुमध्यें शेवटच्या प्रकरणांत ' सुरेंद्रभारती मुख्य ' असे अनेक शिष्य हरिनाथानें ' प्रबोधिले ' परंतु हरिकृपा रामचंद्रासच असंख्य ' फळली ' असें लिहिलें आहे. त्याच प्रमाणें ' रामचंद्रानेंहि ' अनेक शिष्य प्रबोधिले ह्मणून वर्णन आहे. मुकुंदराजाचेही जयतपाळा शिवाय सांप्रदायप्रवर्तक असा वर निर्दिष्ट केलेला शिष्य नृसिंहभारती ह्मणून नमूद आहे.

गणोबा महाराज हे आश्वलायन शाखेचे असून मूळचे खोलापुराजवळील दानपुरचे राहणारे होते गोपाळ महाराज समाविस्त झाल्यावर गणोबा महाराज हे नागपुरास इंदोऱ्याचे बाजूस विठ्ठल मंदिर बांधून राहिले. त्याला हल्ली गणोबाची वाडी ह्मणतात. तेथें त्यांची समाधि आहे. तसेंच त्यांचे शिष्य नागोजी ह्मणून होते त्यांची ही

समाधी आहे. हल्ली वाडींत गणोबामहाराजांचे शिष्यपरंपरेंत कोणी अधिपति नाहीं. देवस्थान श्री. काळीकर यांचे नेतृत्वाखालीं पंचकमेटीच्या ताब्यांत आहे. वाडींतील हस्तलिखितांच्या बाडांत गणोबा राजाराम या नांवाचें हस्ताक्षर आहे; त्याचा शक १७३४ असा आहे. तो गणोबा महाराजांचे हयातीशीं जुळतो, यावरून तें त्यांचेंच हस्ताक्षर असलें पाहिजे.

गोपाळ महाराजांचे दुसरे शिष्य हरिमहाराज यांचा मठ व समाधि भंडारा जिल्ह्यांत सानगडी येथें असून त्यांची नामसमाधि व शिष्य अमृतराय यांची देहसमाधि व मठ भंडारा येथें आहे.

नागपूरास डोकेबुवांचा मठ आहे. त्यांच्या परंपरेंतील श्लोक असा 'आदावादिगुरुं हरिंच सततं श्रीरामचंद्रं मुनिं योगाधीश मुकुंदराज विबुधं श्रीमन्नृसिंहंच सच्चिन्मात्र जगत्पतिंच सहजं श्रीरंगमत्केशवं वंदे शंकर विश्वनाथ (वैद्यनाथ ?) मनिशं गोविंद लक्ष्मणं भजे'

यांतील गोविंद ह्मणजे चांदा येथे प्रसिद्ध गोविंद स्वामीची समाधि आहे ते व त्या पुढील परंपरा लक्ष्मणबुवा डोके–सच्चिदानंद स्वामी (यादवबुवा ह्मणजे प्रसिद्ध डोकेबुवा)–गोविंदस्वामी उर्फ जनार्दन डोके अशी आहे. यांच्या मठांतील संग्रह बराच मोठा असून अजून तपासावयाचा आहे. यादवबुवा हे लक्ष्मणबुवाचे पुतणे व जनार्दन हे यादवबुवाचे चुलते.

श्रीरंगात्मज बकाजी यांच्या नंतरच्या शिष्याची माहिती दुसऱ्या एका अप्रसिद्ध ग्रंथामध्यें अचानक मिळाली. नागपूर येथें सुमारे ५० वर्षांपूर्वी रामकृष्णबुवा करतालकर म्हणून एक प्रसिद्ध हरदास होऊन गेले. ते दोन्हीहि हातांनीं करताल वाजविण्यांत निष्णात होते. त्यांचा मुलगा मुरलीधर आणि नातु केशव हे नागपुरांत विद्यमान आहेत. रामकृष्णबुवा यांनीं १११ अध्यायांचा सच्चरितमालिका ह्मणून एक ओवीबद्ध ग्रंथ केला आहे. त्यांत सबध महाराष्ट्रांतील १०९ वर संतांचीं चरित्रें वर्णिलीं आहेत. या ग्रंथाचा

आणखी एक विशेष असा कीं, प्रत्येक अध्यायाच्या १११ च ओव्या आहेत. हा ग्रंथ शके १८०७ मध्यें पूर्ण झाल्याचें लिहिलें आहे. हे रामकृष्णबुवा मूळचे आंबोंड्याजवळील वंजरवाडी येथील राहणारे. यांचें मूळ उपनांव वासकर असे आहे. यांनीं अनेक सत्पुरुषांचीं चरित्रें वर्णिलीं आहेत. त्यांत श्रीरंगात्मज बकाजीचे शिष्य गोपाळ महाजन, गोपाळ महराजांचे शिष्य गणोबा महाराज, त्यांचे शिष्य बापूजी महाराज तसेच गोपाळ महाराजाचे दुसरे शिष्य सानगडी ( भंडारा जिल्हा ) येथील हरिमहाराज व भंडाऱ्याचे अमृतराव यांचीं चरित्रें आलीं आहेत. गणोबा महाराजाचे अनेक शिष्य होते. त्यांपैकीं बापूजी महाराजांचे पाच बंधु रामजी, जैराम, व्यंकटेश, सदुभाऊ आणि गोपाळजी हे होत. शिवाय भाऊजी बनवारी आणि जैरामबुवा ढोक हे प्रमुख शिष्य होत.

बापुजी महाराज आणि त्याचे बंधु गोपाळजी शास्त्री हे नागपुरात प्रसिद्ध हरदास होऊन गेले. त्यांच्या घराण्यांत त्याचे पुतणे ह्मणजे रामजी यांचे पुत्र श्रीनिवासशास्त्री हरदास हे विद्यमान असून नागपुरांत प्रतिष्ठित आणि सुप्रसिद्ध विद्वान म्हणून गणले जातात. भाऊजी बनवारी याचा नातु विद्यमान असून जैरामबाबा ढोक यांचे नातु विठ्ठल रामकृष्ण ढोक हे नागपुरास हायकोर्ट वकील असून मुकुंदराजाचे अभिमानी आणि आस्थेवाईक संशोधक आहेत.

गोपाळजी महाराज हे माध्यंदिनीय शाखेचे असून मूळचे उमरावती जिल्ह्यांतील खोलापूरचे राहणारे होते. त्यांनी बकाजीचा अनुग्रह घेतला. गुरुंनी त्यांना पादुका व विवेकभास्कर ग्रंथाची प्रत दिली. त्यांचा मठ नागपुरांत बुधवारींत जागेश्वराच्या मंदिराजवळ आहे. मठांत गुरुनें दिलेल्या पादुका असून गोपाळ महाराजांची समाधि आहे. यांचें उपनांव ठमके असल्यामुळें त्या मठास ठमकेबुवाचा मठ ह्मणतात. हल्ली तो मठ महाराजाचे बंधु हरिभाऊ ह्मणून होते त्यांची मुलगी राधिका ऊर्फ मैना इचा मुलगा विठ्ठल गोविंदराव चिमोटे यांच्या ताब्यांत आहे. मठांत सांप्रदायिक कवितांचें बाड

आणि मुकुंदराजांच्या विवेकसिंधूची संस्कृत गद्याची एक हस्तलिखित प्रत होती. ते ग्रंथ हल्ली श्री. डोक यांच्याजवळ आहेत.

जनार्दन बुवाचे नातु यादवराव व बाबूराव हे हल्ली विद्यमान आहेत. लक्ष्मणबोवाना दुसऱ्या रघूजींनें कुंभारी गांव मोकासा दिला होता तो हल्लीं त्यांच्याच वंशजाकडे चालत आहे.

वर्धा जिल्ह्यांत सिंदी स्टेशन नजीक हमदापूर ह्मणून गांव आहे तेथें एक मठ आहे. तो हल्लीं गोविंदगुरु श्री. हरि पाठक यांच्या ताब्यात आहे. या मठांत माधवनाथ महाराजांची देहसमाधि आणि आत्माराम महाराजांची नामसमाधि आहे. हे स्वतःस मुकुंदराजांच्या परंपरेंतलि म्हणवितात. या मठांतील परंपरेच्या श्लोकांत आदिनाथापासून श्री केशवापर्यंत १२ विभ्या सांगून नंतर

एवं द्वादशरूप एकवटूनी श्रीमाधवी ( माधवनाथ ) संचिलें।
निर्विकार निराभिमान असतां तें रूप साकारिलें ॥
सद्भक्ता सुजना सुरक्षुनि जगीं
सन्मार्ग जो लाविती।
धर्मस्थापक विश्वव्यापक प्रभू
मायामयो क्रीडतो ॥

याचप्रमाणें या मठात परंपरेची आरती आहे तिचा प्रारंभ "वेण्यातरवा पूर्व प्रसिद्ध त्रिवेणी। तेथें हरीनें केला प्रसन्न शूळपाणी॥ असा आहे. आदिनाथापासुनि हरिनाथ झाला।

रामचंद्र नामें मुकुंद बोधियला।
विवेकसिंधु करुनी जन सुखी केला।
भवनिधितारक नृसिंह बोधियला।
तत्पदीं जगन्नाथें धरिला विश्राम।
सहजबोधें रंगे बोधुनिया सहज।
केशवपदिं शंकर होऊनि समरस।
विठ्ठलचरणीं माधव दृढ धरि कास।

ध्येयध्यानाध्यानवदे त्रिपुटी ग्रासुनी ।
ज्योतिस्वरूप आत्मा राघवत् चरणी ।
कामक्रोधादिक षड्रिपु जिंकुनि ।
भक्ति विरक्तिशांति सहजी धरिली ।
गुरुपादिरत होऊनि । उन्मनि स्थानी तव
क्षणमात्र गेले श्रीहरि तरुनि ॥

निरनिराळ्या मठांतील सांप्रदायिक उतारे देण्याचा उद्देश एवढाच की, आदिनाथापासून ही हरिनाथाच्या आणि मुकुंदराजाच्या सांप्रदायाची परंपरा मानणारे मठ अंभोऱ्याच्या आसपास आणि महाराष्ट्राच्या या भागांत अद्यापि विद्यमान आहेत या पहिल्या १२ पिढ्यांपैकीं मधूनच कुठें शाखा फुटल्या आहेत. अशा तऱ्हेने विखुरलेले मठ बरेच असण्याचा संभव आहे. त्यांचा शोध करणें सुरू आहे. पुमद येथें गणोबा महाराजांची नाम-समाधि व मठ यांचा नुकतांच शोध लागला आहे.

या सांप्रदायांत विवेकसिंधु आणि हा उपलब्ध झालेला विवेकभास्कर हे दोनच ग्रंथ प्रमुख दिसतात. याशिवाय अद्याप दुसरे ग्रंथ आढळून आले नाहींत. या परंपरेपैकीं नागेश उर्फ नागेंद्र यांची बरीच स्फुट कविता, अभंग, अष्टकें, समश्लोकी गीतेचा भाग, रामायणांतर्गत भिल्लिणीचें आख्यान उपलब्ध आहे. कांहीं अभंगाचे शेवटीं ' नागो केशव सांप्रदायी ' असें म्हटलें आहे बापूजी महाराज आणि गोपाळजी हरदास यांचीहि स्फुट कविता व कीर्तनोपयोगी आख्यानें आहेत.

याप्रमाणें मुकुंदराजाची आदिनाथापासून विद्यमान काळपर्यंत परंपरा आहे. केशवाचा श्रीशंकर शिष्य नसल्यास मध्यें किती पिढ्या गेल्या याचा अंदाज नसल्यामुळें या उपलब्ध परंपरेवरून मुकुंदराजाचा काळ अंदाजानें सुद्धां करतां येणार नाहीं. केशवाचा श्रीशंकर हा प्रत्यक्ष शिष्य मानल्यास मुकुंदराजापासून बकाजी रंगनाथपर्यंत दहा पुरुष येतात. बकाजीचा काळ विवेकभास्कर ग्रंथांत शके १७१२

म्हणजे इ. स. १७९० दिला आहे. वंशाच्या पिढ्याची कालमर्यादा जशी सरासरीनें मानतां येते तसा शिष्यपरंपरेच्या पिढीचा काळ सरासरी धरतां येणार नाहीं. मुकुंदराजाचा काळ ज्ञानेश्वराच्या पूर्वीचा मानण्यांत येऊन त्यांना आद्य मराठी कवीचा मान देण्यांत येतो तेव्हां वर उपलब्ध झालेली शिष्यपरंपरा अव्याहत आहे असें जरी मानलें तरी त्यावरून मुकुंदराजाची काल निश्चिति करणें धोक्याचें होईल. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारावर आणखी शोध केल्यास निश्चयात्मक पुरावा हातीं येऊन कालनिश्चित करण्यास साधन उत्पन्न होईल अशी अपेक्षा आहे. याच हेतूनें वर जो थोडा बहुत शिष्यपरंपरेसंबंधानें शोध लागला त्याची माहिती संशोधक मंडळापुढें सादर केली आहे. वऱ्हाड मध्यप्रांतांतील आणि त्यांतल्यात्यांत खास नागपूर येथें राहणारे नातेवाईक संशोधक या दिशेनें प्रयत्न करतील अशी उमेद आहे.

# प्राचीन महाराष्ट्राच्या चतुःसीमा

( ले०— श्री. ह. ना. नेने, एम्. ए. एल्. टी. )

१ या आपल्या देशाला ' महाराष्ट्र ' हें अभिधान कां मिळालें याविषयीं विचार करूं लागलें म्हणजे पुढील उपपत्ति विशेषेंकरून नजरेस येतात. महारांचें राष्ट्र म्हणून महाराष्ट्र, हा डा. विल्सन याची कल्पना असमर्थनीय म्हणून त्याज्य मानली गेली आहे. 'राष्ट्रिक—महाराष्ट्रिक ' यावरून डॉ. भांडारकर यांनी सुचविलेली जनपदवाचक उपपत्ति, आणि महापराक्रमी असा जो ' राष्ट्रिक ' गणसंघ त्याने आपली आक्रमणशील राजसत्ता पसरवून देशाला प्रस्तुत नांव प्राप्त करून दिलें ही रा. राजवाडे यांची उपपत्ति, या दोन्ही हि निर्णायक स्वरूपाच्या नसल्या तरी तुल्यबळ असल्याने विचारार्ह आहेत. प्रो. काणे यांनी १९१९ मधील विविधज्ञानविस्तारांत लेख लिहून सुचविलेली देशविस्तारवाचक उपपत्ती त्यानंतरची असून ती देखील मननीय आहे.

२ वरील सर्व उपपत्तींच्या दृष्टीने इ. स. ६३४ मधील ' सत्याश्रय पुलकेशी ' संबंधाचा ऐहोळीचा शिलालेख अत्यंत महत्वाचा आहे. त्यामध्यें महाराष्ट्रदेश तीन राष्ट्रकांचा एकवटलेला देश आहे असें दर्शवून, त्यांत ९००० गांवें आहेत, असे वर्णन तेथें केलें आहे.

" अगमदधिपतित्वं यो महाराष्ट्रकाणां
नव नवतिसहस्त्रग्रामभाजां त्रयाणाम् ॥ "

३ तीन निरनिराळे स्वयंपूर्ण प्रदेश एकत्रित होऊन ते एका साम्राज्यसत्तेखाली आल्यानें महाराष्ट्र हा देश बनला अथवा एकभाषावाची अखंड भाग, कांही कारणाने त्रिभागित होऊन पुलकेशीच्या वेळीं तो पुनः एकत्र झाला व या अखंड देशास विस्तारवाचक असें नांव प्राप्त झालें,—इत्यादि प्रकारचे संदेह वरील शिलालेखावरून स्पष्ट होत नाहीत. त्याचें निरसन करण्यास, एखादा नवा ऐतिहासिक व परंपरेचा पुरावा सांपडल्यास तर्काचें पाऊल पुढे पडेल यांत संशय नाही.

४ महानुभावीय वाङ्मयांत यादवकालापासून प्राचीन परंपरेचे ग्रंथ उपलब्ध आहेत. महाराष्ट्रदेश व मराठी भाषा यांविषयीं महानुभावीयांना उत्कट अभिमान असल्यानें त्यासंबंधीं अनेक ठिकाणीं निरनिराळ्या महानुभावीय पोथ्यांत उल्लेख आढळून येतात. त्यांवरून वरील सुचविलेल्या उपपत्तींच्या सत्यतेबद्दल कांहीं पुरावा सांपडल्यास बरें होईल. असें वाटून महानुभावीय पोथ्या वाचतांना जे उल्लेख आढळले ते आपणापुढे सादर करीत आहे. इ. स. १९३२ सालीं प्रसिद्ध केलेल्या 'चक्रधरसिद्धांत सूत्रें' या पुस्तकाच्या उपोद्घातांत त्यापैकी २ उतारे, सांकेतिक लिपींतून उकलून, प्रथमतःच प्रसिद्ध केले होते.

५ 'खडकुळी' येथें, भटोबास [ नागदेवाचार्य ] असतांना ते जेव्हां महानुभावाचे आद्यप्रणेते सर्वज्ञ चक्रधर याना अनुसरले तेव्हां 'कसें वागावें' याविषयीं निरूपण चक्रधरांनीं केलें. 'पाठसमुदाय' नामक पोथींत 'आचारपाठ' नांवाच्या प्रकरणांत तो भाग आलेला आहे.

उपदेश केलेल्या तत्वांप्रमाणें वागण्यास योग्य देश कोणता याविषयीं निरूपणाचा ओघ चालू असतां 'महाराष्ट्रीं असावें' हें २४ वें सूत्र चक्रधरांनी उच्चारलें आहे. इ. स. १२६८ चे सुमारास चक्रधरांनी सन्यास पत्करून व कांहीं वर्षे आपल्या तत्वांचा लोकांस उपदेश करून, मग ते इ. स. १२७२ मध्यें बदरिकाश्रमाकडे गेले, असा महानुभावांच्या पोथींत परंपरेचा आधार सांपडतो. त्यावरून पहिला उल्लेख यादवकालांतील आहे, असें समजण्यास हरकत नाहीं. कारण चक्रधराच्या प्रयाणानंतर थोड्याच दिवसांत भटोबास यांच्या नजरेखालीं चक्रधराच्या सूत्राचें संकलन झालें. तीं सूत्रें घोकावीलीं जात असत असे उल्लेख पोथींतून आढळतात.

महाराष्ट्र देश म्हणजे कोणता याविषयीं स्पष्टीकरण करण्याचें प्रयोजन चक्रधराना त्यावेळीं वाटलें नाहीं असें दिसतें; तथापि या सूत्रांवर भाष्य-महाभाष्य-पट-इत्यादि जी वाङ्मयाची उभारणी झाली, त्यांत महाराष्ट्रदेशाच्या विस्तारासंबंधीं उल्लेख येऊं लागले.

**कै. म. म. द. वा. पोतदार,**

६ देश ह्मणजे काय, महाराष्ट्र देश कोणता, त्याच्या शेजारचे भाग कोणते, त्यांत भाषा कोणत्या होत्या, इतर देशांपेक्षा महाराष्ट्र 'महंतराष्ट्र' कां, महाराष्ट्राच्या अंगीं नैसर्गिक गुण कोणते, इत्यादिकांबद्दल थोडीशी चर्चा विवेचनाच्या ओघांत भाष्यकारानीं व महाभाष्यकारांनीं केलेली आहे.

७ प्रथमतः गुर्जर शिवव्यास ( इ. स. १४०३ यांच्या ' स्थळ-पोथीकडे ' ( भाष्याकडे ) वळूं.

(अ) " महाराष्ट्रीं असावें ॥२४॥ ( आचारपाठ सूत्रें ): महाराष्ट्रीं असतांची योग्यताः काजेः महंतराष्ट्र भणौनि महाराष्ट्रः राष्ट्र भणीजेदेशः परः सुखरूप आणि इष्टकारकः आणिक देश दुःखरूप आणि अनिष्टकारकः महंत भणीजे थोरः......महाराष्ट्र सात्विक...... तेथचा वाराः झडः पाऊसः तेंही सात्विक......महंत भणीजे निर्दोष आणि सगुणः...... तेथ असताः अनाचार करावयाची बुद्धि नुपजे.........आपण अनाचार न करीः आणिकासी करूं नेदी ! " ( चक्रधरसिद्धांत सूत्रें ' यामध्यें वरील उतारा आला असल्यानें तो येथें पूर्ण दिला नाहीं ) या उताऱ्यावरून महाराष्ट्राची अंतर्गत थोरवी समजून येईल.

(आ) गडीशिडी असावें ॥ ३५ ॥ ( आचारपाठ ): भटाचे बोलणें (नाददेवाचार्य भट): सेवट भणी श्रीनर (नाशिक जिल्हा) जुन्नर (पुणेप्रांत) कल्याण (ठाणे जिल्हा ?) खांदार (कान्हेरी बेटें, मुंबई? निझामशाही? तीन भाग मऱ्हाठः तो शेवटः सरीसे [समीपचें] ते गडीः तेथ वोळखते [ ओळखीचे ] भेटतीः " गडीः कानडः तेलंगः [निजामशाही वायव्य भाग]: हाच आशय कविडिंभ कृष्णमुनि याच्या ' ऋद्धपुरमहात्म ' या काव्यग्रंथांत आलेला आहे. " विध्यान्द्री पासौनि दक्षिण दिशेसी । कृष्णानदी पासौनी उत्तरेसीः झाडी मंडळा-पासौनि पाश्चिमेसी । महाराष्ट्र बोलीजे ॥ "

८ इ. सनाच्या सतराव्या शतकाच्या शेवटच्या चरणांत लिहिलेल्या ' आचारपद्धति ' नामक महाभाष्यांत पुढील उल्लेख आहे.

ळतो. आचारपाठांतील पहिल्या सूत्रावरील विवेचन चालू असतां पुढील भाग आलेला आहे.

" देश भणीजे खडमंडळ जैसे फलेठाणा पासौनि [ फलटण सातारा ] दक्षिणेसि: मऱ्हाठी भाषः जेतुला ठाइ वर्तेः तेतुलें एक मंडळः तयासि उत्तरे बालेघाटच्या सेवट ( बुलढाणा जिल्हा, मोंगलाईचा पायथा ) ऐसें एक खंडमंडळ मग उभे गंगातीर तेही एक खंडमंडळ ( गोदावरी कांठ ): आणि तयापासौनी मेघंकरघाट [ मेहकर अकोला जिल्हा ]: तें एक खंडमंडळः तयापासौनी [ त्यानंतर ] आवघें वराड तें एक खंडमंडळः परिः आवघीं मिळोनी महाराष्ट्रचि बोलाजेः किंचित किंचित भाषेचा पालटः भणौनिः खंडमंडळें भणावीं:...ऐसे मार्गरूढी तव सेवटः!: [ हा उतारा ' चक्रधर सिद्धांत सूत्रें यांत दिलेला आहे. ] "

या सतराव्या शतकांतील उताऱ्यासंबंधीं रा० कुळकर्णी यांनी ' मराठी भाषा, उद्गम व विकास ' या ग्रंथांत ' यादवकालीन भाषेचा नमुना म्हणून सांगण्यांत कशी अक्षम्य चूक केली आहे; तसेच रा० पांगारकर यांनी आपल्या ' ज्ञानेश्वरकालीन वाङ्‌मयाच्या इतिहासांत महाभाष्यकाराला भाष्यकार बनवून उतारा प्राचीन म्हणून कसें चुकीनें प्रतिपादिलें आहे, हे जिज्ञासू वाचकांना वरील विवेचना वरून स्पष्टपणें कळून येईल.

९ वर उताऱ्यांतील ' खंडमंडळ ' हा शब्द व ' हे आवघे मिळोनि महाराष्ट्र ' हा उल्लेख महत्वाचा आहे. त्यांच्यांत दिलेले इतर उल्लेखही तितकेच विचारार्ह आहेत. हा शब्द इतिहासांत परिचयाचा असून हेमाद्रीच्या पहिल्या प्रशस्तींत ' झाडी मंडळाचा स्पष्ट उल्लेख असून देवगिरि ' (दौलताबाद ) ही दंडकामंडळाची ' शोभा वर्णिलेली आहे.

पुढील उताऱ्यावरून ' मंडळिक ' म्हणजे खंडमंडळीचे रक्षक ( सुभेदार ) ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

" स्त्री भणीजे मत्तद्रव्याचा रावो । रावो भणीजे मुख्य धनीः तरि धनी तोची कैसाः नाः राय.चीए आज्ञे आतुः **पाइक** भणीजे उचितार्थी किया वोडवीः **परिवार** तो अंतर उभे राहोनि सेवा करीतिः **राणे** तसीराणे याचेनि न्यायेंः जीवितमान्य पुरुषः **रजपुत** भणीजे एकाकी भांडते झगडतेः **नाएक** भणीजे दाहावीसाचे नाएकः वडील **मंडळीक** भणीजे **खंडमंडळीचे रक्षक** ( सुभ्याचे अंमलदार सुभेदार, ⋯⋯ इत्यादि

११ " महाराष्ट्री असावें " या सूत्रांवरील भाष्य व महाभाष्य यांत प्राचीनकाळीं रूढ असलेल्या परंपरेचें ज्ञान पूर्णपणें दिसून येतें. यासंबंधींचा उतारा ' चक्रधर सिद्धांत सूत्रें ' यांत आलेला आहे.

१२ ' देशाचा सेवट ' याचें माहाभाष्यांतील पुढील वर्णन तीच गोष्ट सिद्ध करतें.

" देशाचा सेवट " जुन्नरः मीन्नरः कल्याणः कांदारः एणें उपलक्षणें महाराष्ट्राचा सेवट सांगितलेंः...तीन भाग मऱ्हाठे लोकः आणि एक भाग कानडः तेलंगः...ते महाराष्ट्राचे शेवट......" इत्यादि.

" आतां गडेसि रूप करितातिः गडेः कानडः तेलंगः..." इत्यादि.

१३ सारांश महाराष्ट्रदेश या शब्दांत केवळ सध्याची संकुचित कल्पना नसून त्याचा पसारा मध्यप्रांत वऱ्हाड यावरही कसा होता त्यांत निरनिराळीं खंडमंडळें[१] समाविष्ट होऊन त्यांचें एक मोठें मंडळ कसें बनलें होतें, " किंचित भाषेचा पालट " पण भाषा सर्व देशभर मराठी कशी होती, इत्यादि गोष्टींचा उलगडा वरील उताऱ्यावरून होतो एवढेंच मला सांगावयाचें आहे.

१ खंडमंडळ

# परिशिष्ट ( अ )

# मध्यप्रांत संशोधन मंडळ

## (मागील १५ वर्षांचा व १९४८ च्या कार्याचा अहवाल)

### १. प्रास्ताविक

मध्यप्रांत संशोधन मंडळाचें गत १५ वर्षांचें सिंहावलोकन व १९४८ सालचें वृत्त आपणांस सादर करताना कार्यकारी मंडळास आनंद होत आहे. हा आनंद अर्थात् मागील अहवालांत म्हटल्याप्रमाणे निर्मळ नाहीं. कार्याची प्रगती जशी व्हावयास पाहिजे तशी ती झाली नाही. याची जाणीव चालक मंडळला आहे. तथापि जेवढें आम्हास करता आलें त्याचें निवेदन केलें पाहिजे.

### २. छापील वृत्ताच्या अभावाचीं कारणें

१९४४सालीं संस्थेने आपल्या कार्याचा दशवार्षिक अहवाल सादर केला होता. त्यानंतर आणखी ५ वर्षे लोटलीं आहेत. पैशाच्या अभावी संस्थेला आपलीं प्रतिवृत्तें जरी वेळोवेळीं छापून प्रसिद्ध करिता आलीं नाहींत, तरी दरवर्षी संस्थेच्या कार्याचा आढावा नियमाने घेण्यांत येत असून तो वार्षिक समारंभाचे वेळीं उपस्थित राहणाऱ्या जनतेपुढे मांडण्यात येतो. तथापि या सीमित प्रसिद्धीमुळे सामान्य लोकांस संस्थेच्या कार्याचे व्हावें तसें यथार्थ ज्ञान होत नाही. तरी यादि गोष्टीला एक अपवाद आहे, कारण, १९३७ सालीं संस्थेचें मुद्रित प्रतिवृत्त प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

### ३. मंडळाची स्थापना

हें मंडळ 'तरुण भारताचें' विद्वान् संपादक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या पुढारीपणाने व अखिल महाराष्ट्रांतील प्रसिद्ध व मुरब्बी संशोधक म.म. दत्तो वामन पोतदार यांच्या प्रेरणेने वाङ्मय तिहासिक संशोधन मंडळ या नांवाने २-१-१९३४ रोजी अस्तित्वांत आलें. नतर ३ वर्षांनी त्याला हल्लींचें नांव प्राप्त झाले. संस्थेच्या आद्य

प्रवर्तकांपैकी कै. नीळकंठराव भवाळकर (एक माजी उपाध्य) कै. दा के. ओक, प्रा गो. कृ. गर्दे व कै. गो. अ. ओगले हे सद्गृहस्थ सोडले तर बहुतेक हयात आहेत व त्यांचपैकी बरेचजण आजहि सभासद आहेत. कांहीं अपवादभूत परंतु महत्वाचे प्रवर्तक जर पुन्हा आपला लुप्तप्राय झालेला उत्साह पुनरुज्जीवित करतील तर संस्थेचें कार्य चालले आहे त्यापेक्षां द्रुत गतीनं चालेल असें वाटतें.

### ४. १५ वर्षांत वाचलेल्या निबंधांची संख्या, विषय व लेखक

आतापावेतो वाचल्या गेलेल्या निबंधांचा आढावा घेता असें दिसून येतें की, १९४८ अखेर मागील १५ वर्षांत एकूण १५० संशोधनात्मक निबंध वाचण्यात आले. त्याचप्रमाणे ऐतिहासिक व साहित्यिक महत्वाच्या विषयावरील व्याख्यानें व समारंभ मिळून १५–२० सभा सहज झाल्या आहेत. संशोधनात्मक निबंधांची वर्गवारी करणे झाल्यास आपल्यास खालीलप्रमाणे कोष्टक मांडता येईल.

| ताम्रपट वाचन | नाणी | जुने कागदपत्र व ग्रंथ | | भूगोल व अर्थ शास्त्र | शारीरिक | सांस्कृतिक सामाजिक व तात्त्विक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ऐतिहासिक | वाङ्मयात्मक | | | | |
| १२ | ६ | ४० | ७२ | ४ | २ | १४ | १५० |

या निबंधांपैकी ताम्रपट व नाण्यांचें वाचन बहुतेक म. म. मि. नानासाहेब मिराशी, एम. ए. यांनी केलें आहे. वाङ्मयात्मक निबंधांत बरेच निबंध श्री. ह. ना. नेने एम. ए. एलटी. यांचें असून, त्यांजपैकी बहुतेक महानुभावीय वाङ्मयावर आहेत. वाङ्मयात्मक निबंध लेखकांत. कै. दा. के ओक म. म. कृष्णशास्त्री घुले यांचा समावेश होतो. तसेच या क्षेत्रांत डॉ. द. वा. कटाळे एलएल. डी. डॉ. वि. भि. कोलते एम ए. पीएच्. डी, डॉ. शं. दा. पेंडसे एम. ए. पीएच्. डी., प्रा. बनहट्टी एम. ए., महानुभाव बाळकृष्णशास्त्री, प्रा. दि. का. गर्दे, एम. ए., प्रा. स. प्र. चतुर्वेदी, एम ए. डॉ.

मा. गो. देशमुख, एम. ए पी एच्. डी. यांनीहि प्रामुख्याने भाग घेतला आहे. ऐतिहासिक निबंधांत डॉ. य. खु. देशपांडे, प्रा. मिराशी श्री. वा. ना. देशपांडे, श्री. गो. चि. तांबे, प्रा. बनहट्टी, श्री. शं. गो. चट्टे, श्री आनंदराव जोशी व अलीकडे श्री. दे. गो. लांडगे, यांचा उल्लेख करावयास हवा. सांस्कृतिक व तत्वज्ञानात्मक निबंधांत श्री. यादवराव अगे व डॉ. के. ल. दप्तरी यांचा निर्देश केला पाहिजे.

## वृत्ताचे सालांतील निबंध वाचन ५.

वृत्ताचे वर्षी अत्यंत दुःखदायक घटना जर कोणती असेल तर ती ता. ३०-१-१९४८ ला. जगद्वंद्य पुरुष महात्मा गांधी यांची आकस्मिक व हृदयद्रावक रीतीने झालेली हत्या ही होय. ह्या घटनेनंतर गतवर्षीचा वार्षिकोत्सव दोन दिवसांनी झाला. त्या उत्सवांतील प्रमुख कार्य ह्मणजे पूज्य महात्मा गांधी यांचे संबंधी दुखवट्याचा ठराव स्वीकृत करणें हें होतें व तें करण्यात आलें. उत्सवाचे नियोजित अध्यक्ष केसरीचे माजी संपादक श्री. ज. स. उर्फ तात्यासाहेब करंदीकर हे होते व त्यांनी केलेले किंवा ठरविलेले ह्मणा पाहिजे तर, भाषण सह्याद्रींत छापून आलेलें आहे. एकंदर कार्यक्रम कमावमा पार पडला, कोणाचेंच लक्ष कार्यक्रमांत लागणें शक्य नव्हतें. दुपारी निबंधाचे केवळ सारांश सांगण्यांत येऊन ते समग्र वाचण्यात आले असें गृहीत धरण्यांत आलं. निबंधाची विल्हेवारी येणेप्रमाणे:—

| विषय | लेखक |
|---|---|
| १) श्री. व्यासांची श्री. शंकराचार्यांवर फिर्याद | डॉ. के. ल. दप्तरी |
| २) आंध्रदेशातील एक ब्राह्मण राजवंश | म. म. प्रि. वा. वि. मिराशी |
| ३) अ ) लीळाचारित्रावरून महानुभावीय मठाचे अतंरग दर्शन<br>ब ) पोर्तुगीज वाङ्मयात समर्थ रामदासांचा उल्लेख | प्रा. दि. का गर्दे |
| ४) भास्करराव कोल्हटकर | श्री. दे. गो. लांडगे. |

यानंतर महात्मा गांधीजींच्या खुनामुळें सबंध देशांत व या शहरांत जी परिस्थिति निर्माण झाली तिजमुळें शांततेच्या वातावरणांत पार पडण्यासारखा असा कोणताच कार्यक्रम घडून येणें अशक्य झालें व त्यामुळें कित्येक महिने निबंध वाचनाला अनुकूल संधि प्राप्त झाली नाहीं. तथापि वर्षाच्या उत्तरार्धापासून थोडें स्थिरस्थावर झालें व पुढील निबंधांचें वाचन झालें.

| तारीख | विषय | लेखक | अध्यक्ष |
|---|---|---|---|
| ८-८-४८ | देवनगरींतील मुळाक्षरें | श्री शं. वा. रानडे बी. ए. | प्रि. श्री. ल. पांढरीपांडे |
| | परमात्मस्वरूपचर्चा सप्रयोग व सोपकरण | श्री. स. ना. कुळकर्णी बी. ए. एल टी. | डॉ. के. ल. दप्तरी |
| ५-१२-४८ | दशावतार व उत्क्रांतिवाद | ,, | ,, |
| | भोसलेशाहींतील कर्तृत्ववान पुरुष—विठ्ठलबल्लाळ सुभेदार व गणपत विठ्ठल सुभेदार | दे. गो. लांडगे बी. ए. एल्एल्. बी. | श्री. ल. रा. कुळकर्णी एम. ए. एल्टी. |

## रा. लांडगे यांचा प्रयत्न

६. वरील कार्याखेरीज संस्थेचे सहकार्यवाह श्री. दे. गो. लांडगे यांनी वृत्तान्त साली संशोधन दृष्टीने पुढील काम केलें. सेक्रेटरीएटमध्यें जाऊन कित्येक दिव ऐतिहासिक पत्रव्यवहाराचें वाचन केलें व टिपणें घेतली तसेंच पौनी व भिवापूर येथें जाऊन तेथे ४-५ दिवस मुक्काम करून पूर्वी केलेल्या कार्याची पूर्ति केली. तेथे त्यांनी दशपुत्र कुटुंबांतील पोथ्या व कागदपत्रें पाहिलीं. तीं व्यवस्थित लाविलीं. कांहीं हस्तगत केलीं. स्थानिक जुन्या कुटुंबाकडे भेटी-गोष्टीहि केल्या. भिवापूरलाहि तसेंच थोडेंसें काम केलें. मंगरुळकर ग्रंथ संग्रह तपासून त्यांतील अप्रकाशित ग्रंथास नागपूर विश्वविद्यालयांतील हस्तलिखित संग्रहालयांत प्रवेश मिळवून दिला. त्यांनी नुकतेच कोर्टांतील भोसले कागदपत्र तपासण्याचें कार्य सुरू केलें

आहे नागपूरच्या इतिहासाकडे जनतेचें चित्त आकर्षित करण्याच्या दृष्टीने त्यांनी रेडिओवरहि भाषण करुन व लेख वगैरे लिहून जागृति केली. त्याचप्रमाणे चिटणवीस दप्तरहि थोडेसें पाहिलें आहे.

## ७ संस्थेचें प्रकाशन

( अ ) यंदांचें वर्षी संस्थेने नागपूरकर भोसल्यांच्या बखरीच्या १०० प्रति बांधून घेतल्याने अनुपलब्ध प्रति उपलब्ध झाल्या आहेत. जनतेने व इतिहासज्ञांनी आपल्या प्रांताचा इतिहास ह्मणून त्यांचें स्वागत केलें पाहिजे. निदान नागपुरांतील प्रत्येक सुशिक्षित गृहस्थाने त्याची एकेक प्रत संग्रहीं ठेविली पाहिजे. जुने कर्तृत्ववान पुरुष तर काळाच्या पोटांत गडप झालेच. त्यांच्या वंशजाचेहि जे अवशेष होते त्यांच्यावरहि नव्या मन्वंतर सांपत्तिक परिवर्तनाचें संकट आलें आहे. त्यामुळे ते निर्मूळ होण्याच्या पंथास लागले आहेत. तत्पूर्वी निदान लिखित इतिहास तरी वाचून सुस्कारे टाकण्याचें सुख त्यांनी अनुभवावें अशी त्यांस नम्र विनंति आहे.

(ब) मागील १५ वर्षांत संस्थेला वृत्तपत्रद्वारे वाचलेल्या निबंधांचा सारांश देण्यात थोडेफार यश लाभलें. परंतु एवढ्यांत समाधान मानणें शक्य नाही ह्मणून संस्थेने मागील काही निबंधांची एक पुस्तिका काढली आहे, ती अल्पोपक्रम ह्मणून स्वागतार्ह ठरेल अशी आशा आहे. तथापि ह्या बाबतींत त्रैमासिक किंवा निदान वार्षिक पावेतो मजल गाठल्याशिवाय खरें समाधान होणें शक्य नाही, हें प्रांजलपणे कबूल केले पाहिजे.

## ८ ग्रंथसंग्रह

संस्थेजवळ कामापुरता ग्रंथ संग्रह आहे. मुद्रित ग्रंथाची संख्या १०५० भरते. वाईकरांच्या २०२ ग्रंथांची वर्गवारी होणे आहे, तें सोडून बाकीच्यांची वर्गवारी येणेप्रमाणें:

(१) मराठी

| इतिहास | काव्य | तत्वज्ञान | चरित्र | मासिकें | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २१५ | १२४ | १२२ | ४५ | ९२ | ५९८ |

(२) संस्कृत

| वेद व उप० | काव्य | नाटकें कथा | पुराणें | धर्म शास्त्र | व्याकरण | सामान्य | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३६ | ६६ | २५ | २४ | ४७ | १५ | ९ | २२२ |

(३) इंग्रजी

| रिपोर्ट्स् | इतर | एकूण | १, २ व ३ मिळून एकूण संख्या |
|---|---|---|---|
| ३१ | ९७ | १२८ | ९४६ |

## वृत्तपत्रांची आवक

यंदाचे वर्षी २-३ गृहस्थांकडून संस्थेला मुद्रित, तसेच हस्तलिखित ग्रंथ मिळाले आहेत. श्री. गो चि. तांबे, संस्थेचे सभासद यांनीं एकूण ६२ ग्रंथ दिले असून त्यापैकीं ४६ मराठी आहेत. व १७ इंग्रजी आहेत. बहुतेक ग्रंथ इतिहास व ऐतिहासिक चारित्रें यांजवर आहेत. त्याप्रमाणें श्री. का. कृ. गंधे अॅडव्होकेट, यांनीहि ऐतिहासिक महत्वाचीं १९ पुस्तकें दिलीं तसेच श्री.विनायकराव वाईकर, संस्थचें एक कळकळीचे सभासद, यांनीहि संस्थेला बराच ग्रंथसंग्रह देणगीदाखल दिला आहे. त्यापैकीं २० मुद्रित असून १०१ हस्तलिखित आहेत. याबद्दल संस्था वरील सर्व गृहस्थांची अत्यंत ऋणी आहे.

तथापि खेदाची गोष्ट ही की, जागेच्या अभावी वाईकर संग्रह संस्थेला आपल्या स्वाधीन पुरेतपणी करून घेतां आला नाहीं. श्री. तांबे व गंभ्रे यांचाहि संग्रह प्रत्यक्ष संस्थेंत येऊ शकला नाहीं. वाईकरा-कडील जेवढा संग्रह आणतां आला तेवढा आणला. ३–४ वर्षांपूर्वी हस्तगत झालेला कै. या. मा. काळे संग्रह, देवसंग्रह व नुकताच आलेला वाईकर संग्रह एकदा हाताळून तो नीट लावण्याचा व रुमालांना क्रमवारी देण्यांचा प्रयत्न रा. लांडगे यांनी केला आहे. एकंदर हस्तलिखितांची संख्या सुमारे ७५ झाली असून त्यापैकीं ३२ रूमालांतील ग्रंथांची यादी करण्यांत आली आहे. या बत्तीस रूमालांत २५१ हस्तलिखितें असून पुढील रुमाल व वाईकर संग्रह मिळून हस्त लिखिताची वर्गवारी येणेप्रमाणें आहे.

| संस्कृत | | | | | मराठी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| धर्म, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान व संहिता | ज्योतिष वगैरे भौतिक शास्त्रें | पुराण | व्याकरण | काव्य, नाटक, प्रबंध, उपन्यास | कोश | वैद्यक | तंत्र | स्तोत्र, कवच | काव्य, टीका, अनुवाद | एकूण |
| ९० | २५ | ३० | १० | ३१ | ६ | ८ | ६ | ३६ | ९ | २५१ |

संस्थेजवळ कार्यकर्ते व द्रव्यसहाय्य या दोहोंचा अभाव असल्यामुळें मनासारखें काम होऊं शकत नाही. उपरोक्त पोथ्यांपैकीं बऱ्याच मुद्रित झाल्या आहेत तथापि त्यांचें संशोधन होऊन अप्रकाशित कोणत्या, प्रकाशित कोणत्या, दुर्मिळ कोणत्या पाठभेदाच्या दृष्टीनें महत्वाच्या कोणत्या वगैरे बाबतींत एक अहवाल तयार व्हावयास हवा. नागपुरांत व इतरत्र आसपासच्या गांवीं निरनिराळ्या शास्त्र वगैरे घराण्यात अजूनहि शेकड्यांनी पोथ्या आहेत व त्या मिळूहि शकतात. राजेसाहेबांच्या कोठींतील कौतुकास्पदरी निती लांहो

लेल्या पोथ्या व वेदशाळेंतील पोथ्या या सर्वांचे एकदां निरीक्षण होऊन रक्षणीय कोणत्या व टाकाऊ कोणत्या हें ठरल्यास कोणत्याच संस्थेंत व्यर्थ जागा अडणार नाही. परंतु हें कार्य सरकार शिवाय कोण करूं शकेल ?

९ कार्यकारी मंडळ व साधारण सभा —वृत्ताचे सालीं ३०–१–४८ रोजीं वार्षिक साधारण सभा भरली. मंडळांत आज पावेतो वाचण्यांत आलेल्या निबंधापैकी काही निवडक निबंध सारांश रूपाने प्रसिद्ध करावे असें ठरलें. त्याचवेळी कै० पूज्य म. गांधीच्या भीषण मृत्यूची बातमी आल्यामुळे एक दुःख प्रदर्शक ठराव करण्यांत आला. कार्यकारी मंडळाच्या ४ सभा झाल्या त्यापैकीं एकींत धर्मवीर डॉ. बा. शि. मुंजे यांच्या निधनाबद्दल दुखवट्याचा ठराव करण्यांत आला.

१० साधारण सभासदः—वृत्त वर्षाचे सुरवातीस वार्षिक ३ रु. देणारे ४३ सामान्य सभासद होते. त्यांतून कांही कमी झाले परंतु २१ सभासद नवीन करण्यांत आले याचें श्रेय रा. लांडगे यांस दिलें पाहिजे. त्यांना आणखी १०–१५ गृहस्थांनी सभासंद होण्याची अभिवचनें दिलीं आहेत. आज पटावर एकूण ५४ सभासद आहेत. मागील १५ वर्षांची प्रत्येक वर्षाचे अखेरीस असलेली सभासद संख्या येणे प्रमाणें:—

| १९३५ | १९३६ | १९३७ | १९३८ | १९३९ | १९४० | १९४१ |
|---|---|---|---|---|---|---|
| ६० | ६० | ७० | ७१ | ६८ | ४४ | ४४ |

| १९४२ | १९४३ | १९४४ | १९४५ | १९४६ | १९४७ |
|---|---|---|---|---|---|
| ४० | ३९ | ४० | ४० | ४६ | ४९ |

संस्थेच्या कार्याच्या व्यासंगाच्या मानाने सभासद संख्या अत्यल्प आहे हें कबूल केलें पाहिजे. जनतेमध्ये उत्साह वाढविण्याकरिता चालकांनी अधिक भरीव कामगिरी केल्यास जनतेकडूनहि अधिक

सहानुभूति मिळण्याचा संभव आहे. तथापि हल्लीच्या विलक्षण विचार-सरणीच्या दिवसांत इतिहासावरील प्रेमाला कितपत स्थान राहील, या विषयीं मन साशंक होऊं पहात आहे. तरी पण लिहिण्यास आनंद वाटतो कीं, वृत्ताचे वर्षी ना. गव्हर्नर साहेब व मुंबईचे प्रा. न. र. फाटक हे प्रत्येकी १०० रु. देऊन संस्थेचे सहाय्यक सभासद झाले आहेत. या त्यांच्या सहाय्याबद्दल संस्था त्यांची फार आभारी आहे. येथील धनिक व सहृदय जनता ना. गव्हर्नर साहेबांचें अनुकरण करील अशी आशा आहे. डॉ. सहस्त्रबुद्धे हे या पूर्वी म्हणजे १९४५ साली झालेले या वर्गातील सभासद होत. त्याशिवाय प्रत्येकी ५० रु. एकदाच देऊन मंडळाचे आजीव सभासद झालेले ७ सभासद आहेत. पैकीं प्रा. चतुर्वेदी यंदाच या वर्गाचे सभासद झाले. याशिवाय डॉ. य. खु. देशपांडे व म. म. द. वा. पोतदार हे सल्लागार सभासद आहेत. संस्थेचे अध्यक्ष डॉ. भवानीशंकर नियोगी हे ५०० रु. देणारे 'आश्रयदाते' या वर्गातील शिरोधार्य सभासद होत. अजून दुसरे कोणी गृहस्थ या वर्गाचे सदस्यत्वाचा मान घ्यावयास पुढे आले नाहीत. संस्थेचें कार्य व गरजा यांचा विचार करतां वरील उच्च श्रेणींचे सभासद संस्थेस लाभल्याशिवाय तिचें उद्दिष्ट साध्य होणार नाही. संस्थेचा स्थानिक अभिमान म्हणून ज्या नागपूरकर भोसल्यांच्या इतिहासाविषयी संस्था झटत आहे, त्यांचेपैकीं संस्थेला मदत करण्याकरिता अजून कोणीच पुढे येत नाही. ही दुःखाची गोष्ट आहे. तरी जुन्या ऐतिहासिक घराण्यांतील सज्जनाचें मन योग्य रीतीनें वळविल्यास आशा करण्यास जागा आहे. हल्ली त्याच्या मनावर वैराग्याचें पटल आच्छादित आहे. याची संस्थेला जाणीव आहे. पांढरपेशा वर्गाप्रमाणें व्यापाऱ्यांनीहि विद्वान् संशोधकाचा या संस्थेमार्फत उपयोग करून घेणे शक्य आहे. कारण संस्थेचे ध्येय केवळ ऐतिहासिक संशोधन नसून ते अधिक व्यापक आहे हे वर वाचलेल्या निबंधांच्या वर्गवारी वरून ध्यानांत येईल.

---

११. जमाखर्च

## ३१ डिसेंबर रोजीं संपणाऱ्या वर्षाचे जमाखर्च येणेप्रमाणे आहेत

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| १ सुरु शिल्लक चिटणीसाजवळ ५५-५-६ | | १ पोष्ट व तार | ३-४-६ |
| २ प्रा. को. बँकेत | | २ स्टेशनरी | ४-४-३ |
| से. बँकखातें | | ३ वार्षिक सभा | ५३-६-० |
| अ) रिझर्व फंड ४२६-९-६ | | ४ छपाई बखर | ८५-०-० |
| ब) चालू खर्चा १४८-७-० | | ५ मजूरी | ७-०-० |
| | | ६ वाहन खर्च | ५-१३-० |
| कारिता | ६३०-६-० | ७ किरकोळ | २८-११-६ |
| ३ वर्गणी | | ८ तसलमात छापण्याकारिता पेशगी | २००-०-० |
| आजीव सभासद २० | | ९ शिल्लक अखेर | |
| साहाय्यक ,, २०० | | चिटणीसा जवळ ९६-६-३ | |
| साधारण ,, १७८ | ३९८-०-० | प्रिमिअर हौसिंग | |
| | | सोसायटी | |
| बखर विक्री | २४-०-० | से० बँक | |
| व्याज | २२-०-० | (अ) रिझर्व फंड २००-०-० | |
| किरकोळ | ६-८-९ | (ब) चालू ३९७-१-३ | ६९३-७-६ |
| एकूण रु. | १०८०-१४-९ | एकूण रु. | १०८०-१४-९ |

मागील वर्षाशी तुलना करतां उत्पन्न व खर्चाच्या बाबतींत प्रगति दिसते. मागील वर्षी २५ जाने. ४८ पावेतो साधारण सभासदाकडून ८० रु वर्गणी वसूल झाली होती. ती यंदा (रु. १७८–१२ रु. मागील वृत्तांत आलेले) १६६ रु. झाली आहे. मागील वर्षी इतर कोणतेहि उत्पन्न नव्हतें तें यंदा आहे. मागील वर्षी उत्पन्नापेक्षा १० रु. अधिक खर्च झाला यंदा तशी स्थिति नाही. मागील वर्षी ९२।≈ खर्च झाले यंदा ३८७ रु. ७ आ. ३ पै. खर्च झाला. पैकी २०० रु. उन्मेष मासिकला आगाऊ दिले आहेत. त्याचा खर्च पडणें आहे. शिल्लक अखेर ६३ रु. १ आ. ६ पै नी वाढली आहे.

मागील वर्षाप्रमाणें यंदाहि श्री. बाबा आंबेकर एम्. ए. बी कॉम रजि. अकाऊंटंट यांनी बिना वेतनाने मंडळाचे हिशेब तपासले त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. त्यानींहि यंदाच्या प्रगतिबद्दल समाधान व्यक्त केलें आहे.

१२. पत्रव्यवहार वगैरे—निरनिराळ्या कार्यांच्या निमित्ताने वृत्ताचे वर्षी ७५ पत्रें पाठविण्यांत आलीं. यंदाचे वर्षी मुख्य पत्र व्यवहार नझूल ऑफिस, सेन्ट्रल ब्यूरो ऑफ एज्युकेशन, स्थानिक शिक्षण खातें व इंप्रूव्हमेंट ट्रस्ट यांचेशी करावा लागला. नझूलकडे मंडळाच्या इमारतीकरितां जागा मिळविण्याचा यत्न चालू आहे. शिक्षण खात्याने ग्रँट देता येत नाही म्हणून उत्तर दिलें आहे. हा तिसरा अयशस्वी प्रयत्न होय.

१३. अंदाजपत्रक—१९४९ चें अंदाज पत्रक येणे प्रमाणे आखलें आहे. सुदैवाने यंदा मागील वर्षाच्या अंदाज पत्रकाच्याहि वर कार्यनिष्पत्ति झाली. पुढील वर्षीहि ती तशीच झाल्यास बरें.

| | | | |
|---|---|---|---|
| आश्रयदाते | १०० | स्टेशनरी | ५०–० |
| सहाय्यक | २०० | पोस्ट | १० |

| | | | |
|---|---|---|---|
| साधारण सभासद | २०० | मेहनताना | २५ |
| व्याज | १२ | उत्सव खर्च | ७५ |
| | | वाहन खर्च | ५० |
| | | छपाई | २०० |
| | | शिल्लक | ४२ |
| | ४५२ | | ४५२ |

१४ **प्रयत्न व गरजा**—वर दिलेल्या पत्र व्यवहाराच्या निष्कर्षावरून मंडळाच्या प्रयत्नाचा व गरजांचाहि बोध होतो. इतर प्रांतांत असल्या संस्थेस स्थानिक सरकार ग्रँट वगैरे देऊन प्रोत्साहन देते परंतु १५ वर्षे सतत कार्य करूनहि या संस्थेला सरकारचें सहाय्य मिळू नये याचें सखेदाश्चर्य वाटतें. सेक्रेटरीयेटच्या ऐतिहासिक रेकॉर्डचे व अन्य तत्सम कामें करण्यास या संस्थेतील अनुभवी सभासद सिद्ध आहेत. या बाबतींत सरकार पैसाहि पुरेसा खर्च करतें परंतु त्याचें या संस्थेकडे लक्ष गेल्याचें अजून तरी दिसत नाही. जागेच्या अभावी अनेक ग्रंथ व हस्तलिखितें विश्रांति घेत पडलीं आहेत. त्यांची वर्गवारी करण्याकरितां किंवा ती तपासण्याकरता किंवा नवीन दुर्मिळ ग्रंथ मिळविण्याकरता प्रयत्नांची जरुरी आहे परंतु मनुष्यबळ व द्रव्यबळ दोहोंचाहि अभाव असल्यामुळे कार्य समाधानकारक रीतीने प्रगट होत नाही. पत्रें लिहिणे नकला ठवणें यादी करणें वसुली करणे, हिशेब ठेवणे वगैरे सर्वच कामें एकाच व्यक्तिवर पडलीं तर संस्था ' जैसे थे 'च्या पलीकडे कशी जाईल ? जागेच्या व कारकुनाच्या अभावी उपलब्ध ग्रंथसंग्रहाचा देखील कोणास लाभ घेता येत नाही. प्रकाशित होत असलेलीं ऐतिहासिक व इतर भारदस्त नियतकालिकें द्रव्याभावी घेता येत नाहीत व त्यामुळें प्रगति खुंटल्यासारखी वाटते. संस्थेला भाड्याची देखील जागा घेता येत नाही. कपाटें असूनसुद्धा त्यांच्या शेजारी फिरकण्यापुरतीहि जेथे पदाधिकाऱ्यानाच जागा नाही, तेथे सभासद

कसें येणार व कपाटांतलि वाङ्मयाचा उपयोग तरी काय करणार ? श्री विंझाणी सिटी कॉलेजचे प्रिन्सिपाल श्री. पांढरीपांडे ह्यांनीं आपल्याच खोलींत संस्थेला कसाबसा संसार थाटू दिल्यामुळे आज कपाटें तरी उभीं आहेत तरी त्यांच्या सौजन्याचा अशा रीतीनें फायदा तरी किती घ्यावा, हा प्रश्न आहे.

१५ उपसंहार--श्री. श्री. ल. पांढरीपांडे हे संस्थेचे आरंभापासून सरचिटणीस असून त्यांच्या व त्यांचे सहकारी प्रा. सावळापूरकर यांच्याच आद्य प्रयत्नांचें जें दिसतें तें दृश्यफल आहे. आजहि हल्लींचे सहकार्यवाह रा. लांडगे यांना ह्या दोन्ही प्रेमळ व्यक्तींचीं मदत होते. तरी रा. लांडगे यांस त्यांच्या उतार वयांत दुसऱ्या तरुण कार्यकर्त्यांचें सहाय्य झाल्यास संस्थेची धुरा त्यांचेवर सोपविता येईल. तथापि प्रा. पांढरीपांडे, प्रा. सावळापूरकर, संस्थेचे हितचिंतक व वर्गणीदार वृत्तपत्राचे संपादक व कांहीं इतर सुबुद्ध जनता यांचें सहाय्य होत असल्यामुळे अजूनहि संस्थेला निराश होण्याचें कारण नाहीं. आमचा प्रांत राजकयि बाबतींत इतर प्रांतांच्या मानाने मागे नसता, संशोधनासारख्या सकृद्दर्शनीं नीरस, पण अती फलदायी अशा कार्यक्षेत्रांतहि आघाडी मारण्याची आकांक्षा आम्ही कां धरूं नये हें समजत नाहीं. या दृष्टीने आमच्या प्रांताचे माननीय गव्हर्नर साहेब ना. पक्कासा यांची लाभलेली सक्रिय सहानुभूति व संस्थला पुढेहि मदत देण्याचें त्यांचें आश्वासन या योगे संस्थाचालकाना यंदाचे वर्षी बराच हुरुप आला व त्यांबद्दल नामदारांचे जेवढे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. शेवटीं, सर्वच विद्याप्रेमी लोकांनीं संस्थेकडे आपली अनुकूल दृष्टि वळवावी, अशी त्यास विनंती करून हें वृत्त संपवितो.

ता. ४-३-४९

दे. गो. लांडगे.

सहकार्यवाह,

# परिशिष्ट

## संस्थेचे सभासद

( ता. २१-४-४९ रोजीं )

आश्रयदाते ( ५०० रु. देणारे )

१ डॉ. सर भवानीशंकर नियोगी, निवृत्त हायकोर्ट जज्ज, नागपूर, एम्. ए., एल्.एल्. एम्., एल्.एल्. डी. ( संस्थेचे अध्यक्ष )

साहाय्यक सभासद ( १०० रु. देणारे ),

१ ना. मंगलदास पक्कासा,
गव्हर्नर, मध्यप्रान्त व वऱ्हाड नागपूर.

२ प्रा. न. र. फाटक, मुंबई

३ डॉ. एन्. एम्. सहस्त्रबुद्धे, एल. एम्. एस्.
सीताबर्डी, नागपूर.

४ डॉ. शिंगणापूरकर,
निवृत्त असि. सर्जन नागपूर.

आजीव सभासद ( ५० रु. देणारे )

१ म. म. वा. वि. मिराशी, एम्. ए.
प्रिन्सिपल, विदर्भ, महाविद्यालय ( संस्थेचे कार्याध्यक्ष)

२ श्री. दा. तु. मंगळमूर्ति, एल्.एल्. एम्.
ॲडव्होकेट, धंतोली नागपूर.

३ श्री. श्री. ल. पांढरीपांडे, एम्. ए. ( संस्कृत, मराठी )
प्रिन्सिपल, श्री बिंझाणी सिटी कॉलेज, नागपूर.

४ श्रीमन्त माधव नारायण घटाटे, सावकार, नागपूर.

५ श्री हरि गणेश आंबेकर, नागपूर.
( हल्ली परिव्राजक हृषीकेश.

६ प्रि. ह. ना. नेने, एम्. ए., एल्. टी.

७ प्रो. स. प्र. चतुर्वेदी, एम्. ए.
प्राध्यापक, नागपूर महाविद्यालय.

## सन्मान्य सभासद

१ म. म. प्रा. दत्तो वामन पोतदार, पुणें.
२ डॉ. य. खु. देशपांडे, एम्. ए, डी. लिट्. यवतमाळ

## साधारण सभासद

१ पंडितसम्राट् म. म. कृष्णशास्त्री घुले, संस्थेचे उपाध्यक्ष, नागपूर
२ डॉ. के. ल. दप्तरी, डी. लिट् उपाध्यक्ष नागपूर.
३ श्रीमंत मा. गं. चिटणवीस बी. ए, ,,
४ श्री. ल. रा. कुळकर्णी, एम्. ए., एल. टी. ,,
५ प्रा. पां कृ. सावळापूरकर, ,,
६ प्रा दि. का. गर्दे एम्. ए. ,,
७ रा. ब. के. बी. पळसुले निवृत्त डि. ऍंड से. जज ,,
८ श्री. दे. गो. लांडगे बी. ए., एल. टी., एलएल. बी. (सर्टि.) ए. आय्. आय्. बी. नागपूर.
९ श्री. शं. अ. साठे, एम्. ए., एलएल. बी. ॲडव्होकेट, नागपूर
१० डॉ. द. वा. कठाळे, एल.एल. एम्., एल.एल. डी. नागपूर
११ श्री. भ. आ अमरावतकर, निवृत्त डि. ॲंड से. नागपूर
१२ रा. ब. ना. दा. वाडेगांवकर, ,, ,, ,, ,,
१३ डॉ. वा. शि. बार्लिंगे, एम्. ए., पी. एच. डी. बॅार ॲटलॉ मन्त्री, मध्यप्रांत शासन नागपूर.
१४ श्री. आ. रा. देशपांडे, एम्. ए., एल.एल. बी. नागपूर
१५ प्रा. डॉ. मा. गो. देशमुख, एम्. ए., पी. एच. डी., उमरावती
१६ प्रा. शु. प्र. तिवारी, एम्. ए., एलएल. बी., नागपूर.
१७ डॉ. एस्. एस्. पटवर्धन, डी. एस्सी. नागपूर
१८ प्रा. डॉ. वि. भि. कोलते, एम्. ए., पी.एच. डी ,,
१९ श्री. ना. दा. पेंडसे, नागपूर
२० श्री. शं. वा. रानडे बी. ए. ,,

| | | |
|---|---|---|
| २१ | श्री. त्र्यं. मुं. मुळे, एम्. ए. | कलकत्ता |
| २२ | मीमांसाभूषण पु. श्री. साठे एल्‌एल् एम्. | वर्धा |
| २३ | श्री. मो. मा. खडा॑, बी. ए. | नागपूर |
| २४ | श्री. रा. के. पेंडसे, बी. ए. एलएल. बी. | ,, |
| २५ | गं. रा. देव | ,, |
| २६ | प्रा. दि. वि. वऱ्हाडपांडे एम्. ए. | ,, |
| २७ | श्री. रा. पु. सगदेव, एम्. ए., एलएल. बी. | ,, |
| २८ | डॉ. वा. गं. पांडे, एल. एम्. पी. | ,, |
| २९ | श्री. वि. प्र. रोडे, एम्. एस्सी. | ,, |
| ३० | श्री. हरि लक्ष्मण ढवळे | ,, |
| ३१ | श्री. वि. मा. वाईकर | ,, |
| ३२ | श्री. स. ना. कुळकर्णी, बी.ए., एल. टी. | ,, |
| ३३ | प्रि. सि. न. ताम्हणे, एम्. ए., एल. टी. | ,, |
| ३४ | श्री. त्रि. ना. केळकर | ,, |
| ३५ | डॉ. भाऊ दाजी देशमुख, एल. एम्. ॲंड एस. | ,, |
| ३६ | श्री. र. व्यं. वांडे, बी. ए. | ,, |
| ३७ | डॉ. के. ल. सोनक, एल. एम्. पी. | ,, |
| ३८ | रा. ब. भा. रा. चांदोरकर, निवृत्त, एल. एम्. ॲंड एस., डी. टी. एम्. सिव्हिलसर्जन | ,, |
| ३९ | श्री. गोपाळराव चिटणवीस बी. एस्सी. | नागपूर |
| ४० | ,, रा. र. दांडिगे बी. ए. एल. एल. बी. ॲडव्होकेट | ,, |
| ४१ | ,, ना. वा. कतर्णी, | ,, |
| ४२ | ,, गो. ह. पुराणिक | ,, |
| ४३ | ,, ए. ज. मोहरीर, बी. ए., एल.एल. बी. अडव्होकेट | ,, |
| ४४ | ,, प्रेमशंकर दवे | ,, |
| ४५ | ,, त्र्यं. ना. जोशी, | ,, |
| ४६ | ,, रा. बा. मिटकरी, बी.ए. | ,, |
| ४७ | ,, श्री. मुन्शी, | ,, |
| ४८ | ,, गो. रा. देव, बी. ए., एल.एल. बी. | ,, |

**द. म. म. द. वा. पोतदार,**

| | | | |
|---|---|---|---|
| ४९ | ,, | दा. कृ. मोहनी, एम् ए. एल्. टी. | ,, |
| ५० | ,, | रा. गा. उबाळे, बी.ए. | ,, |
| ५१ | ,, | पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, संपादक महाराष्ट्र, | ,, |
| ५२ | ,, | कृ. आ. पेठे, बी. ए., एल. एल. बी. अॅडव्होकेट | ,, |
| ५३ | प्रा. | श्री. मा. कुलकर्णी, एम्. ए. | ,, |
| ५४ | श्री. | के. डी. बॅनर्जी, बी. ए. | ,, |
| ५५ | ,, | गो. के. बाळके, | सावनेर |
| ५६ | ,, | का. कृ. गंधे, बी.ए., एल. एल. बी. अॅडव्होकेट | नागपूर |
| ५७ | ,, | ज. ब. बक्षी | ,, |
| ५८ | ,, | बाबासाहेब माटेगांवकर | ,, |
| ५९ | ,, | प्रभात कुमार बॅनर्जी | ,, |

फ. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह